**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**आदिवासी उपयोजना क्षेत्रातील निकषपात्र माध्यमिक शाळा व तुकड्यांचे प्रलंबित वेतन मिळावे यासाठी धरणे आंदोलनाचे आयोजन**

**(१) * ३७३६५ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुदानास निकषपात्र ठरलेल्या ५१ माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदान अदा करावे यामागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने दिनांक २० ऑक्टोबर, २००७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर (जि.यवतमाळ) धरणे आंदोलन केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे,

(३) अद्यापही कार्यवाही केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ , प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) होय.

(२) अनुदानास पात्र म्हणुन घोषित करण्यात आलेल्या ५२ माध्यमिक शाळांपैकी २२ शाळांमध्ये ५० टक्के आदिवासी विद्यार्थी असल्याने या शाळांना आदिवासी विकास विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्याने दिनांक २२ जानेवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये या २२ शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उर्वरित २९ शाळांच्या संदर्भात आदिवासी विकास विभागाच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, अतिशय गंभीर असा हा प्रश्न आहे. आदिवासी आणि दुर्गम भागातील तसेच नक्षलग्रस्त भागातील २९ शाळांना अनुदान मिळण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. ३० जून, २००६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी झाला. शाळांची यादी जाहीर झाली त्यामध्ये या २९ शाळांचा समावेश आहे. सभापती महोदय, सदनामध्ये ५/६ वेळा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मी आपणांस आठवण करुन देतो की, २५.७.२००७ रोजी यासंदर्भात मी नियम ९३ अन्वये सूचना दिली असताना सदनामध्ये सूचना केली होती की, संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी याबाबतची माहिती सोमवारपर्यंत सदनास उपलब्ध करुन द्यावी आणि अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला अवगत करावे. २७.११.०७ रोजी मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन या शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाची सकारात्मक भूमिका निश्चितपणाने राहील आणि निर्णय घेतला जाईल. सभापती महोदय, आज दोन वर्षे होऊन गेली तरीसुध्दा यासंदर्भात निर्णय झालेला नाही. ३० जून २००६ रोजी शासन निर्णय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३७३६५ पुढे सुरु....

श्री. व्हि.यू.डायगव्हाणे ....

निर्गमित झाला. या शाळा अनुदानाच्या टप्प्यावर आल्या असताना सुध्दा आदिवासी भागातील शाळांवर शासनाचा एवढा राग कशासाठी ? यासंदर्भात आपण निदेश दिले होते. आदिवासी विभागातील या २९ शाळा अनुदान मिळण्यास पात्र असताना सुध्दा अद्याप अनुदान मिळालेले नाही. शासनाच्या जीआर प्रमाणे या शाळा अनुदानास पात्र आहेत. माझा प्रश्न असा आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या २९ शाळांचा अनुदानाचा प्रश्न शासन निकाली काढणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, २०००-२००१ आणि २००१-२००२ मध्ये या शाळांना परवानगी देण्यात आली होती. २००५-०६ मध्ये मूल्यांकन झाल्यावर ५१ शाळा अनुदानासाठी घोषित करण्यात आल्या होत्या. यापैकी २२ शाळांमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त विद्यार्थी आदिवासी समाजाचे आहेत. २००५-२००६ मध्ये जनजाती सल्लागार परिषदेची बैठक झाली ज्याचे माननीय मुख्यमंत्री अध्यक्ष आहेत त्यामध्ये ५० टक्के विद्यार्थी आदिवासी असल्याशिवाय अनुदान देऊ नये असा निर्णय झालेला आहे. या २९ शाळा मूल्यांकनात पात्र ठरल्यानंतर त्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेत आहोत. वित्त आणि नियोजन विभागाशी चर्चा केल्यानंतर टप्प्याटप्याने अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. ३०जून २००६ चा शासन निर्णय माझ्याकडे आता उपलब्ध आहे ज्यामध्ये या शाळांचा समावेशआहे. विभागाविभागातील मतभेद किंवा मतभिन्नता मिटवून शासन निर्णय यापुढे निर्गमित करा. ३० जून २००६ रोजी जो शासन निर्णय निघाला त्यामध्ये ५० टक्के विद्यार्थी आदिवासी असले पाहिजेत अशी अट घातलेली नाही. नंतर आपण निर्णय बदलला असेल तर माहीत नाही. शासनाला तसा अधिकार आहे. माझा प्रश्न असा आहे की शासन निर्णय निर्गमित केलेला असताना आणि परिशिष्टामध्ये या शाळांचा समावेश असताना सुध्दा ३/३ वर्षे शासन या शाळांना अनुदान का देत नाही ? यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या गोष्टी कारकून करतात ही गोष्ट अयोग्य आहे. योगायोग म्हणजे राज्याचे माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. अतिशय वाईट अशा प्रकारचा संदेश राज्यामध्ये जात आहे. शासनाच्या जीआर मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, या शाळांना अनुदान देण्यात यावे. कायम विनाअनुदानावरील या शाळा नाहीत. विनाअनुदानावरील या शाळा आहेत आणि आदिवासी भागातील आहेत.

नंतर श्री. भोगले





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने निकष बदलले त्याविषयी आमचे मतभेद आहेत तो भाग वेगळा आहे. परंतु नंतर बदलविलेले निकष पूर्वी काढलेल्या शासन निर्णयावर लादणे यामध्ये शासनाची इमेज खराब होते. विभागाशी समन्वय साधून शासन निर्णय काढला जातो. शासन लोकांपुढे काय मॅसेज देत आहे? काल अमरावती येथे 600 शिक्षकांनी मोर्चा काढला. त्यांनी सही शिक्क्यानिशी आमच्याकडे मागणी सादर केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, शासन निर्णय निघाल्यानंतर आणखी काय राहिले? हा असंतोष शासनाच्या चुकीच्या कृतीमुळे निर्माण होत आहे. शासन निर्णय निघाल्यानंतर जनजाती परिषदेमध्ये ठरल्याप्रमाणे शासनाने ज्या काही अटी घातल्या असतील त्या पुढील निर्णय घेताना विचारात घ्याव्यात. परंतु येत्या आठ दिवसात या शाळांना अनुदान दिले जाईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, आदिवासी मुले शिकत असून आदिवासी भागातील शाळा आहेत. त्यांना अनुदान देण्यास शासन सहमत आहे.......

प्रा.बी.टी.देशमुख : शासनाने जी.आर.काढला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात)

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख म्हणाले की, मुख्यमंत्री योगायोगाने सभागृहात हजर आहेत. खरे म्हणजे सभागृहात हजर राहणे ही मुख्यमंत्र्याची जबाबदारी असते, हा योगायोग नाही. ते माझे कामच आहे. परंतु मुख्य प्रश्न उपस्थित केला तो पूर्वी शासन निर्णय काढण्यात आला त्या संदर्भात आहे. प्रामुख्याने आदिवासी भागातील शाळा आहेत आणि आदिवासी मुले शिकत आहेत. तेव्हा त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी हे सत्र संपण्यापूर्वी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. त्या शाळांना अनुदान देणे बाकी आहे. त्यांना अनुदान देण्याच्या संदर्भात अंतिम आदेश निघण्यापूर्वी जो जी.आर.काढला आहे त्या संदर्भात प्रश्न निर्माण झाला आहे. योग्य त्या प्रमाणात आदिवासी मुलांची संख्या आहे की नाही वगैरे बाबी आहेत. मूळ जी.आर.काढला त्याला आधारित राहून या संदर्भातील कारवाई ताबडतोब केली जाईल.

----------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**वसई, विरार व नालासोपारा (जि.ठाणे) येथील जागांवरील अवैध झोपड्या हटवून जमिनधारकांना स्वत:चा उद्योग उभारण्यास द्यावयाची परवानगी**

**(२) * ३७२९० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री.सय्यद जामा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, विरार व नालासोपारा (जि.ठाणे) येथील जागेवर सिडकोचे औद्योगिकीकरणासाठी नियोजन असल्याचे माहे ऑगस्ट, २००७ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागेवर मोठ्या प्रमाणात अवैधरित्या झोपडपट्टया उभारल्या असल्याने सदर ठिकाणी स्वमालकीच्या जागा असलेल्या व्यक्तींना उद्योग उभारण्यास नगरविकास विभाग परवानगी देत नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैधरित्या उभारण्यात आलेल्या झोपड्या हटवून जमिनधारकांना स्वत:चा उद्योग उभारण्यास परवागनी देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विलासराव देशमुख** : (१) वसई-विरार उप प्रदेश विभागाच्या विकास योजनेमध्ये औद्योगिक क्षेत्र सन १९९५ पासून प्रस्तावित आहे व दिनांक ९/२/२००७ मध्ये मंजूर झालेल्या विकास योजनेमध्ये देखिल औद्योगिक क्षेत्र आहे.

(२) नाही.

(३) व (४) खाजगी जमिनीवर झोपड्या होवू न देणे ही जबाबदारी संबंधित जमिन मालकाची आहे. विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोतर्फे मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार वसई विरार उपप्रदेशातील औद्योगिक विभागाच्या जमिनीवर औद्योगिक वापरासाठी परवानगी देण्यात येते.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, खाजगी जमिनीवर झोपडपट्टया होऊ नयेत यादृष्टीने संबंधित जमीन मालकांनी जबाबदारी घ्यायची आहे असे उत्तरात म्हटले आहे. परंतु अशा जमिनींवर झोपडपट्टया उभारताना झोपडपट्टीदादा दबावतंत्र वापरतात. अशा वेळी शासनाकडून जमीन मालकांना संरक्षण दिले जाईल का? वसई-विरार पट्टयामध्ये औद्योगिक विभागाच्या जमिनींवर आतापर्यंत किती उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे याची माहिती माननीय मुख्यमंत्री महोदय देतील काय?

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, ही जी अतिक्रमणे झालेली आहेत ती खाजगी जमिनींवर झालेली आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की, अशी अतिक्रमणे होत असताना झोपडपट्टीदादा दबावतंत्र वापरतात आणि भीतीचे वातावरण निर्माण करतात. अशा वेळी जमीन मालकांना राज्य सरकारकडून आवश्यक ते संरक्षण किंवा माहिती लागते ती माहिती देण्याच्या संदर्भात किंवा संरक्षण देण्याच्या संदर्भात राज्य सरकार अवश्य काळजी घेईल. त्या संदर्भात या सदनामध्ये कायदा सुध्दा पारित केलेला आहे. नॉन बेलेबल आणि कॉग्निजेबल ऑफेन्स अशा पध्दतीचा कायदा केलेला आहे. या संदर्भात कडक अंमलबजावणी करणे आणि खाजगी जमीन मालकांनी पोलिसांकडे संरक्षण मागितले तर ते संरक्षण निश्चितपणाने त्यांना दिले जाईल. जे औद्योगिक क्षेत्र आहे त्या क्षेत्रामध्ये आतापर्यंत साधारणपणे 18 उद्योगांना परवानगी दिलेली आहे.

----------

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मोरबे धरणाच्या पाण्यामुळे नवी मुंबईतील पाणी टंचाई कमी होणार असली तरी कायम स्वरुपी उपाय म्हणून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत तयार केलेला आराखडा**

**(3) * 37855**

**श्रीमती मंदा म्हात्रे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मोरबे धरणाच्या पाण्यामुळे नवी मुंबईतील पाणी टंचाई कमी होणार असली तरी कायम स्वरुपी उपाय म्हणून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेने 93 कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असून दिनांक 27 डिसेंबर, 2007 रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(3) ही योजना प्रत्यक्षात केव्हापासून अंमलात आणण्यात येणार आहे ?

**श्री.विलासराव देशमुख** : (1) 96 कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला, हे खरे आहे.

(2) मोरबे धरणाचे पाणी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना 24x7 देण्यासाठी अंतर्गत वितरण व्यवस्थेतील 25 ते 30 वर्ष जुन्या जलवाहिन्या बदलणे, पाण्याचा दाब योग्य राखण्याकरीता नवीन जलवाहिन्या टाकणे, पाण्याचे मोजमाप करण्याकरीता स्काडा योजना कार्यान्वित करणे, भूमीगत जलकुंभ बांधणे, वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याकरीता अतिरिक्त जलवाहिन्या टाकणे इ.बाबींचा सदर योजनेत समावेश आहे.

(3) केंद्र शासनाने सदर योजनेस मंजूरी दिल्यानंतर पुढील कार्यवाही त्वरीत करण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, मोरबे धरणामुळे नवी मुंबईतील पाणी टंचाई कमी होणार असली तरी नवी मुंबईची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन आणि वाढणारे बांधकाम आणि सिडकोने ज्यावेळी जमिनी संपादित केली त्यानंतर टाकलेल्या जुन्या पाईपलाईन्स यासंदर्भात 96 कोटीचा प्रस्ताव जेएनयुआरएमच्या माध्यमातून महापालिकेने तयार केला आहे. या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे की, यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या माध्यमातून केंद्रशासनाकडे पाठविलेला आहे, त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांचे मी अभिनंदन करते. आज या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याची आवश्यकता आहे. कारण अनेक जुन्या पाईपलाईन्स अतिशय दुर्धर अवस्थेत आहेत. काही पाईपलाईन्स शौचालयाच्या गटारांमध्ये आहेत. म्हणून शासनाने जो प्रस्ताव केंद्राकडे पाठविलेला आहे त्याला अंदाजे किती दिवसात मंजुरी मिळणार आणि हे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री. विलासराव देशमुख : महोदय, राज्यशासनाने शिफारस करुन हा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठविलेला आहे. त्या प्रस्तावाला मान्यता मिळवून देण्याचे प्रयत्न सुरु आहेत आणि ज्यावेळी प्रस्तावाला मान्यता मिळेल त्यानंतर ताबडतोबीने या कामाला सुरुवात करण्यात येईल.

-----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विद्यार्थ्यांची बोगस नोंदणी आढळून आल्याबाबत**

**(4) * 39817 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील , श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2005-06 या शैक्षणिक वर्षात राज्यामध्ये 12 लाख 8 हजार 497 विद्यार्थ्यांची बोगस नोंदणी हजेरीपटावर केल्याचे सिध्द झाले आहे, हे खरे आहे काय,

(2) एका विद्यार्थ्यामागे शासन सुमारे 6 हजार रुपये इतका वार्षिक खर्च करत असल्याने या बोगस विद्यार्थ्यांच्या नावाने शासनाचे सुमारे 725 कोटी रुपये खर्च झाले, हे खरे आहे काय,

(3) बोगस विद्यार्थी हजेरीपटावर दाखविल्याबाबत व त्याअनुषंगाने शासनाचा झालेला खर्च याबाबत संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, माझ्या जिल्ह्यात विशेषत: अलिबाग तालुक्यात चार बोगस शाळा असल्याचे पत्र दिल्यानंतर त्याची चौकशी होऊन ह्या शाळा बोगस असून त्यातील विद्यार्थ्यांची नोंदणी बोगसरित्या झाल्याचे निष्पन्न झाले आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. परंतु येथे मात्र "असे झाले नाही", असे उत्तर देण्यात आले आहे. आमच्या तालुक्यातील बोगस विद्यार्थ्यांच्या नोंदणीसंदर्भात चौकशी केल्यानंतर अशा बोगस तुकडया आढळून आल्या व त्या शाळांना मान्यता घेतली म्हणून शासन त्यांच्यावर कारवाई करणार काय ? तसेच त्यांची मान्यता रद्द करणार काय ? आणि ज्या विस्तार अधिकारी, उप शिक्षणाधिकारी अथवा शिक्षणाधिकाऱ्यांनी अशा संस्थांना मदत केली आहे, त्यांच्यावर देखील शासन कारवाई करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, सन्माननीय सदस्यांनी "सन 2005-06 या शैक्षणिक वर्षात राज्यामध्ये 12 लाख 8 हजार 497 विद्यार्थ्यांची बोगस नोंदणी हजेरीपटावर केल्याचे सिध्द झाले आहे, हे खरे काय ?" असा जो प्रश्न विचारला आहे त्याला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. परिस्थिती अशी आहे की, दरवर्षी या खाजगी शाळांमध्ये तुकडया वाढविण्यासाठी, शिक्षक अतिरिक्त होतील म्हणून थोड्याफार प्रमाणात घटना घडत असतात. सन 2005 अखेर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिली ते सातवीच्या वर्गांमध्ये 74.58 लाख इतकी पट नोंदणी होते. सन 2005 नंतर पायाभूत चाचणी केली त्याला मात्र 70 लाख विद्यार्थीच बसले आहेत. अशा प्रकारे

......3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक - 39817........ श्री. हसन मुश्रीफ ......

पाच ते सात टक्केच विद्यार्थी बसले नाहीत असे आढळून आले असून आम्हाला सुध्दा 1 लाख विद्यार्थ्यांची तफावत आढळून आली. पुन्हा 30 सप्टेबर रोजी पट पडताळणी करतो आणि मगच संचांना मान्यता देतो. अशा गोष्टी त्यावेळी निदर्शनास येतात. यासाठी एक नवीन कार्यक्रम आम्ही हाती घेतो. ही बोगस पट नोंदणी होऊ नये म्हणून पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना मास्टर कार्ड "युनिक कार्ड" देण्याचे आम्ही ठरविले असून त्या सर्व कार्ड्सचे नंबर्स वेगवेगळे राहतील त्यामुळे बोगस विद्यार्थ्यांची अथवा पट नोंदणीची अडचण निर्माण होणार नाही व त्या बेसवर कुठल्याही प्रकारे गैरप्रकार करता येणार नाही. तसेच आपण म्हणालात त्याप्रमाणे अशा काही संस्थांची नांवासह माहिती दिल्यास त्या संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारे या गोष्टींना आळा घालण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री. कपिल पाटील : महोदय, बोगस नोंदणीबाबत स्पेसिफिक उदाहरण दिलेले आहे. ते म्हणजे सावित्रीबाई फुले या नावाने शाळा चालवितात व त्या शाळेतील विद्यार्थी बोगस आणि मुख्याध्यापक सुध्दा बोगस आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 39817** .......

श्री. कपिल पाटील.....

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी स्वत: तसेच माननीय आव्हाड साहेब तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी माननीय शिक्षण मंत्र्यांकडे पत्र दिलेले आहे. बोगस नोंदणी केल्याचे सिध्दही झालेले आहे. त्यामुळे त्यांची नोंदणी ताबडतोब काढून घेणार आहात काय तसेच तेथील शिक्षकांना सरप्लस करुन इतरत्र पाठविण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मान्यता काढून घेणे किंवा प्रशासक नेमणे अशा अनेक कारवाया असतात त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

---------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नगरपालिका व महानगरपालिकेच्या अनुदान प्राप्त शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांना**
**रजा प्रवास सवलत व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू होणेबाबत**

**(५) * ३७३५० श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांना रजा प्रवास सवलत व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू आहे हे खरे आहे काय,

(२) नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतरांना या सवलती न देण्याची कारणे काय आहेत,

(३) नगरविकास व शालेय शिक्षण विभागाने एकत्रित विचार करुन निर्णय घेण्याचे आश्वासन शासनाने दिले होते हे खरे आहे काय,

(४) त्यासंबंधी शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्या करिता** : (१) होय.

(२) नगर परिषदा/महानगरपालिका यांना त्यांच्या सवतःच्या योजना लागू आहेत.

(३) होय.

(४) व (५) रजा प्रवास सवलत/वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती योजना शासनाने अमान्य केली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,नगरपालिकांच्या शाळातील शिक्षकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. हा प्रश्न या सभागृहात येण्याची ही सातवी वेळ आहे. यापूर्वी 10 डिसेंबर, 2003 रोजी ता.प्र.क्र. 36808, तसेंच दिनांक 31.5.2007, 13.7.2005, 5.7.2006 रोजी व दि.तसेच 17 मार्च रोजी सुध्दा हा प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. हा प्रश्न विचाराधीन आहे, शासन याबाबत विचार करीत आहेत असे उत्तर प्रत्येक वेळेस शासनाकडून आलेले आहे. दिनांक 5.7.2006 रोजी माननीय मंत्रीमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, हा प्रस्ताव सध्या वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. परंतु आज मात्र हा प्रस्ताव शासनाने अमान्य केलेला आहे असे उत्तर या ठिकाणी देण्यात आलेले आहे. नगरपालिकांच्या शाळेत काम करणा-या आमच्या शिक्षकांना 100 टक्के अनुदान मिळत असते फक्त या शाळा नगरपालिकांकडून चालविल्या जातात एवढाच काय तो फरक आहे. या शिक्षकांना पेन्शन योजना लागू आहे. या शिक्षकांना 100 टक्के वेतन शासनाकडून मिळत असतांना खाजगी अनुदानित संस्थांमध्ये वैद्यकीय खर्चाची प्रतीपूर्ती तसेच रजा प्रवास सवलत

....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37350** .......

श्री. रामनाथ मोते....

या योजना सुरु आहेत त्यामुळे या शिक्षकांनाही वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती तसेच रजा प्रवास सवलत मिळण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यावेळेस त्यांनी दोन्ही विभाग मिळून यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. त्यामुळे आपण आता जो नकारात्मक दृष्टिकोनाचा निर्णय घेतलेला आहे त्याचा आपण फेरविचार करणार का? आणि या ठिकाणी काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतीपूर्ती तसेच रजा प्रवास सवलत दिली जाईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे महानगरपालिका आणि नगरपालिकेचे कर्मचारी आहेत. शासन त्यांच्या पगारासाठी 100 टक्के अनुदान तसेच पेन्शन देत असते. नगरविकास खात्याने याबद्दलचा निर्णय घेण्यात येईल असे निवेदन केले होते. वैद्यकीय खर्चाची प्रतीपूर्ती तसेच रजा प्रवास सवलत एवढाच प्रश्न आहे. त्यामुळे हा खर्च नगरपालिका आणि महानगरपालिका यांनी करावा अशी शासनाची अपेक्षा आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्यातील सुमारे 20 लाख कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतीपुती तसेच रजा प्रवास सवलत योजना लागू आहे. नगरपालिकेमध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिकचे जे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना 100 टक्के अनुदान शासन देत असते. दोन्ही विभाग एकत्र बसून यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल असे आपण या सभागृहात उत्तर दिलेले आहे. वैद्यकीय खर्चाची प्रतीपूर्ती तसेच रजा प्रवास सवलत दिली तर शासनावर त्याचा फार काही बोजा पडणार नाही. विदर्भामध्ये 45 शाळा असून पश्चिम महाराष्टरत फक्त 7 शाळा आहेत बाकी कोठेही हा प्रश्न नाही. त्यामुळे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेंचे जे कर्मचारी आहेत वैद्यकीय खर्चाची प्रतीपूती तसेच रजा प्रवास सवलत देण्याच्या संदर्भात नगरविकास मंत्र्यांनी या सभागृहात उत्तर दिलेले आहे की, "हे जर जी.आर.काढणार असेल तर आम्ही देतो." प्रश्न केवळ नगरविकास विभागाने जी.आर. काढावयाचा आहे व पैसे शालेय शिक्षण विभागाने द्यावयाचे आहेत. शिक्षणमंत्री पैसे देण्यास तयार आहेत. परंतु नगरविकास खाते

....4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37350** .......

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे....

जी.आर.काढण्यास तयार नाही. त्यामुळे सभापती महोदय, या प्रश्नांच्या संदर्भात आपण आम्हाला न्याय द्यावा अशी विनंती आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित असल्यामुळे या प्रश्नाला निश्चित न्याय मिळेल अशी अपेक्षा करतो. म्हणून एक महिन्याच्या आत ज्यांना तुम्ही 100 टक्के अनुदान देता त्या 100-1200 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी वैद्यकीय खर्चाची प्रतीपुती तसेच रजा प्रवास सवलत योजना लागू करणार आहात काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नाशिक, कोल्हापूर, मुंबई आणि ठाणे महानगरपालिका वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती तसेच रजा प्रवास सवलत योजना शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना देत आहेत. शासन या कर्मचा-यांना 100 टक्के अनुदान देते ही गोष्ट खरी आहे परंतु तरी सुध्दा दोन्ही खात्यानी मिळून या प्रश्नाच्या संदर्भात निर्णय घेतो.

यानंतर श्री.गायकवाड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37350...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय दिला पाहिजे. लहानशा गटाच्या संदर्भातील हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळत नसल्यामुळे 13 शिक्षक मरण पावलेले आहेत.

**उपसभापती** : एकाच प्रश्नावर अधिक वेळ चर्चा करणे योग्य होणार नाही. बाकीच्या विभागाचे देखील महत्वाचे प्रश्न आहेत .

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, उपेक्षित घटकांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे नगरविकास विभाग आणि शालेय शिक्षण विभाग अशा दोन्ही विभागाने एकत्रित विचार करुन निर्णय घेण्याच्या संदर्भात आपण निदेश द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : मी निदेश देणार नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : मग आपण शासनाला सूचना द्याव्यात.

**उपसभापती** : दोन्ही विभागाने एकत्रितपणे बसून लवकर निर्णय घ्यावा.

श्री.हसन मुश्रीफ : होय.

----

**तारांकित प्रश्न क्रमांक 38439**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र कुर्मी क्षत्रिय समाजाला ओबीसी आरक्षण मिळण्याबाबत**

**(७) * ३८१४५ श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कुर्मी क्षत्रिय समाज यांनी कुर्मी पोटजातीला कुणबी समकक्ष मानून त्या जातीला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) नॅशनल ओबीसी कमिशन न्यू दिल्ली यांनी कुर्मी समाज हा कुणबी आहे अशी मान्यता दिली आहे हे खरे आहे काय,

(३) याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.धर्मारावबाबा आत्राम,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (१) होय.

(२) दिनांक १७.१.२००६ चे भारत सरकारचे राजपत्रात अनुक्रमांक ७ वर महाराष्ट्र राज्यासमोर अनुक्रमांक ७० वर "कुंबी" या उप जातीमध्ये "कुर्मी" या जातीचा समावेश आहे.

(३) राज्य मागासवर्ग आयोगाकडून "कुर्मी" जाती समुहाचा सर्वेक्षण अहवाल मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये विशेषत: विदर्भात , मराठवाडयातील काही भागात आणि खानदेशमध्ये कुर्मी समाज मोठया संख्येने राहत आहे. हा समाज काही काल महाराष्ट्रात आलेला नाही. तो पूर्वीपासूनच महाराष्ट्रात राहतो. कुर्मी आणि कुणबी या समाजाचा उल्लेख मंडल आयोगाच्या अहवालामध्ये करण्यात आलेला आहे. तेव्हा त्याच्या संबंधीचा प्रस्ताव मागासावर्ग आयोगाकडे न पाठविता कुर्मी पोटजातीला कुणबी समकक्ष मानून त्यांना या सवलती देता येऊ शकेल तेव्हा या प्रमाणे त्यांना सवलती देण्यात येतील काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, 2005 मध्ये राज्य मागासवर्ग आयोगाकडे हा अर्ज पाठविण्यात आला होता आणि त्यांचा लवकरात लवकर निर्णय येईल. सहा जिल्हयाशी संबंधित हा प्रश्न आहे. तेव्हा राज्य मागासवर्ग आयोगाकडून अहवाल आल्यानंतर तो अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवून त्याला मान्यता देण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, एखाद्या जातीचा उल्लेख मंडल आयोगाच्या अहवालामध्ये जर करण्यात आला नसेल तर राज्य मागासवर्ग आयोगाकडे त्याची तपासणी करण्यासाठी पाठविण्यात येते परंतु मंडल आयोगाच्या शिफारशीमध्ये या समाजाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. हा समाज महाराष्ट्रात आहे असा मंडल आयोगाच्या अहवालामध्ये उल्लेख आलेला आहे.तेव्हा कुर्मी समाजाला कुणबी समजाच्या समकक्ष किंवा तत्सम मानून खुलासा



VTG/ D/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयाचा आहे. तेव्हा हा खुलासा करण्यात येणार आहे काय ? जर हा प्रस्ताव राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात आला तर त्यामुळे कालापव्यय होईल तो न करता जो सरळ मार्ग आहे तो अवलंबणार आहात काय ?

श्री.धर्मराव बाबा आत्राम : सभापती महोदय, दिनांक 14.5.2005 रोजी या समाजाचा अर्ज राज्य शासनाकडे आला होता त्यानंतर हा अर्ज राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात आला होता. त्यांच्याकडून लवकरात लवकर अहवाल यावा या दृष्टीने राज्य शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. सहा जिल्हयाचा हा प्रश्न असून तीन जिल्हयाचे राज्य मागासवर्ग आयोगाने सर्वेक्षण केले आहे. त्यांच्याकडून अधिकची माहिती येणे बाकी आहे.. या संदर्भात त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर तो मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्यात येईल व त्याला मान्यता देण्यात येईल.

--- --

**तारांकित प्रश्न क्रमांक 40479**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

-----

**तारांकित प्रश्न क्रमांक 37505**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पावसाळ्यापूर्वी म्हाडाने मुंबईतील धोकादायक इमारतींची पहाणी करुन धोकादायक इमारतींच्या यादीतून वगळलेल्या इमारती कोसळ्याबाबत**

**(१०) * ४०८६८ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. जगदीश गुप्ता , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री.सागर मेघे , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळ्यापूर्वी म्हाडाने मुंबईतील धोकादायक इमारतींची पहाणी करुन एकुण ७१ इमारती धोकादायक म्हणून घोषित केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) या ७१ इमारतींमध्ये ग्रॅन्टरोडची गिरीधरभवन व डोंगरीची गुडहोम इमारत या दोन इमारती नव्हत्या, हे खरे आहे काय,

(३) या दोन इमारती म्हाडाच्या असूनही त्या पावसाळ्यापूर्वी सुरक्षित असल्याचे जाहिर केले असताना त्या पावसाळ्यात कोसळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) धोकादायक इमारतींची पाहणी करणाऱ्या म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड प्रीतमकुमार शेगावकर,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय, या इमारतींचा त्यामध्ये समावेश नव्हता.

(३) या दोन्ही इमारती उपकरप्राप्त आहेत. सदर इमारती पावसाळ्यापूर्वी सर्वेक्षणात धोकादायक आढळून आल्या नव्हत्या. सदर इमारती कोसळण्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१) इमारतीचे मालक व रहिवासी यांनी अनधिकृतपणे इमारतीच्या संरचनेत केलेला बदल.

२) इमारतीमधील रहिवाशांनी आपल्या सदनिकेत अनधिकृतपणे केलेले बदल

३) इमारतीच्या मागील बाजूस असलेली हाऊस गल्ली पूर्णत: घाणीने व पाण्याने भरलेली असणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय,ग्रॅन्ट रोड येथील गिरीधर भवन आणि डोंगरीची गुडहोम इमारत या दोन्ही इमारती धोकादायक इमारती नव्हत्या असे म्हाडाने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलेले आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे.तरी देखील हया इमारती कोसळल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.इमारतीचे मालक आणि रहिवासी यांनी अनधिकृतपणे इमारतीच्या संरचनेत केलेला बदल यामुळे या इमारती कोसळल्या आहेत असे उत्तरात पुढे म्हटलेले आहे. इमारत कोसळल्यामुळे वित्तीय हानी जीवित हानी होण्याचे गंभीर प्रकार घडत असतात . तेव्हा या इमारतीचे सर्वेक्षण चुकीचे केले असेल तर सबंधिताविरुध्द शासन कोणती कडक कारवाई करणार आहे आणि ज्या घर मालकांनी आणि रहिवाशांनी अनधिकृतपणे इमारतीच्या संरचेत बदल केलेला आहे त्यांना वचक बसविण्याच्या दृष्टीने शासन त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करणार आहे ?

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40868....

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, 2007 मध्ये इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने पावसाळ्यापूर्वी 71 इमारती धोकादायक म्हणून जाहीर केल्या होत्या. त्यामध्ये या इमारतींचा समावेश नव्हता. या इमारती ज्या पडल्या आहेत त्यातील ग्रँटरोड येथील भडकमकर मार्गावरील गिरीधर भवन ही इमारत पडली आहे आणि त्यामध्ये 2 स्त्रिया व 3 बालके दगावली होती. ही इमारत मुख्यत्वे तेथील रहिवाशांनी अंतर्गत दुरूस्ती केल्यामुळे पडली होती. तसेच दुसरी इमारत ही डोंगरी भागातील गुडहोम नावाची इमारत पडली होती. त्या ठिकाणी देखील इमारतीतील रहिवाशांनी दुरूस्ती केल्यामुळे ती पडली आहे. या दोन्ही इमारतीतील लोकांना आपण मदत केली असून संबंधितांवर गुन्हे दाखल करून कारवाई केलेली आहे. त्याचप्रमाणे जे अपघातग्रस्त आहे त्या लोकांना शासनाने आर्थिक मदत देखील केलेली आहे.

श्री. गुरूमुख जगवानी : माननीय सभापति महोदय, ग्रांट रोड पर जो बिल्डिंग गिरी है उसके निवासियों को अल्टरनेट जगह दी गयी. जखमी लोगों को मुआवजा दिया जाता है. मैं पूछना चाहता हूं कि 33(7) की रिडेवलपमेंट की जो यादी डिक्लेयर की है उसमें से कितने लोगों को आर्डर दी गयी है. क्या आप उसकी कोई यादी डिक्लेयर कर रहे हैं ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, ती यादी पटलावर ठेवण्यात येईल.

***

<u>ता. प्र. क्रमांक 37708</u>

**सन्माननीय सदस्य अनुपस्थित.**

***

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..... एफ 2 ...

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुढील 25 वर्षाचा तयार केलेला विकास आराखडा.**

**(12) * 37452 श्री. गोविंदराव आदिक, श्री. संजय दत्त, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. सुरेशदादा देशमुख, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री.राजन तेली** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केवळ मुंबई शहर, उपनगरापुरता विचार न करता महानगरालगतच्या सहा महानगरपालिका व 13 नगरपरिषदा या चार हजार 355 चौरस किलो मिटर परिसराचा विकास झपाट्याने करण्याच्यादृष्टीने मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने पुढील 25 वर्षामध्ये मुंबई महानगरप्रदेशाच्या विकासासाठी लागणाऱ्या या गरजांचा व सुविधांचा सर्वकंष आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर आराखडा शासनाला सादर करण्यात आला आहे काय व त्याला शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(3) असल्यास, 25 वर्षाचे नियोजन असलेल्या आराखड्याचे थोडक्यात व महत्वाचे असे स्वरूप काय आहे,
(4) असल्यास, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई व उपनगरांच्या विकासाचा आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू केली असतांना आता हा सहा महानगरपालिका व 13 नगरपरिषदांचा समावेश असलेला नविन आराखडा पुन्हा तयार करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) होय. मुंबई ट्रान्सफॉरमेशन प्रोजेक्ट अंतर्गत प्राधिकरणाने संपूर्ण महानगर प्रदेशाच्या विकासासाठी एक कार्य योजना (Business Plan) तयार करण्याचे काम सल्लागारांमार्फत हाती घेतले आहे.
(2) सदर कार्ययोजना सल्लागारांमार्फत तयार करण्यात येत असून आतापर्यंत सल्लागारांनी कार्ययोजनेचा प्रारुप अंतिम अहवाल (Draft Final Report) प्राधिकरणास सादर केला आहे. यावर प्राधिकरणामध्ये विचारविनिमय करण्यात येत आहे.
(3) सदर कार्ययोजनांतर्गत खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

1) मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाची दिशा, उद्दिष्टये व निती,
2) अर्थव्यवस्था व विकासाची दिशा,
3) जमीन, स्थावर मालमत्ता व गृहनिर्माण,
4) विकासाचे पर्याय व त्यांचा पायाभूत सुविधांवरील परिणाम,
5) भांडवली गुंतवणूकीच्या गरजा व कार्यक्रम,
6) निधी उभारणी व वित्त व्यवस्थेची योजना,
7) शासन यंत्रणा,
8) संनियंत्रण व मूल्यमापन

मुख्यत्वे यामधून मुंबईसह संपूर्ण महानगर प्रदेशातील नागरी व इतर क्षेत्रांच्या पायाभुत सुविधांमधील गुंतवणूकीच्या गरजा निश्तिच केल्या जातील व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी संस्थात्मक आणि वित्तीय रचना निश्चित केली जाईल.

..... एफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 37452 .....

(4) सध्या बृहन्मुंबईमध्ये प्राधिकरणाने हाती घेतलेली कामे ही मुख्यत: वाहतुक व परिवहन सुधारण्यासंबंधी आहेत. मुंबई महानगराला जागतिक महानगराचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुंबई परिवर्तन प्रकल्प हाती घेतला आहे. सदर कार्ययोजना ही या प्रकल्पांतर्गत संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वंकष विकासासाठी तयार करण्यात येत आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या ठिकाणी आमच्या पहिल्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिले आहे. पण हे कार्य मंदगतीने चालले आहे तेव्हा केव्हा पर्यंत ही भुयारी रेल्वे प्रत्यक्षात सुरू होणार आहे ? गेल्या चार वर्षापासून हे काम पेंडींग आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मुंबई ट्रान्स्फॉर्मेशन प्रोजेक्ट अंतर्गत मुंबईच्या सर्व इन्फ्रास्ट्रक्चरच्या दृष्टीकोनातून म्हणजे मुंबई महानगर विभाग आहे त्या दृष्टिकोनातून इन्फ्रास्ट्रक्चर कसे असावे या दृष्टीने त्याची दिशा, उद्दिष्टे ठरविण्यासाठी एक खाजगी एजन्सी ठरविण्यात आली होती, सल्लागार नेमण्यात आला होता. त्यांचा ड्राफ्ट रिपोर्ट तयार झालेला आहे आणि एमएमआरडीएच्या बैठकीमध्ये या संदर्भातील या रिपोर्टला मंजुरी दिली जाईल. त्यामध्ये मुंबईच्या आणि महानगर परिसरातील स्ट्रॉम वॉटर ड्रेन असेल, पाणीपुरवठा असेल, सॅनिटेशन असेल, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा विषय असेल, हौसिंग आणि रिअल इस्टेटचा विषय असेल एवढेच नाही तर मुंबईच्या ओव्हर ऑल इकॉनॉमिक डेव्हलपमेंटच्या दृष्टिकोनातून जे जे विषय असतील असा एकूणच बिझनेस प्लॅन त्यांनी तयार केलेला आहे. तो एमएमआरडीएच्या माध्यमातून मंजूर होऊन शासनाकडे येईल आणि त्याला शासनाने मंजुरी दिल्यानंतर जवळ जवळ 2 लाख 25 हजार कोटी रूपयांचा हा प्लॅन आहे. त्यात प्रायव्हेट तसेच पब्लिक पार्टनरशिप कशी असावी, बॉरोईंग कसे असावे, राज्य सरकारचा हिस्सा त्यात किती असावा, केंद्र सरकार आणि तत्सम एजन्सीचा किती व कसा असावा या सगळ्याच अनुषंगाने फंड रेझिंग कसे असावे वगैरे बाबींचाही विचार करून मसुदा तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे लवकरच त्याला मंजुरी देण्याच्या दृष्टिकोनातून कारवाई केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी आपल्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आपण या एमएमआरडीएचा प्रोजेक्ट आणि फ्यूचरिस्टिक प्लॅनचा दाखला देत आहात. त्यामध्ये येथे दिलेल्या प्रश्न 4 च्या उत्तरात आपण रेल्वे

...... एफ 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 37452 .....

आणि ट्रान्स्पोर्टेशनच्या संदर्भात सांगितले आहे. माझा या संदर्भात असा प्रश्न आहे की, एमएमआरडीए एक तर म्हणावे तितके लक्ष त्यांचे बाकीचे जे विभाग आहेत, उदा. ठाणे शहर आहे, मिरा-भाईंदर महानगरपालिका आहे, यांच्याकडे लक्ष देत नाही. तुम्हाला इन्फ्रास्ट्रक्चरली मुंबई मजबूत करावयाची असेल तर जोपर्यंत तुम्ही ठाणे आणि मीरा-भाईंदरचे इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्थित करीत नाही तोपर्यंत मुंबईला म्हणावा तसा न्याय मिळणार नाही. कारण प्रेशर जे वाढते आहे ते नवी मुंबई, ठाणे व मीरा-भाईंदर महापालिका परिसरामध्येच. तुम्ही तेथील लोकसंख्यावाढीचा आलेख घेतला तर आपल्याला दिसून येईल की, आज ठाणे शहराची लोकसंख्यावाढ ही देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. ठाणे शहरातील लोकसंख्या ज्या गतीने वाढते आहे. म्हणून माझा नेमका प्रश्न असा आहे की, रेल्वे ट्रान्स्पोर्टेशन जे आहे किंवा आपण परिवहन खात्याचे जे प्राधिकरण निर्माण करीत आहात ते लक्षात घेता ....

( यानंतर श्री. सरफरे .... जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/ 12:30

ता.प्र.क्र. 37452....

श्री. जितेंद्र आव्हाड...

मेट्रो रेल्वे मुंलुंडपर्यंत आणली आहे. याबाबतीत आपल्या एम.एस.आर.डी.सी. ने सर्व्हे करुन ही मेट्रो रेल्वे मुलुंडपासून घोडबंदरपर्यंत आणून आणि तेथून पुन्हा यू टर्न घेऊन ती बोरीवलीपर्यंत नेली पाहिजे. तिथपर्यंत गेल्यानंतर पुढे ती मीरा-भाईंदर पर्यंत तेथील ट्रान्सपोर्टला आपोआप लिंकअप होईल. त्यामुळे तिचे कार्यक्षेत्र वाढेल आणि त्या भागातील लोकांना सुध्दा त्याचा फायदा होईल. अशाप्रकारचा प्रस्ताव तयार करुन आपण त्याला मंजूरी देणार काय? एम.एम.आर.डी.ए. हे प्राधिकरण फक्त मुंबई शहराकरिता नसून ते सर्वांसाठी आहे. त्यामुळे या योजनेमध्ये आम्हाला हिस्सा मिळेल की नाही?

श्री.राजेश टोपे : मुंबई महानगराचा भाग हा रिजनल एम.एम.आर.डी.ए. चा भाग आहे. सर्व भागांच्या दृष्टीकोनातून सर्वंकष ट्रान्सपोर्टेशनचा प्रकल्प तयार केला आहे. या अनुषंगाने ठाणे जिल्हयातील जेवढया महानगरपालिका आहेत त्या सर्व त्यामध्ये अंतर्भूत आहेत. त्यामुळे केवळ रेल्वे नाहीतर यामध्ये रोड असेल, वॉटर वेज असेल, जेवढे पोटेंशिअल असेल त्याचा उपयोग करुन आपल्याला कुठूनही कुठे एक तासामध्ये जाता येईल. अशापध्दतीचा ट्रान्सपोर्टेशनच्या दृष्टीकोनातून एम.एम.आर.डी.ए. ने फॉर्म्युला तयार केला आहे. मास ट्रान्सपोर्टेशनच्या दृष्टीकोनातून सुखकर प्रवास होण्यासाठी अशाप्रकारचे नियोजन करण्यात येत आहे. माननीय सदस्यांनी ठाणे जिल्हयाच्या संदर्भात प्रश्न विचारतांना मेट्रो रेल्वेची हद्द पुढे वाढविणार की नाही असे विचारले आहे. त्याचे उत्तर निश्चितपणे "होय" असे आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे जिल्हयासंबंधी प्रश्न विचारला. ठाणे जिल्हयातील महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रचंड लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे ठाणे शहरामध्ये पाणी टंचाईला लोकांना सामोरे जावे लागत आहे. ज्याप्रमाणे आपण वीजेचे ग्रीड बांधले त्याप्रमाणे इंटर्नल वॉटर सप्लाय ग्रीड बांधण्याची एम.एम.आर.डी.ए. ची आणि ठाणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे. हे ग्रीड ठाणे महानगरपालिका आणि एम.एम.आर.डी.ए. एकत्रितपणे बांधणार आहे काय? विकास आराखडा तयार करण्याची जबाबदारी आपण एम.एम.आर.डी.ए. कडे द्यावी.आणि त्यांच्या पैश्यामधून इंटर्नल वॉटर सप्लाय ग्रीड तयार करणार काय? ते केल्याशिवाय ठाण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. म्हणून अशाप्रकारची व्यवस्था करण्यात येईल काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

ता.प्र.क्र. 37452....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केली आहे. ठाणे जिल्हयामध्ये सहा महानगरपालिका आणि अनेक नगरपालिका आहेत. त्यामुळे एखाद्या ठिकाणी जर पाणी पुरवठयाचा प्रॉब्लेम आला तर इंटर्नल ग्रीडमधून कनेक्शन चालू ठेवून पाणी पुरवठा करणे निश्चितपणे शक्य होईल. त्यामुळे इंटर्नल वॉटर सप्लाय ग्रीडची कल्पना चांगली असून त्याबाबत विचार करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए. च्या स्थापनेपासून ठाणे जिल्हयाला एम.एम.आर.डी.ए. कडून सहकार्य मिळाले नाही. खरे म्हणजे इतक्या वर्षानंतर ठाणे जिल्हयाचा बॅकलॉग वाढलेला आहे. कोणतीही योजना बनवीत असतांना किंवा नियोजन करीत असतांना जिल्हयाचा प्रचंड वाढलेला बॅकलॉग तसाच राहिला आहे. हा अनुशेष दूर करण्यासाठी आतापर्यंत किती रक्कम खर्च करण्यात आली? दुसरा प्रश्न असा आहे की, ही योजना केव्हा मंजूर होणार आहे? मंत्रिमहोदयांनी प्लॅन तयार केला आहे, असे सांगितले व त्याची सी.डी.देखील आम्हाला दाखविली. तेव्हा या योजनेला प्रत्यक्षात मंजूरी केव्हा मिळेल आणि काम केव्हा सुरु होणार आहे? तसेच, पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणात असून मोरबे आणि शाई धरणाकरिता एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून निधीची व्यवस्था केली जाणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, विधानपरिषदेमध्ये दिलेल्या आश्वासनानुसार निधीच्या वितरणासंबंधी एम.एम.आर.डी.ए. च्या रिजनमधील लोकप्रतिनिधींची बैठक घेतली होती. त्यामुळे कोणत्याही भागाचा अनुशेष वाढून त्यांच्यावर अन्याय होईल अशाप्रकारची स्थिती असू शकणार नाही. नगरपालिकेचे सुध्दा प्रतिनिधी एम.एम.आर.डी.ए. मध्ये घेण्यात आले आहेत. तसेच, महानगरपालिकेचे सुध्दा प्रतिनिधी घेण्यात आले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.37452 . . . .

श्री.राजेश टोपे . . . .

काही ग्रामपंचायत आहेत, त्यांनाही त्याठिकाणी प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे. त्यामुळे कुठेतरी अनुशेष निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण होणार नाही किंवा अनुशेष हा शब्द उपस्थित होणार नाही. फक्त एवढीच भावना आहे की, ठाणे जिल्हयामध्ये सुध्दा विकास व्हावा, केवळ मुंबईपुरताच विकास होऊ नये ही भावना निश्चितपणे योग्य आहे आणि त्या अनुषंगाने पुढील निधीचे वितरण करण्यात येईल एवढेच मी निधी वितरणाच्या संदर्भात सांगू इच्छितो. मी आताच कामांच्या मंजूरीच्या बाबतीत सांगितले आहे की, एम.एम.आर.डी.ए.ची बोर्ड मिटींग लवकरच होणार आहे. त्यानुसार बोर्डाच्या बैठकीमध्ये सल्लागारांनी तयार केलेला जो ड्राफ्ट प्लॅन आहे, त्याला मंजुरी दिली जाईल आणि त्यानंतर तो शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला जाईल. शासनाकडे हा प्लॅन आल्यानंतर त्याला लवकरच मंजुरी दिली जाईल. त्यामुळे एम.एम.आर.डी.ए.कडून शासनाकडे शिफारस आल्यानंतर अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल. मोर्बे धरणाच्या बाबतीत सांगावयाचे तर मी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये इन्फ्रास्ट्रक्चरच्या संबंधातील वॉटर सप्लाय, स्टॉम वॉटर ड्रेनेज, सॅनिटेशन इ.सर्व बाबीं विषयी बोललो आहे आणि या सर्वच गोष्टी यामध्ये कव्हर करावयाच्या आहेत. त्यामुळे एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून निश्चितपणे निधी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत अडचण असण्याचे कारण नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, अन्याय दूर होईल, पण अगोदर किती अनुशेष होता ? असा मी प्रश्न विचारला होता.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये याचे सर्व विश्लेषण झालेले आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्सयांनी असा प्रश्न विचारलेला आहे की, ठाणे जिल्हयामध्ये काही अनुशेष निर्माण झालेला आहे काय ? खरे म्हणजे प्रत्येक विभागाचा विकास करण्याची पहिली जबाबदारी ही त्या-त्या महानगरपालिकेची आहे. एम.एम.आर.डी.ए.ही जी संस्था आहे, त्यांची भूमिका ही सप्लीमेंटरी स्वरुपाची आहे. महानगरपालिका जे प्रकल्प करु शकत नाही असे प्रकल्प निवडून त्यासाठी निधी देण्याचे काम एम.एम.आर.डी.ए.चे आहे याची आपल्याला कल्पना आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबतीत सांगावयाचे तर कालपर्यंत आपण मुंबई आणि मुंबई परिसर ...

. . . .एच-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37452 . . . .

श्री.विलासराव देशमुख . . . .

एवढाच विचार करीत होतो. आता आपण "एमएमआर" चा साधारणपणे 4500 स्वे. कि. मी. इतका विस्तार केलेला आहे आणि त्याचा प्लॅन तयार केलेला आहे. हा प्लॅन एक वर्षात, दोन वर्षात किंवा चार वर्षात नाही तर तो पूर्ण करण्यासाठी 2020, 2021 पर्यंतचा कालावधी लागेल. त्यासाठी निधी उपलब्ध करणे किंवा यासाठी जागतिक बँक वा इतर वित्तीय संस्थांची मदत घेण्यासंबंधीचे देखील काम आहे. तसेच प्रामुख्याने ट्रान्सपोर्ट वाढविणे आणि सतत मुंबईमध्ये लोकांनी गर्दी करण्यापेक्षा जर आपण त्या परिसरामध्ये अधिक सुविधा निर्माण केल्या तर मुंबईला येणे आणि परत जाणे हे जे अंतर आहे, ते तासाभराच्या आत पूर्ण करता येईल अशा पध्दतीचे आपण नियोजन केलेले आहे. म्हणून हे नियोजन करीत असताना ठाणे शहरावर किंवा इतर ठिकाणी काही बॅकलॉग निर्माण झाला आहे याबाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आले. पण ही संस्था बॅकलॉग निर्माण करणारी नसून तर ही मदत करणारी संस्था आहे. म्हणून प्रामुख्याने त्या-त्या विभागामध्ये बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याची जबाबदारी तेथील महानगरपालिकेची आहे. अशा वेळी त्यांना जर एखादे काम करणे शक्य नसेल तर ते काम आम्ही करु इच्छितो. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, आमच्याकडे मेट्रो रेलची सुध्दा व्यवस्था झाली पाहिजे आणि त्या माध्यमातून आपल्याला अधिक चांगल्या प्रकारची कनेक्टीव्हीटी निर्माण करता येईल. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, हे सर्व प्रस्ताव विचाराधीन आहेत. त्यामुळे ठाणे शहरामध्ये स्काय रेल असेल किंवा मेट्रो रेल असेल तर त्याचा अभ्यास करण्याचे काम एम.एम.आर.डी.ए.ने हाती घेतलेले आहे. तसेच आपण काही मोठे रस्ते निर्माण काम देखील हातामध्ये घेतलेले आहे. काही फ्लाय ओव्हर निर्माण करण्याचे काम देखील हातामध्ये घेतलेले आहे. म्हणून मुंबईतील गर्दी कमी करण्यासाठी ठाणे येथे अधिक व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारण पहिला टप्पा ठाणे आणि मग राहिलेले मुंबई असाच नियोजनाचा भाग आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मघाशी मी प्रश्न विचारला होता, तेव्हा मला असे सांगण्यात आले होते की, पुढच्या प्रश्नाच्या वेळी प्रश्न विचारावा. त्यावेळी मला मोरबे धरणाच्या अनुषंगाने प्रश्न विचारावयाचा होता. 2002 मध्ये लोकशाही आघाडी शासनाने ठाणे विभागासाठी शाई धरणाचा प्रकल्प मंजूर केला. पण आर्थिक क्षमतेअभावी या कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता .....

. . . .एच-3



APR/ KTG/D/ 12:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

दिसून येत नाही. पण ठाणे महानगरपालिकेने हा प्रकल्प सात वर्षे असाच रखडून ठेवला, त्यामुळे ठाणे शहरामध्ये पाण्याची मारामार सुरु आहे. आम्ही आपल्याकडे एक प्रस्ताव दिला आहे.ज्याच्या माध्यमातून एम.एम.आर.डी.ए.ने शाही धरण पूर्ण करावे, जेणेकरुन ठाणे शहरातील पाण्याची समस्या 2040 पर्यंत नाहिशी होईल. यासाठी आपण मानवतेच्या दृष्टीकोनातून या प्रस्तावाला गती देऊन, त्याला मंजुरी देणार आहात काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर तो एम.एम.आर.डी.ए.च्या विचाराधीन आहे. त्यासंदर्भात योग्य तो निर्णय लवकर घेण्यात येईल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाला मानवतेच्या दृष्टीकोनातून मंजुरी देणार आहात काय ? असे विचारलेले आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, शासन मानवतेच्या दृष्टीकोनातूनच काम करीत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी एक व्यापक स्वरुपाचे उत्तर दिले आहे. माझ्यासमोर एक प्रश्न उपस्थित झालेला आहे की, एम.एम.आर.डी.ए.ने ज्या काही जबाबदाऱ्या घेतल्या आहेत, त्याच्या अधीन राहून त्यांनी एक अहवाल तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. पण त्या अहवालामध्ये दोन महत्वाच्या गोष्टी समाविष्ट असल्याचे माझ्या नजरेस आलेले नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37452...... श्री. मधुकर सरपोतदार ....

एक गोष्ट अशी आहे की, या मुंबई शहरामध्ये किती लोकवस्ती ठेऊ शकतो आणि विकास कोठपर्यंत करु शकतो ? परिवहन सेवेच्या बाबतीत ठाण्यातून मुंबईला येण्यासाठी किंवा मिरा- भाईंदरवरुन मुंबईला येण्यासाठी कमी वेळ लागावा हे मान्य आहे. परंतु मुंबईतल्या मुंबईत अंतर कापावयास एक तास पुरत नाही अशी आजची परिस्थिती आहे. यादृष्टीकोनातून परिवहन जलद गतीने व्हावयास पाहिजे. बसचे ट्रान्सपोर्टेशन असेल, रेल्वेचे टान्सपोर्टेशन असेल ते जलद गतीने व्हावयास पाहिजे. रस्ते जास्त रुंद करुन, पदपथावर असलेली अतिक्रमणे काढून मुंबई शहर आदर्श करुन हे शहर जागतिक दर्जाचे शहर करावयाचे आहे असा शब्द आपण अनेक योजनांमध्ये वापरतो. परंतु मुंबई शहर प्रतिदिन बकाल होत चालले आहे. त्यादृष्टीने या योजनेच्या संदर्भात या ठिकाणी ज्या आठ बाबी दिलेल्या आहेत त्यात या दोन मुद्यांबाबत काही उल्लेख दिसत नाही. या दृष्टीने विचार करुन उपाययोजना करण्याबाबत एमएमआरडीए काय पावले उचलणार आहे ? माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्राथमिक जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेचे काही अधिकार काढून एमएमआरडीएकडे दिलेले आहेत. त्या दोघांच्या समन्वयातून ही कामे व्हावयास पाहिजेत असे सगळ्यांचे मत आहे. उभयतांची ही जबाबदारी आहे. ठाणे महानगरपालिका असेल, मिरा-भाईंदर महानगरपालिका असेल त्या ठिकाणी सुध्दा ही दोघांची जबाबदारी आहे. त्यादृष्टीकोनातून काही उपाययोजना आहे काय ? मुंबई शहरात किती लोकवस्ती असावी याबाबतीत काही उपाययोजना केली आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी लोकवस्तीच्या संदर्भात प्रश्न विचारला. मुंबईमध्ये येणारे लोंढे या प्रश्नाच्या संदर्भात आपण नेहमीच या सभागृहामध्ये चर्चा करतो. मुंबईमध्ये येणारे जे लोक आहे त्या येणाऱ्या लोकांना कायद्याप्रमाणे जो अधिकार आहे किंवा हक्क आहे त्याप्रमाणे जे लोक येतात त्यांना व्यवस्थित सुविधा मिळाव्यात यादृष्टीकोनातून बिझनेस प्लॅन तयार करण्यात आला आहे. मुंबईतल्या मुंबईत प्रवास करण्यासाठी एक तासापेक्षा जास्त वेळ लागतो हे मान्य आहे. यामध्ये मोनोरेल करणे, फीडर रेल करणे वगैरे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37452...... श्री. राजेश टोपे ....

बाबी आहेत. मेट्रो रेल्वेचे काम सुरु झाले आहे. मोनोरेलची व्यवस्था करणे तसेच एमयूटीपी प्रकल्प 1 आणि 2 च्या माध्यमातून रेल्वेच्या जास्त गाड्या तसेच जास्त डबे उपलब्ध करणे, रस्ते सुधारणे या सगळ्या गोष्टी आहेत. प्रवास व्यवस्थित व्हावा यादृष्टीकोनातून या ठिकाणी काळजी घेण्यात आली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी टाटाची एक लाख रुपयांची कार या मुंबईमध्ये टाटाने प्रेझेंट केली त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, वाहतुकीची समस्या निर्माण होईल. यामध्ये शासनाने त्याचा विचार केला आहे काय ? ज्याप्रमाणे सिंगापूर, दुबई या शहरांमध्ये "टू कार वन होम" असे धोरण आहे त्याप्रमाणे या ठिकाणी एका घराला फक्त दोन कारचे रजिस्ट्रेशन मिळणार असे धोरण राबविणार काय ? शासनाने अनेक वेळा मुंबईतील जल वाहतुकीच्या बाबतीत या ठिकाणी घोषणा केल्या. आठ महिन्यात चालू होईल, दहा महिन्यात चालू होईल अशा घोषणा केल्या. बोरीवली ते नरीमन पॉइन्ट या ठिकाणी जल वाहतूक सुरु करताना त्या ठिकाणी खडक तसेच ओपन सी आहे त्यामुळे त्या ठिकाणी जल वाहतूक करता येणार नाही अशी परिस्थिती आहे. मी अनुभवी व्यावसायिक आहे. यादृष्टीकोनातून शासन याचा गंभीरपणे विचार करणार आहे काय ?

यानतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37452....

श्री.राजेश टोपे : 'टू कार वन होम' ही संकल्पना माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितली आहे. हा विचार करण्यायोग्य मुद्दा आहे असे मी निश्चितपणे म्हणेन. कमी किंमतीची नॅनो कार 1 लाख रुपयांमध्ये विकत घेता येते. अशा लहान वाहनांमुळे होणारी वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी निर्बंध लागू करता येतील काय याबाबत विचार करता येईल. परंतु मी इन्फ्रास्टक्चरबाबत पावले उचलल्याची माहिती दिली आहे. जल वाहतुकीबाबत ली कंसन्लटंट कंपनीला नेमलेले आहे. त्यांनी अहवालात जे जे सुचविले आहे, त्याबाबत लवकरच पावले टाकली जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय आपल्या भागाचा प्रश्न असल्यामुळे थोडासा अधिक वेळ या प्रश्नासाठी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. घटनेच्या कलम 343 मधील खंड (जी) व (इ) नुसार एमएमआरडीएची निवडणूक झाली पाहिजे. ती निवडणूक बरीच वर्षे घेतलेली नाही, ती केव्हा घेण्यात येईल ? इलेक्टोरोल कॉलेज तयार झालेले आहेत असे मी ऐकतो. त्यामुळे ही निवडणूक केव्हा होईल ते सांगावे. त्याचप्रमाणे ली कन्सलटंट कंपनीचा अहवाल सादर झालेला आहे. तो पुढील 15 वर्षासाठी लागू करावयाचा आहे. पण जेएनपीटीमध्ये तिप्पट बर्थ तयार होत आहेत. त्यामुळे तेथे 85 लाख टन वजनाच्या कंटेनर्सची वाहतूक होणार आहे. ही वाहतूक प्रामुख्याने पनवेल, ठाणे, डोंबिवली, कल्याण या मार्गाने होईल. या मुद्यासंबंधी शासनाने विचार केला आहे काय ?

श्री.राजेश टोपे : माननीय सदस्यांनी निवडणुकीसंबंधी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, निवडणुकीसंबंधी उत्तर मिळणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : आपल्याला पाहिजे तसे मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळणार नाही.

श्री.राजेश टोपे : कोकण विभागीय आयुक्तांनी निवडणुकीची प्रक्रिया सुरु केलेली आहे. त्या अनुषंगाने पुढील पावले उचलली जाणार आहेत. ली कन्सलटंट या कंपनीने वाहतुकीसंबंधी सर्वंकष अभ्यास केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी 85 लाख टन कंटेनर्सची वाहतूक होणार आहे असे म्हटले आहे. या मुद्याचा सुध्दा यात निश्चितपणे विचार झालेला आहे.

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावरील चार सदस्यांची पदे रिक्त असल्यामुळे चार महत्वाच्या परिक्षेचे निकाल रखडल्याबाबत**

**(१३) * ३८०९९ श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावरील चार सदस्यांची पदे रिक्त असल्यामुळे चार महत्वाच्या परीक्षेचे निकाल रखडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदस्यांची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) ही पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) व (३) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१६ अन्वये तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम १९७१ मधील भाग-२, नियम-५ नुसार लोकसेवा आयोगावर १ अध्यक्ष व ५ सदस्य अशा एकूण ६ नियुक्त्या शासनाकडून केल्या जातात. सदस्यांच्या नियुक्तीबाबतचे प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांमार्फत मा.राज्यपाल महोदयांच्या संमतीकरिता पाठविण्यात येतात. मा.राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून प्रस्तावाबाबत सर्वंकष विचार करुन संमती दिल्यानंतर सदर व्यक्तीची लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदावर नियुक्ती करण्यात येते. सदर कार्यपध्दती लक्षात घेता सदस्यांच्या नियुक्तीस काही कालावधी लागतो.

दि. १०.०३.२००८ च्या अधिसूचनांद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर तीन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर १ अध्यक्ष व ४ सदस्य अशा एकूण ५ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, 'एक अध्यक्ष व चार सदस्य अशा एकूण पाच सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.' हा प्रश्न विचारल्यानंतर दिनांक १०.३.२००८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे तीन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याचा अर्थ दिनांक १०.३.२००८ पूर्वी आयोगामध्ये एक अध्यक्ष व एक सदस्य नियुक्त केले होते आणि अजूनही एका सदस्यांची नियुक्ती करणे बाकी आहे. आयोगासारख्या जबाबदार संस्थेमध्ये सदस्यांच्या नियुक्त्या विलंबाने होण्याचे कारण काय ? महाराष्ट्र शासन आयोगाच्या नियुक्त्या करण्याबाबत विलंब करीत आहे, महामंडळाच्या अध्यक्षांच्या व सदस्यांच्या नियुक्त्या करण्यामध्ये विलंब करीत आहे, हा विलंब टाळण्यासाठी शासन काय उपाय करणार आहे ? राज्य महिला आयोगामध्ये अनेक वर्षापासून तीन जागा रिक्त आहेत. या नियुक्त्या होण्यासाठी व विलंब टाळण्यासाठी शासन कोणते उपाय करणार आहे ?

३....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३८०९९....

श्री.राजेश टोपे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये एकूण मंजूर पदे आहेत, त्यामध्ये एक अध्यक्ष व पाच सदस्य असे सहा सदस्य आहेत. यापैकी एक अध्यक्ष व चार सदस्य असे एकूण पाच सदस्यांची नियुक्ती केली आहे. नियुक्त्या होण्यामध्ये विलंब झाला आहे हे मला मान्य आहे. ३ वर्षापूर्वी कोर्टातील प्रकरणांमुळे व विविध कारणांमुळे भरती सुध्दा बंद होती.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(ता.प्र.क्र..38099..... (श्री. राजेश टोपे....)

म्हणजे रिक्त पदे भरण्याचे जे काम होते ते वेगवेगळया कारणामुळे बंद होते. नंतरच्या काळात सगळे निकाल लागल्यानंतर शासनाने सप्टेंबर पर्यन्त रिक्त जागा भरण्याचा निर्णय घेतला. त्या दृष्टीकोनातून एमएपीएससीच्या सदस्यांची भरती देखील केली. ही भरती करताना प्रथम शासनाच्या वतीने शिफारस केली जाते आणि ती शिफारस माननीय राज्यपालांनी मान्य केल्यानंतर नेमणूक केली जाते. या कार्यपध्दतीमुळे विलंब झालेला आहे. आता या सगळया गोष्टी पूर्ण केलेल्या असल्यामुळे त्याचा उपयोग नवीन भरतीमध्ये होणार आहे.

श्रीमती उषा दराडे : मंडळे आणि आयोगाची पदे भरलेली नाहीत. राज्य महिला आयोगाची पदे देखील भरलेली नाहीत. ही पदे भरण्यासाठी शासनाने कोणती काळजी घेतलेली आहे ?

श्री. राजेश टोपे : पदे लवकरात लवकर भरली जातील या दृष्टीने काळजी घेतलेली आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य शासनाने सुरु केलेली नागपूर शहरातील अनधिकृत लेआऊटमधील भूखंड नियमितीकरणाची योजना**

**(१४) * ३८९२६ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक : दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २१ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक ३६८७६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नागपूर शहरातील ५७२ आणि १९०० अनधिकृत लेआऊटमधील भूखंड नियमितीकरणाची सन २००१ मध्ये आणलेली योजना नागपूर सुधार प्रन्यासमार्फत राबविण्यात आली व गुंठेवारीनुसार भुखंड नियमितीकरणासाठी या अनधिकृत लेआऊटमधील ६० टक्के नागरिकांनाच डिमांड नोटिस पाठविण्यात आल्याने वादग्रस्त लेआऊटमधील वादग्रस्त भाग सोडून उर्वरित भागात राहणाऱ्या नागरिकांना डिमांड नोट पाठविण्यात यावी यासाठी अनेक शिष्टमंडळांनी नासुप्रच्या अधिकाऱ्यांना भेट देऊनही अद्याप काही निर्णय होऊ शकलेला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या संदर्भात काही कारवाई केली असल्यास त्याचा तपशील काय,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) व (३) नागपूर सुधार प्रन्यासने डिसेंबर २००७ अखेर ७५२ अनधिकृत अभिन्यासापैकी ४६५ अभिन्यास नियमित केले असून ४६ अभिन्यांस नामंजूर केले आहेत. तर ६१ अभिन्यास आरक्षणाने व जमिनीच्या वादातील आहेत.

गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ नुसार ३५९३ अनधिकृत अभिन्यासापैकी १३५३ प्रकरणांची छाननी केली असून उर्वरित २२४० अभिन्यासांपैकी ५०० अभिन्यास व त्यामधील भूखंड नियमित करण्यांची प्रक्रिया मार्च, २००८ पर्यन्त व उर्वरित १७४० अभिन्यांस डिसेंबर २००८ अखेर नियमित करण्याची कार्यवाहीसाठी शासनाने नागपूर सुधार प्रन्यासला निर्देश दिलेले आहेत. नागपूर सुधार प्रन्यासने शासनाच्या आदेशाप्रमाणे मार्च, २००८ पर्यन्त ५०० अभिन्यासापैकी ३९६ अनधिकृत अभिन्यास नियमित केले असून उर्वरित १०४ अनधिकृत अभिन्यास मार्च, २००८ अखेर नियमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. सय्यद जामा : माननीय सभापति जी, नागपूर शहर के 572 तथा अनधिकृत लेआउट के 1900 भूखंड नियमित करने की योजना 2001 में लायी गयी. यहां उत्तर में बताया गया है कि 396 अभिन्यास अभी तक नियमित किए गए हैं और बाकी मार्च 2008 के आखिर तक नियमित किए जाएंगे.मैं जानना चाहता हूं कि नियमित करने की जो प्रकिया 2001 में चालू की गयी उसमें करीब 40 प्रतिशत लोगों को एन.आय.टी. की ओर से डिमांड नोट नहीं दी गयी जिसकी वजह से वहां पर विकास का काम रुका हुआ है. मैं पूछना चाहता हूं कि क्या मंत्री महोदय इस बात की गारंटी देंगे कि जल्द से जल्द यह ओनरशिप का झगड़ा निबटाया जाएगा तथा उन लोगों को एन.आय.टी. की ओर से डिमांड नोट इशू किया जाएगा.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38926....

श्री. राजेश टोपे : एनआयटी भागातील अनधिकृत लेआऊट नियमित करण्याची लोकांची मागणी होती. त्यासंदर्भात मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी एनआयटीमध्ये जाऊन बैठक घेतली होती. एकूण 2240 लेआऊट नियमित करण्याचे काम राहिलेले आहे. त्या पैकी 500 लेआऊट मार्च 2008 पर्यन्त आणि 1740 लेआऊट डिसेंबर 2008 पर्यनत नियमितय करावेत असे आदेश देण्यात आले होते. एकूण 2240 लेआऊट पूर्णत: नियमित करण्याचे काम झाल्यानंतर डिमांड नोट देऊन आणि त्यांच्याकडून पैसे घेऊन त्या त्या संबंधित लेआऊटमध्ये विकास करण्याचे काम मार्च 2008 पासून केले जाईल. यामध्ये पहिला टप्पा हा लेआऊट नियमित करण्यासंबंधीचा असतो. लेआऊट नियमित करण्यासाठी काही अटी पूर्ण कराव्या लागतात आणि संबंधित अर्जदारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. गुंठेवारीच्या अधिनियमाप्रमाणे 2001च्या आधी गुंठे पाडलेले असावेत आणि त्यांची खरेदी केलेली असावी. त्याप्रमाणे अर्जदारांना पुरावे द्यावे लागतात. ....

.....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ 12:55

ता.प्र.क्र.38926....

श्री. राजेश टोपे.....

ही सर्व कागदपत्रे पूर्ण केल्यानंतरच नियमित करण्याची ऑर्डर केली जाते. नियमीत झाल्यानंतर त्यांना डिमांड नोट दिली जाते की, तुम्ही एवढे पैसे भरा असे सांगितले जाते. त्यांनी पैसे भरल्यानंतर त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर करण्याचे काम केले जाते. या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर कधी होणार असा प्रश्न विचारला गेला, त्यासंदर्भात उत्तर एवढेच आहे की, डिमांड नोट दिल्यानंतर आणि त्यासंबंधीचे पैसे भरल्यानगर इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण केल्या जातील. त्यानंतर सदर भूखंड नियमित कधी केले जातील यासंबंधी देखील प्रश्न विचारला गेला. त्याबाबतीत माहिती देऊ इच्छितो की, सदरहू भूखंड नियमित करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवून दिलेला आहे. सदरहू भूखंड नियमित करण्यासंबंधीच्या सूचना सभापतींना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या विषयाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली होती, त्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी सांगितले आहे की, माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करुन या पध्दतीचे काम 2008 पर्यंत केले जाईल.

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, राज्यात गुंठेवारी कायद्यात खूपच गोंधळ झालेला आहे. माझे तर असे मत झाले आहे की, टाऊन प्लॅनिंग ॲक्टची चौकट पूर्णपणे विस्कळीत झालेली आहे. सर्व लोकांना असे वाटते की, हे सगळे अनधिकृत लेआऊट पास होणार आहेत. एवढया कालमर्यादेमध्ये अनधिकृत लेआऊट नियमित करुन घ्यावेत अशा प्रकारचे बंधन गुंठेवारी कायद्यात घालून देणे आवश्यक आहे. एवढया कालमर्यादेमध्ये हे सर्व भूखंड नियमित घ्यावेत अन्यथा हा कायदा बंद करण्यात येईल अशा सूचना संबंधिताना देण्यात येतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, गुंठेवारी कायद्यामध्ये 2001 ही कालमर्यादा आहे. 2001 च्या अगोदरचा पुरावा असेल तर अशा प्रकारचे भूखंड नियमित करण्याचे काम केले जाते. आज त्यास एक्स्टेंशन करण्याचा विचार शासनासमोर नाही. कदाचित आपण या गोष्टीस एक्स्टेंशन देत राहिलो तर त्यामुळे आपण अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देतो आहोत की काय असे जनतेमध्ये मत होऊ शकते. आज तरी या गोष्टीस एक्स्टेंशन देण्याचा शासनाचा विचार नाही एवढीच मी या ठिकाणी माहिती देतो.

--------------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई आणि ठाणे विभागात असलेले नामांकित मोबाईल कंपनीचे अनधिकृत मोबाईल टॉवर**

**(१५) * ३७९०१ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. शरद रणपिसे , श्री.सय्यद जामा , श्री.राजन तेली** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि ठाणे विभागात नामांकित मोबाईल कंपनीने सुमारे २३५ मोबाईल टॉवर अनधिकृत असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) चौकशीत काय आढळून आले व अनधिकृत मोबाईल टॉवर उभारणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) ते (४) अनधिकृत मोबाईल टॉवर्सबाबत अंतिम सर्व्हेक्षण करून सदर मोबाईल टॉवर्सवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम / महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेत येणार आहे.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत. )

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या**
**सदनिका शासनाची परवानगी न घेता परस्पर विकल्याबाबत**

**(16) * 38560 डॉ. वसंत पवार , श्री.अरुण गुजराथी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सदनिका शासनाची परवानगी न घेता परस्पर विकल्या प्रकरणी मुंबईतील सहा विकासकाविरुद्ध माहे जानेवारी, 2008 मध्ये वा त्यासुमारास पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुद्ध पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विलासराव देशमुख** : (1) होय, चार विकासकांविरुध्द पोलीस विभागाकडे एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत.

(2) व (3) सदर प्रकरणी पोलीस विभागाकडून तपास सुरु आहे.

डॉ. वसंत पवार :सभापती महोदय, महानगरपालिकेतर्फे देण्यात येणा-या सदनिका शासनाची परवानगी न घेता परस्पर विकल्या गेल्या. या प्रकरणाबाबत चार विकासकांविरुध्द एफ.आय.आर.दाखल केले गेले आहेत. ज्या विकासकांवर एफ.आय.आर. दाखल केले गेले आहेत त्यांची नावे काय आहेत ? त्यांनी असा प्रकार केला म्हणून त्या विकासकांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्याची वा इतर प्रकारची काही कारवाई शासनाने केली आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या विकासकांची नावे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. शासनाच्या परवानगी शिवाय सदनिकांचे वितरण केलेले आहे, त्यासंदर्भात एफ.आय.आर.दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी कडक कार्यवाही निश्चितपणे करण्यात येईल.

---------------

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**एमआयजी क्लबला पाच एकराचा भूखंड केवळ**

**एक कोटी 18 लाख रुपयांना म्हाडाने विकल्याबाबत**

**(17) * 37529 श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वांद्रे (पूर्व) येथील एमआयजी क्लबला पाच एकराचा भूखंड केवळ एक कोटी 18 लाख रुपयांना म्हाडाने विकला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर भूखंड विकताना बाजार भावापेक्षा दहा पट कमी किंमतीने हा भूखंड म्हाडाने एमआयजी क्लबला विकला, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, बाजार भावापेक्षा कमी किंमत घेण्यामागे कारणे कोणती ?

**श्री.राजेश टोपे,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1), (2) व (3) प्राधिकरणाने एम.आय.जी.क्लबला 17,435,50 चौ.मी.क्षेत्र 30 वर्षांच्या भाडेपट्टयाने वितरीत केले आहे. सदर क्लबला सुरुवातीस सन 2001 चा प्रचलित बाजारभाव आधारभूत मानून रु.11,30,35,813/- एवढे अधिमूल्य कळविण्यात आले होते. तथापि, त्या भूखंडाचा बहुतांश भाग हा सन 1981 पासून त्या क्लबच्या ताब्यात असल्यामुळे आकारलेल्या अधिमूल्याचा पुनर्विचार करण्याबाबत प्राधिकरणाने दिनांक 10.11.2003 चे ठरावाद्वारे रु.1,18,26,360/- एवढे सुधारित अधिमूल्य निश्चित केले आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्या भूखंडाची किंमत म्हाडाने 11 कोटी 30 लाख 35 हजार 813 रुपये ठरविली होती. तो भूखंड एमआयजी क्लबला 1 कोटी 18 लाख रुपयांना म्हाडाने विकला. सभापती महोदय, सदर भूखंड म्हाडाने एमआयजी क्लबला बाजारभावापेक्षा दहा पट कमी किंमतीने का विकला असा प्रश्न विचारला होता. परंतु त्याबाबतीत शासनाने उत्तरात सांगितले आहे की, या भूखंडाची किंमत 11 कोटी 30 लाख 35 हजार 813 रुपये होती. तो भूखंड एम.आय.जी.क्लबला 1 कोटी 18 लाख रुपयांना विकला आहे. एवढया कमी दराने भूखंड विकण्याचे कारण काय आहे ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ KGS/ KTG/ D/ 13:00

ता.प्र.क्र. 37529 पुढे सुरु.....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, याबाबतीत शासनाचे प्रामुख्याने जे धोरण आहे ते असे आहे की, क्रीडांगणे,स्टेडियम याकरिता भूखंड देताना सवलत दिली जाते. याप्रकरणामध्ये बाजारभावानुसार 11 कोटी 30 लाख रुपये भूखंडाची किंमत असली तरी प्रत्यक्षपणाने क्रीडांगणासाठी याचा वापर होत असल्यामुळे किंमतीमध्ये सवलत देण्यात आलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अशाच प्रकारे दुसऱ्या एखाद्या प्रकरणात शासन सवलत देईल काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परि.क्र.1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2006-07 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

------

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचा सन 2005-2006 चा प्रथम वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

(माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या निदेशानुसार)

**विशेष कार्य अधिकारी** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी " सिंधुदूर्ग जिल्हयात संपूर्ण साक्षरता अभियान कार्यक्रमांतर्गत मुख्य प्रेरक व सहाय्यक प्रेरक यांचे मानधन न दिल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी " गोव्यातून पर्यटन पूर्ण करुन मुंबईत आलेल्या रशियन तरुणीचा टॅक्सी चालकाने केलेला विनयभंग " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,रामनाथ मोते,संजय केळकर यांनी " सातारा जिल्हयातील महिलांनी मतदानाने दारुबंदी करुनही काही दुकानदारांनी आयुक्तांच्या मदतीने दारुबंदी उठविल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी यांनी "राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे शिक्षण संचालक,संचालक इ.पदे रिक्त असून शालांत परिक्षा मंडळाच्या विभागीय अध्यक्षांची पदे रिक्त असणे, सेवाज्येष्ठतेनुसार पात्र असूनही अधिकाऱ्यांना पदोन्नती न देणे, एका अधिकाऱ्याकडे 3 ते 4 पदांचा कार्यभार देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी " पालघर जिल्हा ठाणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने खोटी कागदपत्रे तयार करुन लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार तसेच अफरातफर " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनवणे यांनी " व्ही.जे.टी.आय. मुंबई या स्वायत्त संस्थेने सुमारे 10 प्राध्यापक राज्य व केंद्र शासनाकडून दुहेरी वेतन घेत असल्याचे बोगस रेकॉर्ड तयार करणे, ए.आय.सी.टी.ई.ने 24 मंजूर पदांपैकी 18 पदे रिक्त ठेवणे, शासनाने या संस्थेच्या गैरप्रकारांची चौकशी करण्याचे आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रतापराव सोनवणे, रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी यांनी " राज्यातील शासकीय निमशासकीय व अशासकीय माध्यमिक शाळांमधील प्रयोगशाळा सहाय्यकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी " राज्यातील माध्यमिक शिक्षकांचे पगार 15 दिवस ते 1 महिना उशिरा होत असल्याने शिक्षकांचे लोन पेमेंटचे हप्ते चकून चेकस् बाऊन्स होत असल्यामुळे त्यांना भुर्दंड सोसावा लागणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियम 93 ची निवेदने सचिव वाचून दाखवीत आहेत. पीठासीन अधिकाऱ्यांनी ते वाचण्याची पध्दत आहे. कालसुध्दा तसेच झाले होते. सचिवांनी वाचणे ही पध्दत बरोबर नाही.

**उपसभापती** : मला बोलण्याचा त्रास होत असल्यामुळे मी सभागृहाची परवानगी मागितली की सचिवांनी वाचले तर चालेल काय ? त्या अनुषंगाने मी हे केले आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया मला समजून घ्यावे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष कार्य अधिकारी** :यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, शरद पाटील यांनी "ताकारी, म्हैसाळ, टेंभू या सांगली जिल्हयातील उपसा सिंचन योजनांना 1984 ते 1986 या कालावधीत प्रशासकीय मंजुरी मिळणे, या योजना पूर्ण होण्यास निधी अपुरा पडणे, या पाणी योजना रखडल्यामुळे जनमानसात पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरीया यांनी "अकोला एमआयडीसी फेज-2 मधील प्लॉटधारक श्री.राठी यांनी सुरु केलेले अवैध बांधकाम त्यामुळे ग्रामस्थांचा वर्षानुवर्षेचा रस्ता बंद होऊन त्यांना 10 कि.मी.दूरवरच्या रस्त्याने जावे लागणे, परिणामी एमआयडीसी प्लॉटधारक व कामगारांची होत असलेली कुचंबणा, या अनधिकृत बांधकामाकडे विभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता, अमरावती यांनी केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सर्व नियम 93 च्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कामकाजपत्रिकेसंबंधी**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहात दोन दिवस आम्ही कामकाजावर बहिष्कार घातला होता. या संदर्भात चर्चा झाल्यानंतर आम्ही मंगळवार, दिनांक 25 मार्च, 2008 पासून पुन्हा कामकाजात सहभाग घेण्यास सुरुवात केली. या सभागृहात अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस तीन दिवस देण्याचे बैठकीत ठरले होते. त्यामुळे आम्ही आमच्या पक्षाच्या सदस्यांना उद्या बोलायची संधी मिळेल असे सांगितले. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस असे नमूद करण्यात आले आहे. ज्यावेळी बैठक झाली होती त्या बैठकीला सन्माननीय संसदीय कामकाजमंत्री उपस्थित होते. परंतु अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा एक दिवस कमी केल्यामुळे गैरसमज निर्माण होत आहेत आणि आमचा अपमान होत आहे. बैठकीत माननीय सभापतींनी मान्य केले होते की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दोन ऐवजी तीन दिवस घेण्यात येईल. त्यानुसार आम्ही आमच्या पक्ष सदस्यांना उद्या बोलण्याची संधी दिली जाईल असे कळविले. परंतु दिलेला शब्द न पाळणे हे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी देखील अधिवेशनास सुरुवात झाल्यानंतर विनंती केली होती की, अधिवेशन काळात सभागृहातील कामकाजाशी संबंधित मंत्रीमहोदयांच्या दालनात बोलावण्यात येणाऱ्या बैठकांखेरीज कोणत्याही वैधानिक समित्यांच्या बैठका आयोजित करु नयेत. या संदर्भात निदेश दिले जातील असे सांगूनही मला बैठक आयोजित केल्यासंबंधी पत्र आले आहे. ही बाब मी सचिवांच्या निदर्शनास आणून दिली असता आजच्या आज आदेश वितरित केले जातील असे त्यांनी सांगितले होते. तरी देखील मला संयुक्त समितीची बैठक आयोजित केल्याबाबत पत्र पाठविले गेले आहे. संसदीय कामकाजमंत्री देखील माननीय सभापतींच्या दालनात उपस्थित होते. त्यांनी देखील सांगितले होते की, तातडीने कारवाई केली जाईल. मी काल शिक्षणमंत्री महोदयांना आयोजित केलेल्या बैठकीबाबत विचारले असता बैठकीचे आयोजन केल्याबाबत मला कोणी कळविले नाही, मला कळविले असते तर बैठक आयोजित केली नसती असे त्यांनी सांगितले. जो शब्द दिला जातो तो अंमलात येत नाही, सरकारला कळविले जात नाही. असा प्रकार माननीय सभापतींच्या स्थानावरुन होत असेल तर तो गंभीर विषय आहे.

..3..

डॉ.दीपक सावंत : यासंबंधी निर्णय होणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी तीन दिवसाचा कालावधी दिला जाणार आहे की नाही?

श्री.हर्षवर्धन पाटील : ही गोष्ट खरी आहे की, या संदर्भात काल चर्चा झाली होती. शासनाची तयारी आहे. या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विशेष बैठक घेण्यात यावी.

डॉ.दीपक सावंत : विशेष बैठक न घेता एक दिवसाचा कालावधी वाढविण्यात यावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : गुरुवार हा दिवस विरोधी पक्षाकडून देण्यात येणाऱ्या प्रस्तावावरील चर्चेसाठी असतो. त्यामुळे अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी उद्याची वेळ निश्चित करावी. तिसऱ्या दिवशी चर्चा घ्यायची शासनाची तयारी आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले होते की, गुरुवार हा दिवस विरोधी पक्षाच्या प्रस्तावासाठी दिला जावा. उद्या प्रश्नोत्तराच्या तासानंतर अर्थसंकल्पावरील चर्चा घेण्याचे ठरले तर विरोधी पक्षाकडून देण्यात येणाऱ्या प्रस्तावाबाबत विचार करावा लागेल. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी एक दिवस वाढवून देण्यास शासनाची हरकत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : आम्ही हरकत घेतली ती आजच्या कामकाजपत्रिकेसंबंधी आहे. त्याबाबत खुलासा केला जावा. तीन दिवसाचा कालावधी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी द्यावयाचे निश्चित झालेले असताना आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये 'दुसरा व शेवटचा दिवस' असा उल्लेख केलेला आहे. याबाबत आमची हरकत आहे. इतर विषय असतील तर त्याबाबत बैठक घेऊन चर्चा करावी.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाच्या सर्वसंमतीने निर्णय घ्यावयाचाअसेल तर तो आताच घ्यावा लागेल, पुन्हा यावर चर्चा नको. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा करण्याच्या संदर्भात सत्ताधारी पक्षाकडून विशेष बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात आली आणि विरोधी पक्षाकडून अशी मागणी आली आहे की, स्वतंत्र तिसरा दिवस या चर्चेसाठी देण्यात यावा. यासंदर्भात सभागृहामध्ये निर्णय घ्यावयाचा आहे, तो लांबणीवर पडता कामा नये, अशी माझी विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, आमची पूर्णपणे तयारी आहे. फक्त प्रश्न एकच आहे की, विशेष बैठक घेऊन चर्चा करावयाची आणि संपवावयाची असे आमचे म्हणणे आहे. मग ती चर्चा सभागृह सुरु होण्यापूर्वी अथवा सभागृहासमोरील कामकाज संपल्यानंतर घ्यावयाची, हे ठरवावे लागणार आहे. कारण विरोधी पक्षाचा प्रस्ताव गुरुवारला ठेवलेला आहे आणि मागील आठवडयात सुध्दा त्यांचा प्रस्ताव चर्चेला येऊ शकला नाही. तरी देखील यासंदर्भात आज कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा करुन निर्णय घेऊ. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अधिवेशन काळात समित्यांच्या बैठका उपस्थित करु नयेत अशी सूचना केली. परंतु आज कामकाज सल्लागार समिती असून त्यावेळी चर्चा करुन हा निर्णय घेण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, बऱ्याच वेळा प्रश्नोत्ताराचा तास असो अथवा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेली चर्चा असो माननीय मंत्री सांगतात की, ही माहिती माझ्याकडे उपलब्ध नसल्याने ती पटलावर ठेवण्यात येईल. अशा प्रकारे बऱ्याचशा गोष्टी पटलावर ठेवल्या जातात आणि अशा प्रकारे माझ्याच बाबतीत दोन तीन अधिवेशन काळातील माहिती मिळाली नाही, याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. तसेच हे पटल कोठे आहे, हे देखील आम्हाला समजले पाहिजे.

**उपसभापती** : यासंबंधीची चर्चा करुन आपल्याला अवगत करण्यात येईल.

-------------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विजेच्या अनियमित वीज पुरवठयामुळे वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**मु.शी.**: विजेच्या अनियमित वीज पुरवठयामुळे वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान बाबत सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 ची सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील (उर्जा मंत्री) : सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख यांनी "विजेच्या अनियमित वीज पुरवठयामुळे वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यु.डायगव्हाणे : महोदय, निवेदनातील शेवटच्या परिच्छेदात माननीय मंत्री महोदयांनी हे मान्य केले आहे की, आपल्या हलगर्जीपणामुळे आणि घर्षणामुळे ठिणगी उडाली आणि 11 एकर ऊस जळाला. हजारो रुपये या पिकावर खर्च झालेले आहेत. या ठिकाणी वितरण कंपनीच्या नियमानुसार योग्य नुकसान भरपाई देऊ असे सांगण्यात आले आहे. परंतु मला स्पेसिफिक असा प्रश्न विचारावयाचा आहे की, नियमाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा निर्णय एक महिन्याच्या आत घेण्यात येईल काय ? तसेच वर्धा जिल्ह्यातील यादोन तालुक्यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास या तालुक्यांमध्ये विहिरींना मुबलक पाणी आहे, नदीलाही मुबलक पाणी आहे पण विजेचा पुरवठा मात्र दिवसा नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून मागील वर्षी ज्याप्रमाणे सकाळी 9.00 पासून सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत वीज पुरवठा सुरु होता त्याप्रमाणे विजेचा पुरवठा सुरु राहणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, प्रचलित नियमाप्रमाणे जी नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे ती दोन महिन्याच्या आत देण्यात येईल तसेच लोडशेडींगच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, एमईआरसीने या जिल्हयाच्या संदर्भात लोडशेडींगचे जे वेळापत्रक ठरवून दिलेले आहे त्या प्रमाणे ते करण्यात येते परंतु स्थानिक परिस्थिती पाहून त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता असतात त्यामुळे स्थानिक परिस्थिती पाहून यासंदर्भातील सुधारणा करण्यासाठी संबंधितांना कळविण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वीज नसल्यामुळे शेतक-यांना आपल्या शेतीला पाणी देता येत नाहीत. मी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांना म्हणालो होतो की, एकटया नगर जिल्हयात जेवढे विद्युत पंप आहेत तेवढे विद्युत पंप नागपूरच्या 6 जिल्हयामध्ये सुध्दा नाही तसेच एकटया नाशिक मध्ये जेवढे विद्युत पंप आहेत तेवढे पंप अमरावती विभागातील 5 जिल्हयात सुध्दा नाही. या ठिकाणच्या शेतक-याने कर्ज काढून विहीर आणि विद्युत पंप बसवलेले आहेत. हे सहा जिल्हे स्ट्रेस खालील आहेत. या ठिकाणी वीज नसल्यामुळे केळीचे पिके सुकून चालली आहे. वर्धा जिल्हयातील 2 तालुक्यांना सकाळी 9 ते सायंकाळी 6 या काळात वीज जाणार नाही याचे आश्वासन माननीय मंत्रीमहोदय देतील काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, स्थानिक परिस्थिती पाहून त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार अधिक्षक अभियंता यांना दिलेले आहेत त्यामुळे स्थानिक परिस्थिती पाहून यासंदर्भातील सुधारणा करण्यासाठी संबंधितांना कळविण्यात येईल.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासकीय कार्यालयात निवेदन घेऊन जात असता सन्माननीय सदस्यांना अटक करणे

**मु.शी.**: शासकीय कार्यालयात निवेदन घेऊन जात असता सन्माननीय सदस्यांना अटक करणे याबाबत सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, परशुराम उपरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत, ॲड.अनिल परब वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, परशुराम उपरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, दीपक सावंत, ॲड.अनिल परब यांनी "शासकीय कार्यालयात निवेदन घेऊन जात असता सन्माननीय सदस्यांना अटक करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील अन्न व नागरी पुरवठयाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात येथील जनतेवर खूप मोठया प्रमाणात अन्याय होत असल्यामुळे येथील महिला, तहसिलदारांना निवेदन देण्यासाठी जात असतांना पोलिसांनी तहसिलदारांना निवेदन देण्यास मज्जाव केला असे नसून शिवीगाळ सुध्दा करण्यात आली तसेच त्यांना मोर्चापासून दूर नेण्याचा, मोर्चा उधळून लावण्याचा प्रयत्न देखील पोलिसांकडून करण्यात आलेला आहे. कायदा व सुव्यवस्था संभाळणे हे पोलिसांचे मुख्य काम आहे. तहसिलदारांना निवेदन देण्यासाठी या महिला मोर्चा घेऊन गेल्या होत्या परंतु पोलिसांनी या महिलांना तहसिलदारांकडे निवेदन देण्यास मज्जाव केला त्यामुळे या ठिकाणी काय प्रकार सुरु आहे. पोलिसांना कोण कोणते अधिकार देण्यात आलेले आहेत याची माहिती या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. या मोर्चातील ज्या महिलांना त्रास झाला त्यांना नागरिक म्हणून काही अधिकार आहेत की नाहीत? निवेदन देण्यास तहसिलदारांकडे जात असतांना त्यांना निवेदन देण्यापासून रोखण्याचा अधिकार पोलिसांना आहे काय? या महिलांवर ज्यांनी अन्याय ककेलेला आहे त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करण्ार आहात?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या ठिकाणी महिला बचत गटाची बैठक होती आणि धान्य दुकानात धान्य मिळत नाही याबद्दल त्या बैठकीत तक्रार करण्यात आली होती .त्या ठिकाणी असे ठरविण्यात आले होते की, तहसीलदार कार्यालयामध्ये जाऊन आपण तहसीलदारांना घेराव घालू. त्यानुसार तहसीलदार कार्यालयामध्ये हे लोक गेले असतांना पोलीस अधिकाऱ्यांनी असे सांगितले की . 150-200 व्यक्तिंना आत जाता येणार नाही तेव्हा प्रमुख सात आठ व्यक्तींनी आत मध्ये जाऊन निवेदन द्यावे. त्या ठिकाणी महिलांना कोणीही अडविलेले नाही.प्रत्येक नागरिकाला अधिकाऱ्यांची भेट घेण्याचा अधिकार आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, .लोकप्रतिनिधी तहसीलदार कार्यालयात गेल्यानंतर त्यांना देखील आत प्रवेश दिला गेला नाही. उलट त्यांच्याविरुध्द केस दाखल करण्यात आली होती. लोकांचा प्रश्न घेऊन कोणत्याही अधिका-यासमोर जाण्याचा लोकप्रतिनिधींना मुलभूत अधिकार आहे. हा अधिकार बजावत असतांना वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी आमदारांवर हल्ला केला होता अशा प्रकारचा फोटो मी पाहिलेला आहे. तेव्हा ही बाब कितपत समर्थनीय आहे ? तसेच लोकप्रतिनिधीना दिलेला मान सन्मान राखण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे किंवा नाही ? ज्याप्रमाणे पोलिसांचा सन्मान लोकप्रतिनिधींनी केला पाहिजे त्याप्रमाणे पोलिसांनी देखील लोकप्रतिनिधींचा सन्मान केला पाहिजे हे रेसिप्रोकल रिलेशन आहे तेव्हा हे रिलेशन सांभाळण्याची जबाबदारी त्या पोलिस इन्सपेक्टर होती किंवा नाही ? उलट हे रिलेशन न सांभाळता त्यांनी लोक प्रतिनिधीविरुध्द केस दाखल केली होती त्याचे कारण काय आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, सबंधित बचत गटाच्या महिला तेथे गेल्यानंतर लोकप्रतिनिधीसुध्दा तेथे आले होते. त्यावेळी तेथील अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना अशी विनंती केली होती की, आमदार साहेब आपण आणि सात आठ महिला तहसीलदारांना भेटू शकता. सर्व लोकांना आत सोडता येणार नाही. असे त्यांनी अत्यंत नम्रपणें आमदारांना सांगितले होते.त्यावेळी लोकप्रतिनिधींनी त्याच्याबरोबर अर्वाच्च भाषा वापरली होती म्हणून त्यांच्याविरुध्द केस दाखल करण्यात आली होती.

श्री.मधुकर सरपोतदार : पोलिसांनी धक्काबुक्की केली होती.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पोलिसांनी धक्काबुक्की केली नाही.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : त्या ठिकाणी लोकप्रतिनिधींच्या बाबतीत असा प्रकार घडलेला आहे.दरवेळी शासनाने अधिकाऱ्यांचीच बाजू घेतली पाहिजे असा काही प्रधात आहे काय ? सन्माननीय सदस्य जर एखाद्या अधिकाऱ्याच्या वर्तनाबद्दलची माहिती सभागृहात देत असतील तर ती माहीती चुकीची आहे असे तुम्ही का गृहित धरता ? त्या पोलीस अधिकाऱ्याच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? मी माननीय राज्यमंत्र्यांना या संदर्भात काही उदाहरणे देखील देऊ इच्छितो. लोकप्रतिनिधींना सरळ सरळ शिव्या देणाऱ्या अधिकाऱ्याचा आपण नेहमीच गौरव करीत आलेला आहात. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून बसण्याची आम्हाला सुध्दा आता लाज वाटू लागली आहे. अशा प्रकारे जर तुम्ही शासन चालविणार असाल तर लोकप्रतिनिधीनी काय करावयाचे ? तेव्हा या पोलीस अधिकाऱ्याच्या विरुध्द कोणती कारवाई करणार आहात हे माननीय राज्यमंत्र्यांनी सांगावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या ठिकाणी लोकप्रतिनिधी गेले होते आणि त्यांनी त्या अधिकाऱ्याच्या आई बहिणीच्या नावाने उध्दार केला होता आणि तेथे गोंधळ घातला होता....

**उपसभापती** : या अधिकाऱ्याच्या आई बहिणीच्या नावने या लोकप्रतिनिधींनी उध्दार केला होता म्हणून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. मग ज्या अधिकाऱ्याने माझ्या आईच्या नावाने उध्दार केला होता त्या अधिकाऱ्याच्या विरुध्द कोणती कारवाई केली होती ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, या प्रकरणामधील अधिकाऱ्याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याची देखील डी.वाय.एस.पी. यांच्या मार्फत चौकशी सुरु आहे.

**उपसभापती** : चौकशीअंती काय निर्णय घेण्यात आला आहे हे आपण सदनाला सांगावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ही चौकशी सुरु आहे आणि त्या अधिकाऱ्याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्या अधिकाऱ्याने लोकप्रतिनिधींना अडवले त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे

**उपसभापती** : ही चौकशी कधी पूर्ण होईल ? ही चौकशी पूर्ण करण्यास पाच दिवस लागणार आहेत की पंचवीस दिवस लागणार आहेत हे आपण सांगावे .

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या अधिकाऱ्याची चौकशी एक महिन्यात पूर्ण करण्यात येईल. सिंधुदूर्ग जिल्हयातील श्री.मातोडकर नावाचे एक पी.एस.आय. आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय उपसभापती महोदयांनी स्वत:च्या बाबतीत घडलेल्या एका प्रकरणाचा उल्लेख या ठिकाणी केला त्या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्याच्या विरुध्द काय कारवाई करण्यात आली होती .?



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी त्यांच्या बाबतीत खुलासा केलेला नाही तर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी उपस्थित केलेल्या प्रकरणासंबंधी मी खुलासा केलेला आहे.

**उपसभापती** : तुम्ही हल्ली लोकप्रतिनिधींना कमी लेखत आहात ? आणि लोकप्रतिनिधींचा उपमर्द करणारे जे अधिकारी आहेत त्यांना डोक्यावर घेऊन नाचत आहात. हे शासनाला कितपत भूषणावह आहे.?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यानी ज्या अधिका-यांचा उल्लेख केला होता त्या अधिकाऱ्याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : या अधिकाऱ्याच्या विरुध्द कोणत्या सेक्शनखाली गुन्हा दाखल केला होता आणि या अधिकाऱ्याची चौकशी केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्याच्याविरुध्द एन. सी. दाखल करण्यात आली असून त्यांची चौकशी करण्याच्या संदर्भात कोर्टाकडून परवानगी मागण्यात आली आहे. तेव्हा त्या अधिकाऱ्याची चौकशी करुन अहवाल सादर करण्यात यावा असे कोर्टाने आदेश दिलेले आहेत.त्याप्रमाणे एक महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : या प्रकरणामध्ये शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही . कोर्टाच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

( उत्तर दिले नाही )

श्री.श्रीकांत जोशी : महिलांचे शिष्टमंडळ तहसीलदारांना भेटावयास गेले होते. तेव्हा संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या विरुध्द कारवाई झाली पाहिजे. तेव्हा ही कारवाई करण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय आज घोषणा करतील काय ?

( उत्तर दिले नाही )

श्री.जगदीश गुप्ता : कोर्टाने आदेश दिल्यानंतर त्या अधिका-याच्या विरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे तेव्हा कोर्टाच्या निर्णयाचा तरी सन्मान करण्यात यावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :एखाद्या प्रकरणी एन.सी. दाखल केल्यानंतर त्याची चौकशी कोर्टाच्या आदेशाप्रमाणे होत असते . त्याप्रमाणे पोलिसांनी कोर्टाला स्वत: होऊन असे सांगितले होते की या अधिकाऱ्याच्या विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे तेव्हा चौकशी करण्याच्या बाबतीत आपण आम्हाला परवानगी द्यावी त्यानंतर कोर्टाची परवानगी घेऊन चौकशी सुरु केलेली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : त्या अधिकाऱ्याच्या विरुध्द कारवाई सुरु करण्यासाठी आपल्याला कोर्टात जावे लागले. जो नैसर्गिक न्याय असतो तो तुमच्याकडून मिळालेला नाही. कोर्टाकडून ऑर्डर आणावी लागली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कोर्टाकडून रिपोर्टदेखील पोलिसांनीच आणला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, ते येथे जे काही बोलत आहेत ते रेकॉर्डवर येत आहे आणि त्यांचे म्हणणे असत्य ठरले तर त्यांच्या विरूद्ध आम्हाला हक्कभंगाचा प्रस्ताव द्यावा लागेल हे त्यांनी लक्षात घ्यावे. त्यांच्याकडे या बाबतची वस्तुनिष्ठ माहिती आता नसेल तर त्यांनी ती माहिती पूर्णपणे घेऊन नंतरच यावर उत्तर द्यावे. वाटल्यास त्यासाठी सभापती महोदय, आपण हे निवेदन रोखून ठेवावे.

**उपसभापती** : ठीक आहे. हे निवेदन मी येथे रोखून ठेवत आहे. सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांच्या उपस्थितीतच त्यावर आपण चर्चा करू.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, येथे गंभीर मुद्दा आता उपस्थित झाला आहे. या निवेदनावर चर्चा होत असताना सभापती महोदय, आपल्या स्वत:संबंधात जी घटना घडली त्याबद्दल आपण येथे आता उल्लेख केला असता त्याबद्दल राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले नाही.

**उपसभापती** : त्यांच्या उत्तराची मी अपेक्षा करीत नाही. त्याबद्दल मला आता काहीही करावयाचे नाही, ते मी नंतर पाहतो. माझ्या स्वत:च्या बाबतीत तरी मी सरकारकडून न्यायाची अपेक्षा करीत नाही. तो न्याय मी माझा मिळवून घेईन.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पीठासीन अधिकाऱ्यांवर अन्याय होतो त्यावेळेस शासन एक साक्षीदार म्हणून काम करीत नाही. कोठलीही नोंद घेत नाही. त्याद्दल जबाब देत नाही. ही शासनाची बेपर्वाई आहे. म्हणून याबाबत कोणती कारवाई केली गेली आहे याबाबत माहिती सदनापुढे येण्याची आवश्यकता आहे, ती माननीय राज्यमंत्री देणार आहेत काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी त्याबद्दल मघाशीच सांगितले आहे.

**उपसभापती** : मी हे निवेदन रोखून ठेवले आहे. त्यावर आपण नंतर सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत चर्चा करणार आहोत.

श्री. मधुकर सरपोतदार : ठीक आहे.

***

...... आर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या उद्याच्या कामकाजाबाबत माननीय उपसभापतींची घोषणा.**

**उपसभापती** : मला सभागृहाच्या उद्याच्या कामकाजाबाबत एक घोषणा करावयाची आहे. उद्या 27 मार्च 2008 यरोजी सभागृहाच्या नियमित बैठकीमध्ये अर्थसंकल्पावर चर्चा होईल. त्यानंतर लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच अन्य विधेयके होतील.

***

**पृ. शी.** : अमरावती जिल्ह्यातील मेळघाट वनविभागातून निस्तारासाठी बांबू तोडीची शेतकऱ्यांना परवानगी मिळणे.

**मु. शी.** : अमरावती जिल्ह्यातील मेळघाट वनविभागातून निस्तारासाठी बांबू तोडीची शेतकऱ्यांना परवानगी मिळणे याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता व पांडुरंग फुंडकर यांनी "अमरावती जिल्ह्यातील मेळघाट वनविभागातून निस्तारासाठी बांबू तोडीची शेतकऱ्यांना परवानगी मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... आर 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 खालील मा.वन मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या निवेदनाद्वारा जो प्रश्न आम्ही येथे उपस्थित केला होता त्यावर नेमके उत्तर यामध्ये आलेले नाही. मी चौथा प्रश्न असा उपस्थित केला होता की, निस्ताराच्या माध्यमातून किती लोकांना बांबू मिळाले आणि त्यांची प्रत्यक्षात मागणी कितीची होती. पण याचे उत्तरच यामध्ये आलेले नाही. म्हणून मी पुन्हा या निमित्ताने उपप्रश्न विचारू इच्छितो की, त्या ठिकाणी निस्तारासाठी किती लोकांची मागणी होती आणि आपण किती वितरण केले ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, परिच्छेद 2 मध्ये आपण सांगितले आहे की, 22.9.2005 च्या पत्रान्वये केंद्र सरकारची बांबू तोडण्यासाठी परवानगी घेतली आहे तर त्याची मुदत किती आहे? आणि माझा तिसरा प्रश्न असा आहे की, हे अधिकारी जेथे जेथे असतात त्यांचे रेकॉर्ड पाहिले, अगदी नागपूर पासून, त्या त्या ठिकाणी जे ठेकेदार आहेत त्या साऱ्यांची चांदी होत असल्याचेच आपणास दिसून येईल. तेव्हा याबाबत चौकशी आपण केलेली आहे का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या निस्तारासाठी राखून ठेवलेले बांबू 49 नूडल टन होते आणि जेवढी त्यांची मागणी होती त्याप्रमाणात ते राखून ठेवले आहेत. या शिवाय आणखी कोणाची मागणी असेल तरी ते देण्यास आपली तयारी आहे. सन्माननीय सदस्यांचा दुसरा जो प्रश्न आहे ...

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, हा प्रश्न विचारण्याचे कारणच असे आहे की, या बांबू तोडीचे कंत्राट ठेकेदारांना देण्यात आले त्यात प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे आणि हे कंत्राट देताना ठेकेदारांचाच फायदा कसा होईल याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष करून लक्ष दिले आहे. म्हणून या बाबतीत मी विचारले की, निस्तारासाठी किती बांबूची मागणी होती आणि ती सारी पूर्ण केली गेली आहे का ? सभापती महोदय, या माझ्या प्रश्नाचे उत्तर आल्याशिवाय माझ्या या प्रश्नाला न्याय मिळणार नाही.

( यानंतर श्री. सरफरे .... एस 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, निस्तारासाठी जेवढी मागणी होती तेवढा बांबू राखून ठेवला आहे. कॉट्रॅक्टरकडून तोडण्यात आलेल्या बांबूमधून 19 लाख 82 हजार रुपयांचे जास्तीचे उत्पन्न मिळाले आहे. कॉट्रॅक्टरला जेवढा बांबू तोडण्यास दिला होता त्यापेक्षा जास्त बांबू तोडण्यात आला. तोडलेला बांबू जास्त निघाल्याचे लक्षात आल्यानंतर तो राखून ठेवण्यात आला. त्या बांबूचा लिलाव करण्यात आला व त्यामधून आपल्याला 19 लाख 82 हजार रुपये जास्त मिळाले. बांबूचा लिलाव करण्यापूर्वी निस्तारासाठी आवश्यक असलेला बांबू राखून ठेवला आहे. निस्तारासाठी आणखी बांबू लागला तरी तो देवू शकतो. कॉट्रॅक्टरला ज्या परिसरातील बांबू तोडावयास दिला त्याठिकाणी 1444 नो.टन जास्त बांबू निघाल्याचे आमच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. कॉट्रॅक्टरला 875 नो.टन बांबू द्यावयास पाहिजे होता त्यापेक्षा कमी म्हणजे 867 नो. टन दिला. त्यामुळे कॉट्रॅक्टरला कमी बांबू दिला. त्याने तोडलेल्या बांबूचे पैसे दिलेले नाहीत. त्याने तोडलेला बांबू जप्त करण्यात आला आहे. हा बांबू विकल्यामुळे आपला तोटा झालेला नाही. या उलट कॉट्रॅक्टरचा यामध्ये तोटा झाला आहे. त्या विभागातील हा बांबू तोडण्याकरिता केंद्र सरकारच्या मिळालेल्या परवानगीची मुदत संपली होती. केंद्र सरकारकडून आणखी दोन वर्षांची मुदतवाढ मिळाली असल्यामुळे आता अडचण राहिलेली नाही. कार्य योजनेप्रमाणे बांबू तोडण्यात आला आहे. त्याचे टेंडर शासनाच्या वतीने निविदा काढल्याशिवाय करता येत नाही. यामध्ये खालच्या अधिकाऱ्याचा संबंध येत नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे ग्रामीण व शहर पोलीस विभागातील अनेक मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून न घेणे

**मु.शी.**: ठाणे ग्रामीण व शहर पोलीस विभागातील अनेक मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून न घेणे यासंबंधी श्री. राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"ठाणे ग्रामीण तसेच शहर पोलीस विभागातील अनेक मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अद्यापपर्यंत नोकरीत सामावून घेण्यात आलेले नसणे, तसेच त्यांना निवृत्ती उपदान (ग्रॅज्युईटी) व निवृत्ती वेतन (पेन्शन) इत्यादी नियमानुसार देय रकमा अद्याप अदा न करणे, त्यामुळे मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांवर उपासमारीची आलेली वेळ, मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांनी याबाबत अनेक वेळा आयुक्त, ठाणे तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन तसेच त्यांना भेटून देखील अद्याप त्यावर कोणतीही कारवाई न होणे, याबाबत त्यांनी बेमुदत उपोषण व आत्मदहन करण्याचा नुकताच दिलेला इशारा, याबाबत शासनाने त्वरीत करावयाची कारवाई न शासनाची प्रतिक्रिया".

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. राजन तेली : सभापती महोदय, ठाणे ग्रामीण तसेच शहरी विभागातील अनेक मृत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना अद्यापि नोकरीमध्ये सामावून घेतले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांचे फार हाल होत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अनेक विभागांमध्ये अशी परिस्थिती आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ठाणे ग्रामीण पोलीस दलातील बक्कल क्र. 2041 श्री. संतोष गुजर या कर्मचाऱ्याचे निधन झाले. त्याच्या आईला निवृत्ती वेतन मिळण्यासाठी आणि त्याच्या अपंग असलेल्या श्री. महेश गुजर या मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी यासाठी ते 1 एप्रिल 2003 पासून प्रयत्न करीत आहेत. यासंबंधी माननीय गृहमंत्र्यांनी आदेश देऊन सुध्दा त्याबाबत अद्यापि कार्यवाही झालेली नाही. सभापती महोदय, आज हे गुजर कुटुंब अडचणीत आहे. श्री. संतोष गुजरचे निधन झाले त्यावेळी तो कर्जबाजारी होता. त्यामुळे अपंग असलेल्या त्याच्या मुलाच्या डोक्यावर कर्जाचा बोजा असतांना हे कुटुंब इतकी वर्षे सातत्याने प्रयत्न करीत आहे. तेव्हा या गुजर कुटुंबाला आपण न्याय देणार काय? किती दिवसात न्याय देणार आहात? महेश गुजर हा अपंग असतांनासुध्दा आज तो 600 रुपयांवर एका कँटीनमध्ये काम करीत आहे. त्यामुळे आपण महेश गुजर याला नोकरीमध्ये सामावून घेणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, अनुकंपा तत्वावर 5 टक्के आरक्षणामध्ये भरती केली जाते. त्या विभागामध्ये जेवढी व्हेकन्सी असेल त्या प्रमाणात ही भरती केली जाते. त्यामुळे अपंगांच्या बाबतीत सुध्दा तशाप्रकारे भरती केली जाते. पोलीस खात्यामध्ये कर्तव्य बजावीत असतांना एखादा कर्मचारी शहीद झाला तर त्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीला प्राधान्याने नोकरीमध्ये सामावून घेतले जाते. याठिकाणी महेश गुजर हा अपंग असल्यामुळे विशेष बाब म्हणून प्राधान्याने सामावून घेण्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल.

**उपसभापती** : या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, पोलीस कर्मचाऱ्यांचे बरेचसे प्रश्न आज प्रलंबित पडले आहेत. हे प्रश्न सुटण्यासारखे आहेत. परंतु शासन त्याबाबतीत उदासीन आहे. ठाण्याच्या वर्तक नगर येथे पोलिसांच्या गृहनिर्माण वसाहतीसंबंधी मी आणि माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला आहे. सदरहू वसाहतीमध्ये अनेक कर्मचाऱ्यांनी शासनामार्फत म्हाडाकडून घरे विकत घेऊन त्यांनी आपल्या खाजगी सहकारी संस्था स्थापन केल्या.

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** . . . .

आज ती घरे एवढया दुरावस्थेमध्ये आहेत की, ती कधीही पडतील आणि त्यामध्ये जिवीत आणि वित्त हानी होईल. मी गेली 3 वर्षे ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी ही घरे आहे त्या अवस्थेमध्ये स्वत: घेण्याची तयारी दर्शविली. परंतु त्याबाबतीत देखील शासनाने कोणताही निर्णय दिलेला नाही. त्यांनी अद्यापपर्यंत म्हाडाला भाडे दिलेलेच नाही आणि ते आता 72 लाख रुपयांच्या वर गेले आहे. शासनाकडे पैसे नसल्यामुळे ते दुरुस्तीचा खर्च करु शकत नाही. म्हणजे उद्या तेथे काही घटना घडली तर त्यामध्ये पोलीस कर्मचारी, त्यांचे नातेवाईक मेले तरी चालतील, ते एकवेळ शासनाला परवडेल. अशी एकंदरीत स्थिती दिसत आहे. या विषयाच्या बाबतीतील उदासिनता ही निश्चितपणे खटकणारी आहे आणि ती मला देखील खटकलेली आहे. मी स्वत: आदरणीय माननीय मुख्यमंत्र्यांना देखील तीन वेळा नाही तर तीनशे ते चारशे वेळा खाजगीरित्या देखील निदर्शनास आणली आहे. मला हे सांगावयास वाईट वाटते की, एरवी आपण पोलिसांची इकडे-तिकडे वारेमाप तोंड फाटेपर्यंत स्तुती करतो. परंतु जेव्हा खरोखरच काही करावयाचे असते, तेव्हा मात्र काही केले जात नाही. केवळ पेपरमध्ये लाईन्स् छापून आणावयाच्या की, आम्ही हे करतो, ते करतो. परंतु तुम्ही कृतीशुन्य आहात. आता याठिकाणी जो प्रश्न सांगितलेला आहे, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनीही तो मांडला होता. मी विधान परिषदेमध्ये चार वेळा याबाबतीत निर्देशही दिले होते. परंतु आता शब्द कसा वापरावयाचा हे मला कळत नाही. परंतु हे परत-परत तुम्हाला सांगावयाचे याची आता आम्हालाच शरम वाटावयास लागली आहे. तेव्हा माननीय गृह राज्यमंत्र्यांनी ही बाब ताबडतोब माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावी की, हे फार काळ चालणार नाही. नाहीतर पोलीस रस्त्यावर येण्याची वेळ येईल. तेव्हा यासंबंधात मेहेरबानी करुन येत्या 8 दिवसामध्ये एक बैठक बोलविण्यात यावी. त्यावेळी स्वत:त्यांनाही उपस्थित रहाण्यास सांगावे. तसेच डी.जी.यांनाही उपस्थित राहण्यास सांगावे आणि हा प्रश्न तडीस लावावा. आता आपण उभे राहून "होय" असे सांगावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

----

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मराठवाडयातील स्थानिक लघु उद्योजकांना कर्ज उपलब्ध होत नसल्यामुळे निर्माण झालेला असंतोष

मु.शी. : मराठवाडयातील स्थानिक लघु उद्योजकांना कर्ज उपलब्ध होत नसल्यामुळे निर्माण झालेला असंतोष यासंबंधी सर्वश्री श्रीकांत जोशी,नितीन गडकरी,सय्यद पाशा पटेल वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाडयातील स्थानिक लघु उद्योजकांना कर्ज न देता पुणे-मुंबईच्या लोकांना एम.एस.एफ.सी.कडून कर्ज देण्यात येणे, मराठवाडयातील लघु उद्योजकांसाठी मराठवाडयात कार्यालय नसल्याने कर्ज प्रकरणासाठी त्यांना मुंबई-पुण्याला वारंवार जावे लागणे, परिणामी मराठवाडयासाठी औरंगाबाद किंवा जालना येथे एम.एस.एफ.सी.चे मुख्य कार्यालय करण्याची मागणी पुढे येणे, मराठवाडयात उद्योग वाढविण्यासाठी प्रशासनाकडून कोणतेही ठोस पाऊले उचलली न जाणे, त्यामुळे लघु उद्योजकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.अशोक चव्हाण (उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, खरे म्हणजे महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक विकासामध्ये क्रमांक 1 वर येण्यामध्ये लघु उद्योजकांचा खूप मोठा वाटा होता. पण या लघु उद्योजकांकडे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग खात्याचे दुर्लक्ष झालेले आहे. गेल्या काही वर्षापासून लघु उद्योजकांना वित्त आणि मार्केटींग या दोन्ही गोष्टी करणारी काही महामंडळे होती. महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन हे वित्तीय पुरवठा करीत असे आणि लघु उद्योग महामंडळ हे मार्केटींगच्या बाबतीत काम करीत असे. तसेच खादी ग्रामोद्योग महामंडळ सुध्दा चांगल्या पध्दतीने काम करीत होते. पण संपूर्ण मराठवाडयामध्ये आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये सध्या एम.एस.एफ.सी.चे कर्ज वितरणाचे काम बंद आहे अशी स्थिती आहे. ग्रामीण भागातील लघु उद्योजकांना आपला उद्योग उभा करण्यामध्ये निधीअभावी जो अडथळा येत होता, तो दूर करावा असा खरा म्हणजे एम.एस.एफ.सी.चा उद्देश होता. कारण नॅशनलाईज् बँकेचे निकष अत्यंत कडक आहेत आणि तेथे सहजासहजी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील उद्योजकांना, मराठी उद्योजकांना कर्ज मिळण्यामध्ये खूप अडचणी येत होत्या. मग तो उद्योग पोल्ट्रीचा असेल, जिनिंग असेल, तेल गिरणी असेल असे छोटे-मोठे हजारो उद्योग खेडया-पाडयामध्ये पसरलेले होते. पण एम.एस.एफ.सी.च्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी आणि बोर्डातील काही महत्वाच्या पदाधिकाऱ्यांनी मिळून सगळी कर्जे ही मुंबई-पुण्यातील मोठया लोकांना वाटली आणि ते सगळे डिफॉल्टर झाले. लोकलेखा समितीचा सदस्य म्हणून अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, जवळपास डिफॉल्टमध्ये गेलेली 60 टक्के रक्कम ही ठाणे, भिवंडी, मुंबई, पुणे या दोन-तीन शहरातील आहे. जेथे मोठया प्रमाणात बँकींग नेटवर्क उपलब्ध आहे तेथेच वाटण्यात आली आणि ती सगळी डिफॉल्टमध्ये गेली. पर्यायाने एम.एस.एफ.सी.बंद पडली. माझा माननीय उद्योग मंत्र्यांना असा स्पेसिफीक प्रश्न आहे की, एम.एस.एफ.सी.चा जो मूळ उद्देश होता की, ग्रामीण भागातील लघु उद्योजकांचे पैशाअभावी उद्योग उभे रहात नसतील तर तेथे काही ना काही तरी कॅपिटल उभे करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने पुढे येणे गरजेचे आहे. मी आकडेवारी देऊ शकतो. खुलताबाद तालुक्यातील लघु उद्योजकांना सगळया बँकांनी मिळून फक्त 27 हजार रुपयांचा फायनान्स केला होता. पण शेवटी आम्हाला बँकेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना कडक शब्दामध्ये वॉर्निंग द्यावी लागली. लघु उद्योजकांना करण्यात आलेल्या फायनान्स्च्या बाबतीतील आकडेवारी इतकी भयानक आहे की, जर त्यांना फायनान्सची व्यवस्था करता आली नाही तर या

. . . .टी-4



श्री.श्रीकांत जोशी . . . .

महाराष्ट्रातून संपूर्ण लघु उद्योगाची पाळेमुळे उखडली जातील आणि दुर्दैवाची परिस्थिती आहे की, जिनिंगसारख्या मोठया उद्योगावर मध्य प्रदेश आणि गुजरातच्या व्यापाऱ्यांनी कब्जा केला आणि त्यातून महाराष्ट्रीयन उद्योजक अक्षरश: हताश होऊन बाहेर पडलेला आहे. म्हणून माझा माननीय उद्योग मंत्र्यांना असा स्पेसिफीक प्रश्न आहे की, आपण एम.एस.एफ.सी.चे पुनरुज्जीवन करणार आहात काय ? त्याचा मूळ उद्देश हा ग्रामीण भागातील लघु उद्योजकांना अर्थपुरवठा करणे हा आहे तर त्याचे मुख्यालय सुध्दा ग्रामीण भागामध्ये असावयास पाहिजे. पण केवळ आय. ए.एस. अधिकाऱ्यांचे चोचले पुरविण्यासाठी हे कार्यालय मुंबईला सुरु ठेवणार . . . .

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : त्यांचे मुख्यालय मुंबईवरुन ग्रामीण भागात आणून टारगेटेड म्हणजे दरवर्षी एक हजार लघु उद्योजकांना कर्ज पुरवठा झालाच पाहिजे अशा पध्दतीने त्याची पुनर्रचना करुन नवीन पध्दतीने ते काम सुरु होऊ शकेल यासाठी शासन ठोस निर्णय घेणार आहे काय ? महाराष्ट्रातील जे लघु उद्योजक अडचणीत आले आहेत त्यांना वित्तीय सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र सरकार ठोस अशी कार्यवाही करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ हे शासनाचे कॉर्पोरेशन प्रामुख्याने लघु उद्योजकांना अर्थसहाय्य व्हावे याकरिता स्थापन झालेले होते. गेल्या 50 वर्षापासून ही संस्था कार्यरत होती. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सुरुवातीला उल्लेख केला की, फक्त मुंबई, पुणे या भागापुरताच त्यांचा वित्तीय किंवा पतपुरवठा होतो. परंतु अशी वस्तुस्थिती नाही. माझ्याकडे 2005 ची आकडेवारी आहे. कारण 2005 नंतर फायनान्शियल कॉर्पोरेशनचे कामच बंद झाले. कारण ही वित्तीय संस्था आर्थिक अडचणीमध्ये आली. त्यामुळे नंतर पुढचे फायनान्स बंद झाले. 2005 पर्यंत मराठवाड्यामध्ये 6560 कर्ज प्रकरणे मंजूर झाली आणि त्यामध्ये 255 कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. पुणे विभागामध्ये 3887 प्रकरणात 217 कोटी रुपये वितरित करण्यात आले. ज्याप्रमाणे मागणी होती त्याप्रमाणे कर्जाचे वितरण झालेले आहे. एकंदरीत आपण ॲनॅलिसिस पाहिले तर 31.3.2007 पर्यंतचा या कॉर्पोरेशनचा संचित तोटा 622 कोटी रुपये आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे शासनाची ही भूमिका आहे की ही संस्था रिव्हाईव करता आली पाहिजे. परंतु यामध्ये दोन गोष्टी अडचणीच्या आहेत. केंद्र शासनाच्या सिडबी संस्थेकडून कर्ज घेतले होते. 330 कोटी रुपये आपण सिडबीला देणे आहोत. त्यानंतर एस.एल.आर. बॉंड घेतले होते त्यापोटी 222 कोटी रुपये आपल्याला देणे आहे. म्हणजे साधारणत: 550 ते 600 कोटी रुपयांच्या आसपास हा आकडा चाललेला आहे. अशा परिस्थितीमध्ये आज एमएसएफसीच्या माध्यमातून कर्ज वसुलीचे काम केले जात आहे. मागच्या काळात जी थकबाकी होती त्याच्यापोटी त्यांनी चांगली वसुली केलेली आहे. 2007-08 मध्ये 50 कोटी रुपचे वसूल केलेले आहेत. 2006-07 मध्ये घेतलेल्या कर्ज आणि व्याजाची 68 कोटी रुपयांची वसुली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

केलेली आहे. बऱ्याच ठिकाणी रिकव्हरी होत नव्हती त्या ठिकाणी प्रॉपर्टीचा लिलाव करुन पैसे वसूल केलेले आहेत. परंतु ज्या प्रमुख अडचणी आहेत त्यामध्ये एस.एल.आर. बाँड आणि सिडबीचे कर्ज याबाबत अडचण आहे. हे कर्ज परत केल्याशिवाय ही संस्था वर येऊ शकत नाही. मध्यंतरीच्या काळात ही संस्था बंद करावयाची की अशाच पध्दतीने चालू ठेवावयाची हा प्रश्न विचाराधीन होता. हा प्रश्न गंभीर आहे. कारण नुसते बोलून किंवा आश्वासन देऊन उपयोग होणार नाही. यातून काही तरी मार्ग काढावा लागणार आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, आज बँकांकडून लघु उद्योगांना कर्ज उपलब्ध होत आहे. ते कर्ज कमी व्याजाने उपलब्ध होत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एमएसएफसीकडून कर्ज मिळत नसल्यामुळे लहान आणि मध्यम उद्योजकांना कर्ज उपलब्ध होत नाही. ही वस्तुस्थिती नाही. आजही बँकांमार्फत कर्ज दिले जाते आणि राज्यातील छोट्या आणि मध्यम उद्योजकांना त्याचा फायदा होत आहे. साधारणत: 11 ते 15 टक्के व्याजाने त्यांना आज कर्ज मिळते. एमएसएफसीचा दर त्यापेक्षा जास्त म्हणजे 15 ते 16 टक्के होता. जे थकित कर्ज आहे ते वसूल करण्याचेच काम 2005 पासून सुरु आहे. नवीन कर्ज देणे शक्य नाही कारण वित्त विभाग या गोष्टीसाठी अर्थसंकल्पात तरतूद करीत नाही. अशा परिस्थितीमध्ये या संस्थेवर जे दायित्व आहे तसेच काही लोकांनी कर्ज घेऊन जे थकित ठेवले आहे त्यांच्याकडून वसुली करण्याकरिता ही संस्था कार्यरत आहे. ते सगळे काम सुरु आहे. मला अभिनंदन केले पाहिजे. आज त्या ठिकाणी जे अधिकारी काम करीत आहेत त्यांनी अशा परिस्थितीमध्ये 50 कोटी रुपये वसूल केलेले आहेत. त्यांनी खर्च कमी केला आहे. शाखा कमी केलेल्या आहेत. आजचा त्यांचा खर्च काढला तर स्टाफ आणि प्रशासकीय खर्च साधारणत: तीन ते सव्वातीन कोटी रुपये असून वसुली 50 कोटी रुपये होत आहे. ही संस्था रिव्हाईव होण्याकरिता सातत्याने प्रयत्न सुरु आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

परंतु जोपर्यंत एसएलआर बॉण्डच्या बाबतीत निर्णय होत नाही तसेच वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भात सिडबी व बँकेची संयुक्त बैठक घेऊन त्यांच्या स्तरावर वन टाईम सेटलमेंट मान्य केले तर वित्त विभागाला तेवढी तरतूद करण्याविषयी प्रयत्न करावे लागतील. ते मान्य झाले तर संस्था बाहेर काढणे शक्य होईल. एमएसएफसीकडून वित्त पुरवठा होत नाही ही वस्तुस्थिती नाही. बँकेमार्फत आजही छोटया व मध्यम उद्योजकांना कर्ज वितरित केले जात आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मूळ मुद्दा असा होता की, 900 कोटींपैकी 650 कोटी रुपये मोठया उद्योगपतींनी बुडविले होते. त्याची पुनरावृत्ती होऊ नये. जेथे कार्यालय असते तेथील लोकांचे फावते. तळे राखी तो पाणी चाखी असा प्रकार सुरु आहे. म्हणून येथील मुख्यालय स्थलांतरित केले पाहिजे. वन टाईम सेटलमेंट करण्यासाठी कॅपिटल फायनांस म्हणून सरकारला निधी द्यावाच लागेल. तोपर्यंत एमएसएफसीला पुनरुज्जीवित करावयाचे असेल तर या वर्षाच्या नाही तर पुढील वर्षाच्या बजेटमध्ये वन टाईम सेटलमेंटचा जो गॅप आहे तो बाजूला ठेवून नवीन लोकांना कर्ज देणे आवश्यक आहे. मंत्रिमहोदय म्हणत आहेत की, राष्ट्रीयकृत बँका कर्ज देत आहेत. राष्ट्रीयकृत बँका ग्रामीण भागात कर्ज देतच नाहीत. केवळ आकडेवारी देतात. मराठवाडयातील सर्व बँकांची आपण एक बैठक बोलवावी. 52 तालुक्यांमध्ये नाममात्र कर्जे दिलेली आहेत. ही संस्था रिव्हाईव्ह करण्यासाठी जो फिजिबिलिटी गॅप आहे तो देऊन एमएसएफसीचे पुनरुज्जीवन करुन ग्रामीण भागामध्ये पुन्हा एकदा कर्ज देण्याची व्यवस्था करण्यासाठी सुविधा देणारी यंत्रणा म्हणून नवीन पध्दतीचे बोर्ड निर्माण केले जाईल काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मुख्यालय स्थलांतरित केल्यामुळे काही फरक पडेल अशातील भाग नाही. मुंबई हे इंटरनॅशनल फायनांशिअल सेंटर होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे मुंबईतील एखादे मुख्यालय हलविणे हा प्रॅक्टीकल मार्ग नाही. मुख्यालय हलविल्यामुळे कार्यक्षमता वाढेल किंवा वित्त पुरवठा वाढेल अशातील भाग नाही. आजही मराठवाडयात विभागीय कार्यालय सुरु आहे, ते बंद झालेले नाही. या संस्थेला पुनरुज्जीवित करणे हा मुद्दा आहे. मी सुरुवातीला स्पष्ट केले आहे की, सिडबी आणि एसएलआर बॉण्ड्स आहेत हे रिडीम करण्यासाठी जे काही

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

करावयाचे आहे त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. या संस्थेच्या एम.डी.ला त्यांच्या स्तरावर एक प्रयत्न करुन पहावा असे सांगितले आहे. मी त्यासाठी मदत करीन. यातून बँकांनी वन टाईम सेटलमेंटचा फॉर्म्यूला मान्य करुन हा आकडा फ्रीझ करता आला तर 330 कोटी सिडबीचे आणि एसएलआर बॉण्डचे 222 कोटी इतकी रक्कम देय आहे. ही रक्कम एकरकमी कशी खाली आणला येईल हा थोडासा तडजोडीचा भाग आहे, तर त्यातून फायदा होईल. ही रक्कम एकरकमी कमी झाली तर वित्त विभागाकडे विनंती करुन मार्ग काढण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :जालना जिल्हयातील जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा सुरु असलेला मनमानी कारभार व भ्रष्टाचार याबाबत चौकशीची मागणी करुनही कारवाई न होणे

**मु. शी.** :जालना जिल्हयातील जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा सुरु असलेला मनमानी कारभार व भ्रष्टाचार याबाबत चौकशीची मागणी करुनही कारवाई न होणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, परशुराम उपरकर, अरविंद सावंत, दीपक सावंत, अनिल परब, गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, सय्यद पाशा पटेल,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जालना जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा जिल्ह्यात मोठया प्रमाणात सुरु असलेला मनमानी कारभार व भ्रष्टाचार, त्यांचा मनमानी कारभार व भ्रष्टाचाराबाबत विधानपरिषद सभागृहात विविध आयुधांद्वारे प्रश्न उपस्थित करुनही त्यांना पाठीशी घालण्याचा होत असलेला प्रयत्न, त्यांच्या गैरकारभाराबाबत शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करुनही त्याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्ह्यात रात्री बेरात्री पेट्रोल पंपावर जाऊन चौकशीच्या नावाखाली पैसे उकळणे, व पैसे न दिल्यास जीवनावश्यक वस्तू कायद्याचा भंग केल्याप्रकरणी पेट्रोल पंप बंद करण्याची व पोलिसात गुन्हा दाखल करण्याची धमकी देणे, याबाबत मराठवाडा पेट्रोलियम असोसिएशनच्यावतीने विभागीय आयुक्तांना निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी त्यांचा मनमानी कारभार व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावणे, शासन या भ्रष्टाचारास पाठिशी घालत असल्याने जनतेचा शासनावरील उडत चाललेला विश्वास, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याबाबत अनेक गंभीर तक्रारी असून त्याबाबत

४....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उच्चस्तरीय चौकशीची मागणी करुनही अद्याप कारवाई होत नसल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याप्रकरणी शासनाने तातडीचे चौकशी करुन जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेविरुध्द त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी त्यादिवशी श्री.रेंगे-पाटील यांच्याकडील लग्नाहून परत येत असताना जालना जिल्हयातील अनेक व्यापा-यांनी मला थांबवून यासंदर्भात माझ्याकडे तक्रार केली. त्यामुळे मी या विषयात लक्ष घातले आहे. जालना जिल्हयातील जे पुरवठा अधिकारी आहेत ते आपल्या अधिकाराचा वापर करुन अनेक ठिकाणी गैरव्यवहार करतात. रेशनिंगच्या शिधावाटप पत्रिकेमध्ये घोळ करतात, साखर वाटपामध्ये घोळ करतात, केरोसिन वाटपामध्ये लोकांना दमदाटी करतात. पेट्रोलपंपावर अवेळी जातात, पेट्रोल मालकांना ब्लॅकमेल करतात. अशा अनेक प्रकारच्या त्यांच्याविरुध्द तक्रारी आहेत. हया सर्व बाबी सिध्द करण्याच्या आहेत. नावामध्ये बदल करणे हा एक महत्वाचा भाग आहे. नावात बदल करण्याचा त्यांना अधिकार आहे काय ? असल्यास, कोणत्या नियमाखाली अधिकार आहे ? अधिकार असेल तर त्याचा वापर समानपणे करतात काय ? माझ्याकडे काही उदाहरणे आहेत. ते मी आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. खुर्शीद अहमद, जालना,आदेश क्र.परवाना क्र.10/88, दिनांक 3.7.2007 चा परवाना होता. यामध्ये दिनांक 31.8.2008 च्या आदेशानुसार मे.नाथ बाबा ट्रेडर्स, खुर्शीद अहमद, सुनील नेहरु चौधरी असा बदल केला. त्यानंतर श्री.बळवंत पवार, भोकरदन, आदेश क्र.94/89, दि.6.1.2006 चा परवाना होता. यामध्ये दिनांक 3.7.2007 च्या आदेशानुसार मे.ओम एजन्सी, बळवंत पवार व विश्वास जाधव असा बदल केला आहे. यानंतर विठ्ठल चौधरी, भोकरदन, परवाना क्र.21/88, दि.6.1.2996 या नावाने होता. - नंतर बदल - ....

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 13:50

(श्री. दिवाकर रावते....)

मे. सागर ऑईल एजन्सी, सतीश औटी, ईब्राहीम खान पठाण, नियतन आदेश क्रमांक 3.7.2007.

4) रत्नाकर पुराणिक परवाना 11/88, नियतन आदेश दिनांक 6.1.2006 - नंतर बदल - मे. रामरहीम केरोसिन ऑईल एजन्सी, रत्नाकर पुराणिक शफीक खॉ पठाण, नियतन आदेश क्र. 3.7.2007.

5) मे. जाधव एजन्सी प्रो. कचरु रायभान जाधव, रा. कोलते टाकळी परवाना क्र. 15/85 मंत्रालय आदेश 3.2.2004 - नंतर बदल - मे. जाधव एजन्सी प्रो. आबासाहेब रुस्तमराव खरात व इतर रा. कोलते टाकळी, नियतन आदेश दिनांक 31.1.2008.

अशा प्रकारे केलेले परवाना बदल नियमानुसार आहेत काय ? नसल्यास परवानाधारकांनी पैसे दिले नाहीत म्हणून हे बदल करण्याची कारवाई केलेली आहे काय ? तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिका-याविरुध्द विभागीय कार्यालयाकडून भ्रष्टाचाराची चौकशी सुरु आहे काय ? असल्यास, भ्रष्टाचाराचे स्वरुप काय आहे ? संबंधित पुरवठा अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन वेगवेगळया प्रकारे दहशत निर्माण करीत असल्याच्या 15-20 तक्रारी आपणाकडे प्राप्त झालेल्या आहेत काय ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी संबंधित जिल्हा पुरवठा अधिका-याने एजन्सीच्या नावामध्ये बदल केल्यासंबंधीची माहिती सभागृहाला दिली. ही सर्व माहिती त्यांनी माझ्याकडे द्यावी. नावामध्ये केलेला बदल हा नियमानुसार केलेला आहे की, अधिकाराच्या कक्षेबाहेर केला आहे याची पूर्ण चौकशी करुन त्यामध्ये ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. जिल्हा पुरवठा अधिका-यांच्या संदर्भात श्री. गुदगे यांची तक्रार प्राप्त झाली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिका-यांची नियुक्ती केलेली असून अतिरिक्त जिल्हाधिका-यांनी संबंधित तक्रारदार श्री. गुदगे यांना त्यांचे तक्रारीच्या संबंधात म्हणणे ऐकून घेण्यासाठी बोलावले असता ते येऊ शकले नाहीत. त्या तक्रारीच्या संदर्भातील अहवाल प्राप्त झालेला आहे. जिल्हा पुरवठा अधिका-यांच्या संबंधात अन्य स्वरुपाच्या तक्रारी आज तरी प्राप्त झ ालेल्या नाहीत. तरीही संबंधित अधिका-याच्या बाबतीत ज्या ज्या तक्रारी सन्माननीय सदस्यांकडे प्राप्त झालेल्या असतील त्या त्यांनी माझ्याकडे द्याव्यात. त्यानुसार प्रत्येक गोष्टीची शहानिशा आणि

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुनील तटकरे....)

चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल. माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्यासंदर्भात चौकशी पूर्ण झालेली आहे. पैसे मागण्याच्या संदर्भात लाचलुचत विभागाकडे तक्रार करण्यात आलेली असून त्याबाबतीत चौकशी सुरु आहे.

श्री. जगदीश गुप्ता : संबंधित अधिका-याच्या कारभाराबाबत डीपीडीसीमध्ये नापसंती व्यक्त करण्यात आलेली आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : डीपीडीसी हे लोकप्रतिनिधींचेच मंडळ आहे. त्यांच्याकडून तक्रार केली गेली असेल तर त्याचीही चौकशी केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : या जिल्हा पुरवठा अधिका-याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरु आहे. गुन्हा शाबीत होईपर्यन्त त्या अधिका-यावर कारवाई करावी असे मी म्हणणार नाही. परंतु चौकशी सुरु असल्यामुळे त्या अधिका-याची, कागदपत्रामध्ये हेराफेरी होऊ नये म्हणून, ताबडतोबीने बदली करावी. शासनाची इच्छाशक्ती असली तरी प्रशासनामध्ये अधिका-यांच्या पातळीवर फार गोंधळ निर्माण होत असतो. तेव्हा कागदपत्रामध्ये फेरफार होऊ नयेत यासाठी त्या अधिका-यांची बदली करण्यात येईल काय ?

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, संबंधित अधिका-यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु आहे. श्री. गुदगे यांनी जी तक्रार केली त्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना सांगू इच्छितो की, या सगळयाच बाबतीत उच्चस्तरीय चौकशी महिन्याभरात पूर्ण करु. सदरहू चौकशीमध्ये काही निष्कर्ष आढळून आले तर त्यांची बदली करु अथवा त्यांचे विरुध्द जी काही कारवाई करणे आवश्यक असेल ती केली जाईल.

**उपसभापती** : एखाद्या अधिका-यांची चौकशी चालू असेल आणि तो अधिकारी त्या कार्यालयातच कार्यरत राहणे हे ख-या अर्थाने मला देखील पटत नाही. ज्या अधिका-यांची चौकशी सुरु आहे आणि तो अधिकारी त्याच कार्यालयात कार्यरत असेल तर तो पुरावे नष्ट करण्याचे काम करील.

श्री. सुनील तटकरे : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सुरुवातीला जी काही माहिती दिली त्या अनुषंगाने पुरावे नष्ट करण्याचा प्रश्न येत नाही. ज्यांच्या नावाने परवाने होते, ते बदलण्याच्या बाबतीमध्ये त्यांनी नियमबाहय काम केलेले आहे. याबाबतीत वस्तुस्थिती काय आहे याबाबतीत चौकशीमध्ये आढळून येईल. ही एक प्रकारची विभागीय चौकशी सुरु आहे. एखाद्या वर्ग-1 च्या अधिका-यांची चौकशी होते, त्यावेळी विभागीय चौकशी आपण प्रस्तावित करीत असतो. या प्रकरणी देखील संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी करण्यात येईल असे मी घोषित करतो. विभागीय आयुक्त, महसूल, औरंगाबाद यांच्यामार्फत एक महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण केली जाईल.

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मी जालना जिल्हयातील असून तेथील परिस्थितीची मला पूर्णपणे जाणीव आहे. माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना दिनांक 8.10.2007, दिनांक 26.10.2007, दिनांक 5.11.2007 व दिनांक 15.11.2007 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बोलाविले होते. त्यांना या तारखांना बोलाविले त्याचा एखादा पुरावा माननीय मंत्री महोदयांकडे उपलब्ध आहे काय ? माझी अशी माहिती आहे की, सदरहू व्यक्तीला एकही वेळा जिल्हाधिकारी कार्यालयात बोलाविलेले नाही. दुसरे असे की, दिनांक 14.8.07 रोजी मे.एस्सार कंपनीच्या पेट्रोलपंपाची तपासणी केली असता पेट्रोलपंप धारकाने ग्राहकाची फसवणूक अधिका-यांना आढळून आले. या

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया....

तपासणीत नेमके काय आढळून आले आहे ? दिनांक 14.8.07 रोजीची तक्रार आहे आणि त्यासंबंधी गुन्हा दिनांक 18.8.07 रोजी दाखल झाला. पेट्रोलपंप धारकाने अधिका-याकडे यावे म्हणून चार दिवसानंतर गुन्हा दाखल केला गेला. चार दिवसानंतर गुन्हा का दाखल केला ? सदर अधिका-याने तक्रार धारकांवर अशाच पध्दतीने गुन्हा दाखल केला आहे. या अधिका-यांबद्दल जिल्हयात कोणी तक्रार केली तर त्या तक्रारदाराविरुध्द कोणत्या ना कोणत्या कारणाखाली गुन्हे दाखल केले जातात. या अधिका-यांच्या बाबतीत कोणी तक्रार करणार नाही एवढे दडपण त्या अधिका-यांचे त्या ठिकाणी आहे. सदर अधिका-यास त्याच कार्यालयात ठेऊन चौकशी केली तर त्या अधिका-याच्या विरुध्द कोणीही स्टेटमेंट देणार नाही. सभापती महोदय, माझ्याकडे सदर अधिका-याच्या बाबतीत बरेच पुरावे आहेत. ते पुरावे मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना सादर करतो. म्हणून माझा एवढाच प्रश्न आहे की, सदर अधिका-याची त्या ठिकाणाहून बदली करुन चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याची विभागीय आयुक्तांच्या मार्फत उच्चस्तरीय चौकशी एक महिन्याच्या आत पूर्ण केली जाईल. त्या चौकशीत जे निष्कर्ष येतील त्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांना सदरहू अधिकारी त्या ठिकाणी राहणे अडचणीचे वाटत असेल तर त्या अधिका-यांना एक महिना सक्तीने रजेवर पाठविण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपली अगतिकता बघूनच हा प्रश्न सदनात उपस्थित केलेला आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हिंगोली जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेबाबत सुध्दा असाच प्रकार घडला होता. त्या अधिका-यांनी केलेल्या अनियमिततेबाबतीत विधानसभा सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी सगळे पुरावे सादर केल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले की, संबंधित अधिका-यास निलंबित करतो. एका अधिका-यास निलंबित करण्यासाठी सदस्यांना सभागृहात बराच संघर्ष करावा लागला. माननीय मंत्र्यांनी संबंधित अधिका-यांना निलंबित करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन देऊन सुध्दा ते पाळले गेले नाही आणि म्हणून त्यासंदर्भात विशेषाधिकारभंगाची सूचना सादर करण्यात येत आहे

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अशी माहिती माननीय मंत्री महोदयांना दिली गेली, त्यानंतर माननीय मंत्र्यांच्या आश्वासनाचे विभागाकडून पालन केले गेले. या अधिका-यांचा विभागावर प्रचंड दबाव असतो. मी माननीय मंत्री महोदयांना दोष देत नाही. या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची बदली करा एवढीच आमची विनंती आहे. त्यांची बदली केली तरच सगळे पुरावे पुढे येतील. त्यांची बदली केली नाही तर पुरावे पुढे येणार नाहीत. त्या अधिका-यांना कार्यरत असलेल्या ठिकाणी ठेऊन, त्या अधिका-यांची चौकशी सुरु ठेवली तर निरपेक्ष चौकशी होणार नाही. म्हणून सदर अधिका-यांची तात्काळ बदली करण्यात येऊन तद्नंतर चौकशी करण्यात येईल काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु....

**उपसभापती** : ही वस्तुस्थिती आहे की, ज्या अधिकाऱ्यावर दोषारोप आहेत अशा अधिकाऱ्याने त्याठिकाणी काम करणे उचित होणार नाही. आपण नेहमी न्यायाच्या भूमिकेतून वावरत असता. जर काही कारवाई झाली नाही तर ही प्रथा पडेल आणि अधिकारी बेताल वागतील. अधिकाऱ्याची चौकशी करणारी मंडळी त्यांचीच असतात. एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याला वाचवीत असतो. शेवटी ज्याला न्याय पाहिजे त्याला न्याय मिळत नाही. माझेही स्पष्ट मत आहे आणि लोकप्रतिनिधींनी सुध्दा मागणी केली आहे त्यानुसार खरोखरच जर न्यायाच्या भूमिकेतून वागायचे असेल तर लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीचा शासनाने विचार करावा. या अधिकाऱ्याला निलंबित करणार नाही आणि नोकरीतून काढूनही टाकणार नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्याची बदली करण्याच्या बाबतीत महसूल विभागाला शिफारस करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगितले की, संबंधित पुरवठा अधिकाऱ्याची बदली करण्याबाबत महसूल विभागाला शिफारस करण्यात येईल. शिफारस केली तरी त्याची अंमलबजावणी होणार नाही. मी अनुभव घेऊन सांगत आहे. या खात्याचे प्रमुख म्हणून आपल्याकडे जी तक्रार आलेली आहे त्यानुसार संबंधित अधिकाऱ्याची बदली करण्याबाबत योग्य त्या सूचना महसूल खात्याला देण्यात येतील आणि त्याची अंमलबजावणी होईल याबाबत स्पष्ट भूमिका सांगावी.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, शासनाने उत्तर कसे द्यावे हे सुध्दा आता डिक्टेट व्हायला लागले आहे. शिफारस करीत असताना शिफारशीची ताबडतोब अंमलबजावणी करावी असे शिफारस करताना लिहिण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शिफारस केली आहे त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्याची बदली करण्यात येईल.

-------

**<u>लक्षवेधी सूचनेबाबत</u>**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्र. 4 पुढे ढकलण्यात आली आहे.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 'सज्जनगड' या तीर्थक्षेत्रावर पाणीपुरवठा होणेबाबत.

**मु. शी.** : .'सज्जनगड' या तीर्थक्षेत्रावर पाणी पुरवठा होणे यासंबंधी सर्वश्री .विनोद तावडे सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, रामनाथ मोते, गुरुमुख जागवानी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

""सज्जनगड" हे सातारा जिल्ह्यातील "क" वर्ग दर्जाचे असलेले तीर्थक्षेत्र, सदर ठिकाणी रामदास स्वामींच्या समाधी दर्शनाकरिता दररोज हजारो भविकांची होणारी गर्दी, दासनवमी व अन्य उत्सवाच्या दिवशी सुमारे ४० ते ५० हजार भाविक गडावर वास्तव्यास व दर्शनास येणे, या भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय होऊ न शकल्याने प्रसंगी भक्तांना द्यावयाचा प्रसाद तयार न करता येण्यासारखी परिस्थिती वारंवार निर्माण होणे, शासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वारंवार वेधले जाऊनसुध्दा अद्यापही सदर पाणी टंचाई दूर करण्याकरता कोणतीही उपाययोजना न करण्यात येणे, सातारा जिल्हा नियोजन समितीने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे दिनांक २९.०८.२००७ रोजी या कामासाठी निधी मिळण्याकरता पाठविलेला प्रस्ताव, पांगरे तलावामधून सज्जनगडास आवश्यक तो पाणीपुरवठा होण्याकरता देवस्थान व शासनाच्या जिल्हा परिषदेकडून सुचविण्यात आलेले खर्चाचे व कामाचे अंदाजपत्रक, सदर सर्व कामे होऊनही व वारंवार विनंती अर्ज करुनही गडावर पाणी पुरवठयाची व्यवस्था न झाल्याने दररोज येणाऱ्या हजारो भक्तांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. रणजित कांबळे ( पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )





<u>**निवेदनानंतर**</u>

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सज्जनगडावर पाणीपुरवठा करण्याच्या संदर्भातील हा विषय आहे. सज्जनगड हे तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ आहे. त्याचप्रमाणे हा ऐतिहासिक असा महत्वाचा भाग आहे. सातारा जिल्हा डीपीडीसीने एक वर्षापूर्वी याबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे. या गडावर हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात. तरीसुध्दा या गडावर पाणी पुरवठा करण्याच्या बाबतीत शासन उदासीन आहे. जे पैसे पाण्यासाठी वर्ग केलेले आहेत ते देखील निम्मे आहेत. डीपीडीसीने प्रस्ताव देऊन दोन वर्षे झाली तरी शासनाने याची दखल घेतली नाही. भाविकांना पिण्यासाठी पाणी नाहीच परंतु प्रसाद तयार करण्यासाठी देखील पुरेसे पाणी नाही. माझा प्रश्न असा आहे की, सज्जनगडावर पाणी पुरवठा करण्यासाठी पाणीपुरवठा योजनेचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे ? पाणी पुरवठा सुरळित होईपर्यंत शासन कोणत्या प्रकारची पर्यायी व्यवस्था करणार आहे ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ज्यावेळी निधीची तरतूद होईल त्यावेळी काम सुरु केले जाईल. डीपीडीसीने 2006-07 मध्ये संपूर्ण जिल्हयासाठी रु.83.50 लाखाची तरतूद केली होती. त्यापैकी रु.32 लाखाचा निधी सज्जनगड येथील वेगवेगळया कामावर खर्च झाला. कोणत्या कामाला प्राधान्य द्यायचे, किती तरतूद करावयाची हे काम डीपीडीसीमार्फत केले जाते. यावर्षी 1.13 कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. आता नवीन पध्दतीप्रमाणे डायरेक्ट निधी डीपीडीसीकडे जाणार आहे. यावर्षी डीपीडीसीने पर्यटनासाठी 2 कोटी रुपये ठेवले आहेत. त्यामधून कोणत्या कामाला प्राधान्य द्यायचे, कोणत्या कामासाठी किती निधी द्यायचा या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर केला तर शासन त्याची अंमलबजावणी करणार आहे. या संदर्भातील संपूर्ण नियोजन डीपीडीसी स्तरावर होते. पर्यटनासंबंधी 1.13 कोटी रुपयांचा प्रस्ताव केला आणि 30 लाख रुपयांचे नियोजन केले तर काम पूर्ण होणे अशक्य आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : भाविकांच्या दृष्टीने सज्जनगडावर पाणी केव्हा उपलब्ध होईल हे मंत्रीमहोदय सांगतील काय?

श्री.रणजित कांबळे : जिल्हा नियोजन समितीकडून तरतूद केली जाईल तेव्हा शासन योजना बांधून देणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तेथे यात्रेच्या दरम्यान 1 लाख भाविक येतात. सज्जनगडाचे महत्व दुर्जनाना माहिती नाही.

**उपसभापती** : मंत्रीमहोदयांना मी सूचना देतो की, सज्जनगड येथे यात्रेच्या पूर्वी पाण्याची व्यवस्था करावी.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : संजय गांधी हायस्कूल, वर्धा या शाळेत झालेला आर्थिक गैरव्यवहार

**मु. शी.** : संजय गांधी हायस्कूल, वर्धा या शाळेत झालेला आर्थिक गैरव्यवहार यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संजय गांधी हायस्कूल वर्धा या शाळेच्या गैरकारभाराबद्दल शासनाकडून पंचायत समिती, वर्धा येथील गटशिक्षणाधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती होणे, सदर शाळेतील दोन शिक्षकांचे सुमारे १० लाख २८ हजार १७८ रुपयांचे वेतन शासनाची फसवणूक व दिशाभूल करुन शाळेच्या मुख्याध्यापकांना अंधारात ठेवून वेतन पथकाकडे स्वत:च्या सहीने सादर करणे, वेतन पथकाने पडताळणी न करता गैरप्रकारास पाठींबा देऊन वेतन देयक मंजूर करुन शासनाची फसवणूक करणे, या संबंधात शिक्षण उपसंचालकांकडे शिक्षक परिषदेच्या कार्यकर्त्यांनी तक्रारी करणे, त्यानुसार शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती वर्धा यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांची परवानगी तथा वेतन देयकावर स्वाक्षरी न घेता स्वत:च्या अधिकाराचा गैरवापर करुन वेतन देयक सादर करुन शासनाची दिशाभूल केल्याचा निष्कर्ष काढणे, शिक्षणाधिकारी वर्धा यांनी नियमबाह्य पध्दतीने वेतन देयक मंजूर करण्याचा ठपका ठेवणे, सदर प्रकरणी दोषी व्यक्तिवर अद्यापही कोणतीही कारवाई न होणे, हा गैरप्रकार करणाऱ्यांना पाठीशी घालण्याच्या शासनाच्या भूमिकेबद्दल शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची कारवाई."

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.6.........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांवर शासनाची तिजोरी सांभाळण्याची जबाबदारी होती त्याच अधिकाऱ्यांनी संगनमताने शासनाचा रु.10 लाखापेक्षा अधिक निधीचा गैरव्यवहार केलेला आहे. ज्या शाळेचा उल्लेख केला त्या संजय गांधी हायस्कूल, वर्धा या शाळेतील दोन तुकडया कमी झाल्यानंतर त्याठिकाणी जे शिक्षक तातपुरत्या स्वरुपात काम करीत होते किंवा ज्यांना दोन वर्षे पूर्ण झालेली नव्हती त्या शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी, ज्या शिक्षकांना नियमाप्रमाणे संरक्षण मिळू शकत नाही अशा शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी त्या शाळेवर प्रशासकीय नेमले होते. ते प्रशासक, त्या विभागाचे शिक्षण उपसंचालक यांनी एकत्रित येऊन त्या शाळेच्या मुख्याध्यापकांना अंधारात ठेवून शासनाचे जवळजवळ 10 लाख रुपये खर्ची टाकले आहेत. मंत्रीमहोदयांनी निवेदनात म्हटले आहे की, 8.13 लाख रुपये दिले. हे खरे नाही. एक बिल रु.8,13,104 चे असून दुसरे बिल रु.2,15,074 चे आहे. एकाच दिवशी ही दोन्ही बिले मंजूर केलेली असून ही एकूण रक्कम रु.10 लाखापेक्षा अधिक आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .......

महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. नागपूर खंडपीठाने या शिक्षकांना वेतन देण्याच्या संदर्भात आदेश दिलेले होते की, कुठल्याही प्रकारचे वेतन या शिक्षकांना देऊ नये, अन्य शिक्षकांना देण्यात यावे. तरी देखील या शिक्षकांना वेतन अदा केले व त्यापोटी 10 लाख रुपये खर्च करण्यात आले, हे काय गौडबंगाल आहे ? ज्या तारखेला या वेतनासंबंधीचा प्रस्ताव दिला जातो त्याच दिवशी त्याला मंजुरी मिळते व 10 लाख रुपये मंजूर होतात. यासंबंधी चौकशी झाली आणि चौकशीमध्ये शिक्षण उप संचालकांनी निर्णय दिलेला आहे की, संबंधित अधिकारी यात दोषी आहेत, त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी. उप संचालकांनी हा अहवाल ऑगस्ट 2005 मध्ये दिलेला आहे. अशा प्रकारे तीन वर्षापूर्वी न्यायालयाने निकाल दिलेला असतानाही त्याबाबत कारवाई का करण्यात आली नाही ? तसेच न्यायालयाचा आदेश होता की, या दोन शिक्षकांना कुठल्याही प्रकारचे वेतन देऊ नये तरी देखील त्यांना 10 लाख रुपयाचे वेतन देण्यात आले त्याचे कारण काय ? आणि संबंधित अधिकारी निवृत्त होऊन तीन वर्षापर्यंतही कारवाई का केली नाही ? सध्या जे शिक्षक सेवेत आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : महोदय, संजय गांधी हायस्कूल, वर्धा या शाळेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे काही बाबींमध्ये निश्चितच तथ्य आहे. त्यांनी सांगितले की, अद्यापपर्यंत कारवाई का केली नाही ? वेतन का देण्यात आले ? सेवेत असलेल्यांविरुध्द कारवाई का करण्यात आली नाही? असे तीन प्रश्न त्यांनी विचारले आहेत. यासंबंधी दोन अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठित करुन एक महिन्याच्या आत कारवाईचा अहवाल सादर करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : महोदय, न्यायालयाचा आदेश असतांनाही वेतन का देण्यात आले ?

प्रा. वसंत पुरके : महोदय, अशा सर्व बाबी तपासण्यासाठीच एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येईल आणि त्यात जे दोषी आढळून येतील, मग त्यात उपसंचालक, प्रशासक अथवा शिक्षणाधिकारी कोणीही दोषी आढळून आले तरी त्यांच्यावर एक महिन्याच्या आत कारवाई करण्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात येईल.

----------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी क्र. 7 संबंधी.

**उपसभापती** : लक्षवेधी क्रमांक-7 च्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांनी पत्राद्वारे मला कळविले आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेवर मी दिलेली लक्षवेधी क्र. 7 पुढे ढकलण्यात यावी. त्यानुसार ती लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

(**<u>सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जगदीश गुप्ता</u>**)

----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ.शी.**: रॉयल्टी देण्याऐवजी तेंदुपत्ता संकलनाची मजुरी वाढविणे

**मु.शी.**: रॉयल्टी देण्याऐवजी तेंदुपत्ता संकलनाची मजुरी वाढविणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

महोदय, "विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात मोठया प्रमाणावर तेंदूपत्ता आदिवासी मजुरांकडून शासन गोळा करुन घेते. सदर तेंदूपत्ता विडी कारखानदारांना विकण्यात येतात, यावर्षी तेंदूपानाच्या लिलावापासून शासनाला कमी रॉयल्टी मिळाली असून त्यामुळे मजुरांनाही बोनस कमी मिळणार आहे. तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांच्या मजुरीत वाढ करण्याची आवश्यकता, शासनाच्या अंदाजाप्रमाणे 36 कोटी रुपये तेंदू मजुरांना तात्काळ बोनसच्या रुपाने वाटण्याची आवश्यकता लक्षात घेता तेंदू कामगारांना तात्काळ बोनस वितरित करण्याबाबत शासनाने निवेदन करावे." अशी मी विनंती करते.

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : महोदय, माझ्याकडे यासंदर्भातील माहिती उपलब्ध असल्यामुळे मी आपल्या परवानगीने ती माहिती आताच देऊ इच्छितो.

महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी जो विषय उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने मी चौकशी केली असून गेल्या 6 ते 10 वर्षांत तेंदूपत्ता विकतांना किती पैसे मिळाले आहेत ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ...

सभापती महोदय, तेंदूपत्त्याच्या संदर्भात जे गट काम करीत असतात त्या गटाच्या संदर्भात टेंडर काढून विक्री केली जात असते यासंदर्भात कमिटी सुध्दा स्थापन करण्यात आलेली आहे. कमिटी प्रमाणे लोक येतात व नंतर त्याचा लिलाव होत असतो तसेच प्रत्यक्षातही टेंडरही दिले जात असते, बीटही दिले जात असते. गेल्यावर्षी सगळयात जास्त पैसे मिळाले होते. 10 वर्षाचा रेंज हा 30-35 कोटी रुपयांचाच आहे त्यापेक्षा जास्त नाही. यावर्षी आपल्याला 55 टक्के कमी पैसे मिळाले असले तरी ते रेंज पेक्षा जास्त मिळालेले आहेत. गेल्यावर्षी बीडी उत्पादक एजंटमार्फत न येता ते स्वत: आले होते. या बिडी उत्पादकांना मागील वर्षी शेजारच्या राज्यात कमी प्रमाणात बिडी पत्ता मिळाला होता त्यामुळे बिडी उत्पादक स्पर्धेने उतरले होते त्यामुळे मागील वर्षी जास्त पैसे मिळाले होते. तेंदू पत्ता गोळा करण्याच्या कामासाठी मजूरी ठरवण्याचे काम कमिशनर आणि कलेक्टर यांची कमिटी करीत असतें. बीट विकल्यानंतर जे पैसे शासनाला मिळतात ते पैसे ट्रेझरीतून आस्थापनेचा खर्च कमी करुन प्रत्येक तेंदूपत्ता गोळा करणा-या माणसांला दिला जात असतो. तेंदूपत्ता गोळा करणा-या प्रत्येक माणसाची आमच्याकडे नोंद असते व त्याप्रमाणे आम्ही बोनस वाटण्याचा कार्यक्रमही केलेला आहे. दोन वर्षापूर्वीचा बोनस वाटण्यात आला असून गेल्या वर्षीचा बोनस वाटण्याच्या कामास सुरुवात होणार आहे. जो पत्ता गोळा करतो मग तो वनवासी असो किंवा आदिवासी असो त्यांना डायरेक्ट पैसे देण्याचे काम महाराष्ट्र शासनाकडून होत असते. देशातील इतर कोणत्याही राज्यात तेंदूपत्ता गोळा करणा-यांना डायरेक्ट पैसे दिले जात नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांची मजूरी वाढवली किंवा त्यांना बोनस दिला तरी सुध्दा हे पैसे त्यांच्या पर्यंतच जाणार आहेत. मजूर वाढवली तर ठेकेदार कमी दराने ठेका घेतील. त्यामुळे तेंदूपत्ता गोळा करणा-या मजरांच्या घरातच पैसा जाणार आहे. तरी सुध्दा कमी पैशाने जो ठेका विकला आहे त्याची चौकशी मी वरिष्ठांमार्फत करण्यास तयार आहे.

----------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....2

**पृ. शी.** : बाराव्या वित्त आयोगाच्या कामात झालेला भ्रष्टाचारावरुन बाचाबाची होणे

**मु. शी.** : बाराव्या वित्त आयोगाच्या कामात झालेला भ्रष्टाचारावरुन बाचाबाची होणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** ( श्री. जगदीश गुप्ता ) : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण नगरपरिषदेमध्ये 12 वित्त आयोगामार्फत सकपाळ नाका ते समुद्र किनारा रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण सुरु असून या रस्त्याची निविदा 20 टक्के जादा दराने देऊनही हा रस्ता उखडला गेला. त्यामुळे उखडलेल्या रस्त्याच्या संदर्भात एका नगरसेवकाने तक्रार केल्यामुळे मोठया प्रमाणात त्या ठिकाणी बाचाबाची झाली. या ठिकाणी जी काही कामे होतात त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे कामे निकृष्ठदर्जाची होतात. आपण या ठिकाणी विशेष उल्लेख मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

--------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य परिवहन मंडळाचे नुकसान टाळण्यासाठी एम.आर.टी.यू. कायद्यातून वगळण्याबाबत

**मु. शी.** : राज्य परिवहन मंडळाचे नुकसान टाळण्यासाठी एम.आर.टी.यू. कायद्यातून वगळण्याबाबत याबाबत श्री.संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्य परिवहन मंडळाचे तत्कालीन उपाध्यक्ष श्री. खोब्रागडे यांच्या आदेशान्वये सन 2005-2006 मध्ये ठाणे राज्य परिवहन विभागातील 50 टक्क्यापेक्षा कमी भारमानाच्या फे-या बंद करुन व त्या जास्ती प्रवासी असलेल्या भागात सुरु केल्या, परंतु योग्य नियोजन नसल्याने या मार्गावरील फे-यांचे नियोजन पूर्ण पणे कोलमडली असून आजही प्रवासी असून आजही प्रवासी असून भारमानात वाढ होत नाही. त्या मुळे राज्य परिवहन विभागाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे व प्रवासीही हैराण होत आहेत . यात सुधारणा व्हावी म्हणून कार्यक्षम अधिकारी नेमणे बाबत राज्य परिवहन मंडळाला लेखी कळवूनही उपयोग झालेला नाही. जे अधिकारी आहेत ते फक्त त्यांची राज्य परिवहन मधील आपली संघटना संभातात, त्यामुळे इतर संघटनांचे कर्मचारी असहकार करतात पर्यायाने राज्य परिवहन मंडळाचे नुकसान होते. हे सर्व टाळावयाचे असेल तर राज्य परिवहन मंडळाला "एम.आर.टी.यु" कायद्यातून वगळावे तरच ठिकठिकाणचे विभाग फायद्यात येतील. यावर शासनाने योग्य ती कार्यवाही करावी म्हणून सदर बाब विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणीत आहे.

---------------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : व्यवसाय शिक्षण विभागातील रिक्त पदे तसेच तंत्र शिक्षण माध्यमिक शाळातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची विना अनुदानित सेवा वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत

**मु. शी.** : व्यवसाय शिक्षण विभागातील रिक्त पदे तसेच तंत्र शिक्षण माध्यमिक शाळातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची विना अनुदानित सेवा वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राहय धरणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिक सभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, तंत्रशिक्षण विभागातील महत्वाचा मुद्दा विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. व्यवसाय शिक्षण विभागातील जिल्हा स्तरावरील 80 टक्के पदे रिक्त आहेत. राज्य शासनाचे आणि केंद्रशासनाचे कोटयावधी रुपयांचे अनुदान तंत्रशिक्षण विभागाला मिळत असतांना योग्य नियोजन होत नसल्यामुळे सदर प्रकल्प राबविण्यासाठी आणि नियोजन करण्यासाठी अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे ख-या अर्थाने तंत्रशिक्षण विभागाकडे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. अधिका-यांची बहुतेक पदे रिक्त असल्यामुळे ख-या अर्थाने अडचणी येत आहेत. मुंबई जिल्हयातील 6 जिल्हयामध्ये असल्याबाबत व तंत्र शिक्षण माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांची विना अनुदानित सेवा वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

फक्त एकाच जिल्हयाच्या ठिकाणी पूर्णवेळ अधिकारी उपलब्ध आहेत बाकीच्या पाच ठिकाणी अधिकारी उपलब्ध नाहीत. अशा प्रकारे अधिकाऱ्याच्या बाबतीत अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे यानंतर मला दुसरा एक मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. माध्यमिक स्तरावरील जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याना ज्या प्रमाणे अधिकार आहेत तशाच प्रकारचे काही अधिकार जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकाऱ्यांना प्रदान करण्याची आवश्ययकता आहे. काही लहान सहान समस्यांसाठी किंवा अन्य काही कामासाठी वा मान्यता घेण्यासाठी त्यांना विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत असतात. तेव्हा याबाबतीत देखील शासनाने विचार करावा आणि शालेय शिक्षण विभागाप्रमाणे वरिष्ठ आणि निवड श्रेणीचा या कर्मचाऱ्यांना लाभ होण्यासाठी तंत्र शिक्षण विभागाने तातडीने शासन निर्णय निर्गमित करावा. त्याचबरोबर तंत्र शिक्षण विभागात काम करणाऱ्या सर्व घटकातील कर्मचाऱ्यांना विना अनुदानित सेवेचा लाभ वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी लाभ मिळावा याकरिता शासनाने त्वरित उपाययोजना करावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील ऐतिहासिक गोपाळगडाचा होत असलेला -हास

मु.शी गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील ऐतिहासिक गोपाळगडाचा होत असलेल्या -हासा बाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

" रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यातील अंजनवेल गावाच्या दक्षिणेस तीनही बाजूने पाण्याने वेढलेल्या टेकडीवर गोपाळगड आहे. या गडाला लाबलचक तटबंदी असून या तटबंदीला लागून वीस फूट खोल खंदक आहे. काळाच्या ओघात एका ठिकाणची तटबंदी थोडीशी ढासाळलेली आहे. याच जागी ढासाळलेल्या तटबंदीचेच दगड व माती वापरुन खंदक बुजविण्यात आला. एक ट्रक आत जाऊ शकेल एवढी आणखी तटबंदी पाडून या दगडमातीची भर खंदकात घातली गेली. तटबंदीच्या आतील जागा वाहनांसाठी समतोल करुन घेण्यात आली असून गडाच्या स्थापत्याची पूर्ण विल्हेवाट लावण्यात आली. या गडाच्या आतील भागात आंब्याच्या बागा असून या बागेतील मालाची ने आण करण्यासाठीच गडाचे नुकसान करण्यात आले. या गोपाळगडाचा शासनाने गवताळ कुरण म्हणून 1960 साली लिलाव केल्यामुळे या पुरातन वास्तूवर खाजगी व्यक्ती आपला ,हक्क दाखवीत आहेत. पुरातन वास्तूच्या करण्यात आलेल्या नुकसानाबाबत गुहागर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करण्यास गेले असता पोलीस तक्रार घेण्यास टाळाटाळ करीत आहेत.शासनाच्या दुर्लक्षामुळे शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे प्रतिक असलेला हा गडकोट हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. शासनाने या गोपाळगडाच्या होणाऱ्या -हासाचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे असून सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे."

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ठाणे जिल्हयातील नागरी व ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठया साठी बृहत आराखडा तयार करणे

मु.शी : ठाणे जिल्हयातील नागरी व ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठयासाठी बृहत आराखडा तयार करण्याबाबत श्री.कपिल पाटील,वि.प.स यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. :-

" ठाणे जिल्हयातील नागरी व ग्रामीण भागातील एमएमआरडीए च्या क्षेत्रातील पाणी पुरवठा विस्कळीत आहे. याचे मुख्य कारण या शहरांना पाणीपुरवठा करणा-या विविध योजना असून त्यात समन्वय नाही.

या जिल्हयातील सर्व महानगरपालिका या प्रश्नावर आपल्या स्तरावर मर्यादित निधीसह उपाययोजना करीत असतात पण त्या अपयशी ठरतात.

एमएमआरडीए मार्फत बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे त्या धर्तीवर एमएमआरडीए मार्फत पाणी पुरवठयाचा बृहत आराखडा नव्याने तयार करुन एमएमआरडीएच्या निधीतून इंटरनल वॉटर सप्लाय ग्रीड स्थापन करावी जेणे करुन अडचणीच्या वेळी या आपत्कालीन स्थितीत परस्परांना पाणीपुरवठा करता येईल.

याबाबत शासनाने मुंबईसह असे इंटरनल वॉटर सप्लाय ग्रीड स्थापन करण्याचा त्वरित निर्णय घ्यावा यासाठी मी विशेष् उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनाचे लक्ष् वेधू इच्छितो."

सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील प्रश्नासबंधीची चर्चा मघाशी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी चर्चा झाली होती. या जिल्हयामध्ये ठाणे, कल्याण - डोंबिवली, उल्हासनगर , मिरा भाईदर, वसई विरारच्या पट्टीमध्ये लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. त्या ठिकाणी ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्याचा मोठा ताण या जिल्हयावर पडत असतांना त्या ठिकाणी बेसिक इनफ्रास्ट्रक्चर देण्याची आवश्यकता आहे परंतु अजूनही ते देण्यात आलेली नाही. या जिल्हयात सर्वात मोठी समस्या पाण्याची आहे. या जिल्हयातील ग्रामीण आणि शहरी भागात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. मार्च, एप्रिल, मे आणि जून या चार महिन्यामध्ये पाण्याचा फार त्रास सहन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावा लागतो. या भागाचा नियोजनबध्द विकास व्हावयाचा असेल तर एम.एम.आर.डी.ए.ने ज्या प्रमाणे बृहत आराखडा करण्याचे काम सुरु केलेले आहे त्याप्रमाणे पाण्यासाठी देखील एक बृहत आराखडा तयार करण्याची त्याचबरोबर इंटरनल वॉटर सप्लाय ग्रीड तयार करण्याची आवश्यकता आहे. आपण जर ही व्यवस्था करु शकलो नाही तर आपत्कालीन स्थितीत किंवा अडचणीच्या वेळी परस्परांना मदत करता येणार नाही म्हणून या दोन्ही गोष्टीची मागणी मी प्रश्नोत्तराच्या तासात केली होती माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी त्यावर विचार करण्याचे आश्वासन दिले होते. तेव्हा मी ज्या बाबी मांडलेला आहे त्याला शासनाने त्वरित गती द्यावी तसेच स्टेम प्राधिकरणाच्या धर्तीवर या कामासाठी एक वेगळे प्राधिकरण तयार करावे अशी मी मागणी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

26-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC5

VTG/ D/

पृ.शी : खारघर येथे सिडको मार्फत देण्यात येणा-या घरासाठी अपंगाना आरक्षण देणे

मु.शी : खारघर येथे सिडको मार्फत देण्यात येणा-या घरासाठी
अपंगाना आरक्षण देण्याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते

" सिडकोमार्फत बांधण्यात आलेल्या खारघर येथील स्पॅगेटीच्या दुस-या फेजच्या घरांची सोडत सिडकोनी काढलेली आहे.तथापि यात सिडकोने घर देतांना अपंगासाठी आरक्षण न ठेवणे, राज्य शासनाच्या जी.आर.मध्ये अपंगासाठी तीन टक्के आरक्षण प्रत्येक क्षेत्रात जाहीर केले असणे, त्याचप्रमाणे अपंगाना सिडकोमार्फत खारघर येथील स्पॅगेटी या दुस-या फेजच्या घराच्या विक्रीमध्ये आरक्षण देण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व श्ांसनाची प्रतिक्रिया "

सभापती महोदय, सिडकोच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांसाठी घरे बांधण्याचा कार्यक्रम खारघर येथे सुरु करण्यात आला असून उद्या पासून सिडकोच्या मार्फत फॉर्मस् उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत परंतु ही घरे देत असतांना अपंगाना कोणतेही आरक्षण ठेवण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासनाच्या जी.आर. नुसार अंपगाना तीन टक्के आरक्षण प्रत्येक क्षेत्रात ठेवण्यात आलेले आहे.परंतु ही घरे देत असतांना अपंगाना आरक्षण ठेवण्यात आलेले नाही ते ठेवण्यात यावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे. सिडको मार्फत सर्वसामान्य लोकांना घरे उपलब्ध करुन देत असतांना जे अपंग लोक आहेत त्यांच्यासाठीदेखील आरक्षण ठेवण्यात यावे अशी विनंती मी या निमित्ताने करते.

***

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्हा टेक्स्टाईल झोन म्हणून घोषित करणे.

**मु. शी.** : बीड जिल्हा टेक्स्टाईल झोन म्हणून घोषित करणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते. -

मराठवाडा विभागामध्ये मोठ्या प्रमाणात ज्याला पांढरे सोने म्हणतात अशा कापसाची लागवड होते. औरंगाबाद जिल्ह्यात 2 लाख 10 हजार हेक्टरवर आणि बीड जिल्ह्यात 1 लाख 60 हजार हेक्टरवर, जालना जिल्ह्यात 1.83 लाख हेक्टरवर कापसाची लागवड होते. मराठवाडा हा कापूस बेल्ट म्हणून जाहीर करावा. बीड जिल्ह्याचे खरीपाचे एकूण क्षेत्र साडेचार लाख हेक्टर आहे त्यापैकी एक तृतियांश क्षेत्र कापसाच्या लागवडीखाली येते. कापूस मोठ्या प्रमाणात तेथे उपलब्ध होतो म्हणून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वारंवार टेक्स्टाईल झोन म्हणून बीड जिल्हा जाहीर करावा अशी मागणी केली आहे. यातील काही बाबी या केंद्र शासनाशी संबंधित असल्या तरी देखील महाराष्ट्र शासनाने या दृष्टीने अत्यंत सहानुभूतीने पाहण्याची गरज आहे. बीड जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 10 लाख 68 हजार हेक्टर असून त्यात मशागती योग्य क्षेत्र हे 8 लाख 76 हजार हेक्टर इतके आहे. यामध्ये साधारणत: 69 टक्के लोक शेती व्यवसायात आहेत. यातील महत्त्वाचा भाग हा कापसाचा आहे आणि त्या दृष्टीने आपण विचार करण्याची गरज आहे. या ठिकाणी मला एका बाबीचा उल्लेख करावासा वाटतो. ऊसाखालील क्षेत्रात पुढील वर्षी साधारणपणे 12 हजार क्षेत्र ऊसाचे घटून नगदी पीक म्हणून कापूस पिकाखाली येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे आणि बीटी कापूस मोठ्या प्रमाणात बीड जिल्ह्यात लागवड होण्याची शक्यता आहे. पूर्वी जरूर ऊसाचे क्षेत्र या भागात जास्त असले तरी आता त्यात मोठ्या प्रमाणात घट होण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे. कारण गेल्या वर्षी शिल्लक ऊसाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण

..... डीडी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे ....

झाला. त्यातून आता शेतकरी कापसाकडे वळलेला आहे. बीड जिल्ह्यातील कापसाचे क्षेत्र हे साधारणपणे 2007-08 मध्ये 1 लक्ष 63 हजार हेक्टर इतके होऊ लागले आहे. कापसाच्या लागवडीचा हा दर आपण पाहिला तर महाराष्ट्रात कापूस उत्पादनामध्ये बीड जिल्हा अग्रेस होऊ लागला असल्याचे आपल्याला समजून येईल. ज्याप्रमाणे विदर्भात अगोदरच्या काळात परिस्थिती होती तशी परिस्थिती आता बीड जिल्ह्यात कापसाच्याबाबतीत निर्माण झालेली आहे. म्हणून या संदर्भात योग्यपणे विचार होणे आवश्यक आहे आणि टेक्स्टाईल झोन म्हणून बीड जिल्हा जाहीर करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत अशा प्रकारचा विशेष उल्लेख मी येथे सादर करते. धन्यवाद.

***

....... डीडी 3 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कर्नाटकातील मराठी माध्यमाच्या डीएड कॉलेजांतून शिक्षण घेतलेल्या अध्यापकांना महाराष्ट्रातील शाळांमध्ये सेवेत न घेणे.

**मु. शी.** : कर्नाटकातील मराठी माध्यमाच्या डीएड कॉलेजांतून शिक्षण घेतलेल्या अध्यापकांना महाराष्ट्रातील शाळांमध्ये सेवेत न घेणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते. ..

महाराष्ट्रातील बरीच मुले कर्नाटकामध्ये शिकावयास जातात. बीएमएस आहेतच, त्यांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात या अगोदरच राज्यात निर्माण झालेला आहे. रजिस्ट्रेशन दोन राज्यात करायचे की एका राज्यात करायचे ? त्याबाबत केंद्र सरकारच्या वेगळ्या सूचना, राज्य सरकारच्या वेगळ्या सूचना आहेत. अशाच प्रकारची संभ्रमावस्था डीएडच्या विद्यार्थ्यांची झालेली आहे. कर्नाटक राज्यातील मराठी माध्यमाच्या डी.एड. महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्या अध्यापकांना महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त शाळांमधून नोकरीत सामावून घेतले जात नाही. केंद्र शासनाच्या धोरणानुसार देशात सर्व राज्यातील डी.एड. महाविद्यालयांना परवानगी देण्यात येते व त्यांनी दिलेला अभ्यासक्रम राबविला जातो. कर्नाटकातील मराठी माध्यमाच्या डी.एड. महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या व महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्या अध्यापकांचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. या संदर्भात माझ्याकडे एक निवेदनाची प्रत आहे. खासदार श्रीमती निवेदिता माने यांनी शिक्षण मंत्र्यांना या संदर्भात दिलेले पत्र देखील माझ्याकडे आहे. अशी अनेक प्रकारची अध्यापकांची पत्रे आणि निवेदने मंत्री महोदयांना देखील गेलेली आहेत. परंतु याचे कोठलेही उत्तर लोकप्रतिनिधींना आणि विद्यार्थ्यांना देखील शासनाच्या मंत्र्यांनी दिलेले नाही. सीमा भागातील जे असे रहिवासी आहेत की ज्यांनी कर्नाटकामध्ये शिक्षण घेतले त्यांना आपण अशा

...... डीडी 4 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे .....

पद्धतीने सेवेत सामावून घेतले आहे. परंतु जे महाराष्ट्राचे रहिवासी आहेत पण त्यांना नोकरीत सामावून घेतले जात नाही हा खऱ्या अर्थाने त्यांच्यावर होणारा मोठा अन्याय आहे. म्हणून राज्य सरकारने, शिक्षण विभागाने त्वरित अशा अध्यापकांना नोकरीत सामावून घेण्याचा निर्णय घ्यावा आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी या लोकांना दिलासा द्यावा अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करते. धन्यवाद.

**तालिका सभापती** (श्री. जगदीश गुप्ता) : आता सभागृहाची बैठक मध्यंतराकरिता अर्धा तास स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन्हा भरेल.

( 2.30 ते 3.00 मध्यंतर )

( यानंतर सौ. रणदिवे.... इइ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे चालू )

**तालिका सभापती** : आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु होईल. काल सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांचे भाषण अपूर्ण होते. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, दिनांक 23.3.2007 रोजी मी स्वत: विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले होते की, राज्य शासनाने नियमित लेखा शीर्षातून कायम स्वरुपी आर्थिक तरतूद करुन हातपंप दुरुस्ती कामगारांना मदत करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदांना आर्थिक तरतूद उपलब्ध करुन द्यावी आणि तशा प्रकारचे ठोस आश्वासन द्यावे अशी मी विनंती केली होती. आपली जी त्रिस्तरीय पध्दती आहे त्यामध्ये शासन भूवैज्ञानिकांचा पगार करते. शासन सुरुंग पथकातील कर्मचाऱ्यांचा पगार करते. फक्त हातपंप कामगार शिल्लक राहतात. त्याबाबतीत माननीय जलसंपदा व पाणीपुरवठा मंत्र्यांना पत्र दिले होते. त्यांचे उत्तर आले की, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. शासनाने यासंदर्भात गंभीरपणे पावले उचलून आणि हातपंप कामगारांसाठी ताबडतोब निधी उपलब करुन कायम स्वरुपी त्यांच्या पगाराचा प्रश्न सोडवावा. वसुलीच्या संदर्भात पाहिले तर ग्रामपंचायत पातळीवर वसुलीच्या संदर्भात फार अडचणी निर्माण होतात. त्यांनी वसुली करावी व त्यातून पगार द्यावा अशी परिस्थिती आहे. त्यामुळे हातपंप दुरुस्त होत नाहीत आणि हातपंप दुरुस्त न झाल्यामुळे राज्य पातळीवर पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो.

सभापती महोदय, काल मी अनेक मागण्या केलेल्या आहेत आणि आज काही मागण्या सभागृहासमोर ठेवते. या सर्व बाबी सभागृहासमोर ठेवत असताना काही बाबींच्या संदर्भात शासनाचे अभिनंदन करणे तसेच राज्य शासनाने ज्या चांगल्या बाबी केलेल्या आहेत त्याचा उल्लेख करणे मी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/

श्रीमती उषा दराडे ....

माझी जबाबदारी समजते. संत कबीर यांनी एका ठिकाणी असे लिहिले आहे की,

कबीर कहे पुकार के दो बातें लिख ले

कर साहब की बंदगी भूखे को कुछ दे.

दीन, दलित, गरीब यांच्या हातातोंडाची गाठ घालण्याच्या दृष्टीने हा जो अर्थसंकल्प आहे तो बरोबर आहे की, नाही याचे विश्लेषण योग्य पध्दतीने होणे गरजेचे आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे हा अर्थसंकल्प निश्चितच पुरोगामी विचारांचा आणि महाराष्ट्राचे प्रश्न सोडविणारा आहे. याती काही ठराविक बाबींचा उल्लेख मी या ठिकाणी करते. शासकीय कर्मचाऱ्यांवरील वेतनाचा खर्च 49.4 टक्क्यावरुन 41.7 टक्क्यावर खाली आणलेला आहे. राज्यात दरडोई उत्पन्न वाढलेले असून मागील वर्षाच्या तुलनेमध्ये 5 हजार रुपयाने ते वाढलेले आहे. मुंबईमध्ये दरडोई उत्पन्न 65361 रुपये आहे. पुण्यामध्ये 60375 रुपये, वाशीममध्ये 20774 रुपये दरडोई उत्पन्न आहे. यामध्ये थोडीशी दुरुस्ती करावी लागेल. या दरडोई वाढीचा निर्देशांक संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण भागात, आदिवासी भागात आणि शहरी भागात समान पातळीवर कसा आणता येईल याबाबतीत जाणीवपूर्वक प्रयत्न करावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, शासनाने फार मोठी कर्जमाफी केलेली आहे. याबाबत केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे तसेच माननीय श्री. शरद पवार साहेबांचे मी कालच अभिनंदन केलेले आहे. या कर्जमाफीमध्ये महाराष्ट्रात एकूण 10,061 कोटी रुपयांची कर्जमाफी दिलेली आहे. या ठिकाणी असा आरोप झाला की, मराठवाडा आणि विदर्भाला याचा फायदा होत नाही. परंतु आपण आकडेवारी पाहिली तर मराठवाड्यामध्ये 2918 कोटीच्या कर्जमाफीचा फायदा झालेला आहे. विदर्भामध्ये 1728 कोटी, खानदेशमध्ये 2445 कोटी, पश्चिम महाराष्ट्रामध्ये 2766 कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा फायदा झालेला आहे. कोकणामध्ये शेतकऱ्यांकडे कर्ज कमी होते त्यामुळे त्या ठिकाणी 206 कोटी रुपयांचे कर्ज माफ झालेले आहे. बीड जिल्हयात कोकणाच्या तुलनेत दुप्पट म्हणजे 442.57 कोटी रुपयांची कर्जमाफी झालेली आहे. ही अभिनंदनाची बाब आहे. यामुळे जी पत वाढली त्यातून नवीन कर्जपुरवठा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने पावले उचलेली आहेत त्याचेही मी या ठिकाणी अभिनंदन करते.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

साधारणपणे एक बाब मला अशी नमूद करावयाची आहे की, कृषी प्रधान अर्थसंकल्प हा देशात आणि राज्यात महत्वाचा विषय सुरु झालेला आहे. रालोआ सरकारच्या काळामध्ये 2200 कोटी रुपये कृषी खात्यासाठी तरतूद ठेवली गेली होती. आज माननीय श्री.शरदराव पवार हे देशाचे कृषी मंत्री झाल्यावर 65,600 कोटी रुपयांपेक्षा जास्त बजेट कृषी खात्याला मिळू लागले आहे. पूर्वी केवळ 1.5 टक्के म्हणजे नगण्य तरतूद केली जात होती आता त्यात भरघोस वाढ केली जात आहे. महाराष्ट्राच्या उत्पन्न वाढीचा दर 9 टक्के अपेक्षित केलेला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातून उत्पन्न वाढीचा हा दर गाठला जाईल याची मला खात्री आहे. सभापती महोदय, काही योजना यशस्वीपणे राबविल्या आहेत त्याचाही मी उल्लेख करीन. निर्मल ग्राम स्वच्छता योजनेमध्ये संपूर्ण देशात राज्य प्रथम क्रमांकावर आहे. तंटा मुक्त गाव, ही योजना यशस्वीपणे राबविली जात आहे. खाजगी सावकाराविरुध्द शासनाने कायदा केला आहे त्याची अंमलबजावणी कठोरपणे करण्यासाठी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी खंबीरपणे पावले उचलली आहेत. पण त्याचबरोबर खाजगी सावकाराच्या कर्जाबाबत माननीय श्री.पवारसाहेबांनी शेतक-यांना आवाहन करुन सांगितले आहे की, खाजगी सावकारांच्या कर्जाची परतफेड करु नका. सरकारने शेतक-यांना कर्जमाफी करुन दिलासा दिलेला आहे. परंतु खाजगी व्यापा-यांच्या विळख्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी, त्यांना मानसिक पाठबळ दिले पाहिजे. प्रशासनाने शेतक-यांना सहकार्य करणे आवश्यक आहे. म्हणून श्री.पवारसाहेबांच्या आवाहनाला शेतक-यांनी, शासनाने, जनतेने प्रतिसाद देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे शेतक-यांना सवलतीच्या दराने म्हणजे 6 टक्के दराने कर्जपुरवठा करण्याचा पूर्वीचा निर्णय आहे तो यापुढेही चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हा क्रांतिकारी निर्णय आहे. परंतु सर्व जिल्हयामध्ये या निर्णयाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. कारण काही जिल्हयात त्याची अंमलबजावणी होते, काही जिल्हयात होत नाही. ती होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख व्याज अनुदान योजना सुरु केली आहे, या योजनेबाबत मी सरकारचे अभिनंदन करते.

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

सभापती महोदय, राज्याचे निव्वळ उत्पन्न 2006-07 या वर्षात वाढले होते. स्थिर किंमतीनुसार राज्याचे स्थूल उत्पन्न 9 टक्क्याच्या जवळपास गेले होते. ज्यावेळी राष्ट्रीय दरडोई उत्पन्न 33,131 इतके होते त्यावेळी राज्याचे 46,269 रुपये दरडोई उत्पन्न होते. म्हणजे राष्ट्राच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्न निश्चितच पुढे गेलेले आहे. सभापती महोदय, आणखी एक अभिनंदनाची बाब अशी आहे की, जलसिंचनासाठी 6 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातून 1 लाख 5 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न करणार आहे. जिल्हा नियोजनामध्ये 85 टक्क्यांनी वाढ केलेली आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता यांच्या अधिकारांमध्ये मोठया प्रमाणात वाढ केलेली आहे. रोजगार हमी योजनेसाठी 2000 कोटींची शिल्लक नेहमी असेल अशी दक्षता घेतली जाईल असा या अर्थसंकल्पात उल्लेख केला आहे. मौलाना अब्दुल कलाम आझाद वित्तीय महामंडळासाठी 50 कोटींची तरतूद केलेली आहे. हे सर्व करीत असताना आणखी काही करण्याची आवश्यकता आहे. म्हणजे थोडा है, थोडे की जरुरत है असे म्हणावे लागेल. केले आहे त्याबद्दल अभिनंदन आणि जे मागू ते द्याल याची खात्री आहे. या खात्रीमुळे आणि हे शासन कृतिशील असल्यामुळे मी या शासनाकडून अपेक्षा करीत आहे.

राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम केंद्र शासनाच्या मदतीने केले जात आहे. परंतु माझ्या धारुर तालुक्यातील बांगरवाडा येथे आजही आजारी माणसाला झोळीत टाकून न्यावे लागते. हे सांगताना मला दु:ख होते. त्या गावाला आजही रस्ता नाही. मी मागील दोन वर्षात डझनभर रस्त्यांच्या कामांची यादी शासनाला सादर केली आहे. शासनाने थोडेसे धोरण बदलावे आणि 60 वर्षानंतरही वाडया, तांडया रस्त्यांने जोडलेल्या नाहीत त्याकडे अधिक लक्ष द्यावे. त्याचा सर्व्हे करावा आणि त्यांना प्राधान्यक्रम द्यावा. दुसरी अशी विनंती आहे की, 1972 साली केलेले रस्ते आहेत. गट अ व ब चे कार्यक्रम ठराविक ठिकाणीसाठी दिले जातात. अनेक रस्ते असे आहेत की ज्या रस्त्यांवर 30 वर्षात एक घमेले खडी किंवा डांबराचे टोपले टाकलेले नाही. धान्य लागवडीला राज्यात प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. पंजाब व हरियाणा या राज्यांनी गहू

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

देऊन देशाचा प्रश्न सुटणार नाही. गुजरातसारखी अनेक राज्ये अशी आहेत की जे गहू पिकवितात पण देशाला गहू देण्याची दानत दाखवित नाहीत. म्हणून महाराष्ट्र शासनाने गहू लागवडीला, धान्य लागवडीला प्रोत्साहन देऊन शेतकरी अधिकाधिक या पिकाकडे कसे आकर्षित होईल आणि राज्याची व देशाची गरज कशी भागवू शकेल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाचे दोन विभाग करण्याची गरज आहे. ही बालके आमची आहेत, आनंद आहे, गर्व आहे, स्वाभिमान आहेत, आमच्या काळजाचा ते तुकडा आहेत. पण असे असले तरी आम्हाला तुम्ही घराच्याही बाहेर काढणार नाही आणि खात्यामध्ये सुध्दा बांधून ठेवणार. माझी विनंती आहे की, राज्याने देशात पहिले पाऊल उचलून महिलांच्या सक्षमीकरणासाठी वेगळे खाते निर्माण करावे आणि बालकल्याणाचे वेगळे खाते करावे. अर्धी शक्ती महिलांची आहे आणि त्यांच्यासाठी कक्ष नाही. म्हणून वेगळा कक्ष स्थापन करण्यासाठी शासनाने गांभीर्यपूर्वक पावले उचलावीत. मला खात्री आहे की, पुरोगामी विचाराचे हे राज्य आहे. महिलांना न्याय देणारे राज्य आहे. महिलांसाठी निर्णय घेणारे हे राज्य हा निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे...)

रेल्वेच्या बाबतीत मला एक विनंती करावयाची आहे. बीड जिल्हयाच्या आजूबाजूच्या सर्व जिल्ह्यांसाठी राज्याने खर्चाचा 50 टक्के वाटा उचलला आहे. पण नगर-परळी-बीड या रेल्वेच्या बाबतीत बीड जिल्ह्याला का वाळीत टाकले जात आहे हे कळत नाही. या रेल्वेमार्गाच्या भूसंपादनाचा निधी 1993सालीच लॅप्स झालेला आहे. हा भूसंपादनाचा निधी शासनाने देऊन बाकी खडीकाम, मातीकाम रोजगार हमी योजनेतून करावे आणि बीड जिल्ह्याचे आर्थिकदृष्ट्या मागासलेपण दूर करावे. आर्थिकदृष्ट्या हा शब्दप्रयोग मी जाणीवपूवक करीत आहे. बीड हा नेतृत्व करणारा जिल्हा आहे. म्हणून हा खर्च राज्य शासनाने करावा अशी मी विनंती करते.

बीड जिल्हयामध्ये खूप पाझर तलाव आहेत. हे पाझर तलाव गाळाने भरलेले असल्यामुळे पाणी जमिनीमध्ये मुरत नाही ते वाहून जाते. लघुसिंचन तलाव देखील गाळाने भरलेले असल्यामुळे त्यातील पाणी वाहून जाते. जायकवाडी धरणामध्ये गाळ आहे, सगळया मोठ्या तलावांमध्ये गाळ साचलेला आहे. परवाच मी बातमी वाचली की, धारुर तालुक्यातील अरणवाडीमध्ये सिंचन तलावाच्या बांधकामामध्ये मातीच वापरली जात नसल्यामुळे तेथे पाणी राहील की नाही अशी शंका आहे. असे अनेक प्रश्न मांडण्यासाठी वेळ कमी असल्यामुळे मी जाणीवपूर्वक एकाचाच उल्लेख केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व तलावामध्ये गाळ साचलेला असल्यामुळे जेवढे कमी पाणी बीड जिल्ह्याला मिळते ते सर्व पाणी वेगळया पध्दतीने, वेगळे साठवण तलाव देऊन देण्याया दृष्टीने जाणीवपूर्वकय प्रयत्न करावा अशी मी विनंती करते.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय यांना फी मध्ये सवलत दिलेली आहे. परंतु ही फी समाजकल्याण खात्याकडून भरली जात नाही. एका विद्यार्थीला पैसे भरा म्हणून सांगितल्याची नोटीस माझ्याकडे आजच प्राप्त झालेली आहे. याबाबतीत आपण ताबडतोबीने निर्णय घ्यावा.

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कायमस्वरुपी शाळा केल्या जाव्यात अशी मागणी मी अनेक वेळा केलेली आहे. या मागणीचा शासनाने विचार करावा. तसेच वेश्या व्यवसाय करणा-या महिलांच्यादृष्टीने एक आयोग नेमून महाराष्ट्रामध्ये जो ट्रॅफिकिंग ॲक्ट आहे त्यामध्ये सुधारणा करुन हा व्यवसाय करण्यास प्रवृत्त झालेल्या महिलांना त्या व्यवसायापासून दूर करुन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे...)

त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने एक आयोग नेमावा. या संदर्भात या आधी शिफारशी केलेल्या असतील तर त्याचाही विचार करावा आणि राज्याने एक क्रांतीकारी पाऊल उचलून भगिनींना शरीर हे क्रयवस्तू होण्यापासून रोखावे अशा प्रकारची नम्र विनंती करते. तसेच सेंद्रीय शेती हा विषय कृषी विद्यापीठांना सक्तीचा करावा. शाळेमध्ये लैंगिक शिक्षण सक्तीचे करावे अशी मी सूचना करते. वृत्तपत्र मिडिया हा आपल्या संस्कृतिचा चेहरा आहे. पत्रकार परिषद घ्यावयाची असेल तर ती कोणकोणत्या ठिकाणी घ्यावी लागते याची या सभासगृहातील सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे. नागपूर, मुंबई सारख्या ठिकाणी पत्रकार परिषदा घेण्यास अडचणी येत नाहीत. परंतु ग्रामीण भागामध्ये पत्रकार परिषदा घेण्यासाठी अडचणी येतात. शासनाने ज्याप्रमाणे आंबेडकर भवन बांधण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पत्रकार भवन बांधण्याचा निर्णय शासनाने घ्यावा आणि त्यासाठी जागा व निधी देखील शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी मी शासनाला विनंती करते. पत्रकार हे ग्रामीण भागातील विविध प्रश्न हे फार चांगल्या पध्दतीने मांडत असतात. सगळेच प्रश्न आम्हाला माहीत नसतात. या ठिकाणी आम्ही विचारत असलेले अनेक प्रश्न वर्तमानपत्राच्या माध्यमातून आलेले असतात. म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पत्रकार भवन बांधण्याचा निर्णय शासनाने घ्यावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, मराठी सिनेमाला दिले जाणारे अनुदान अगदी नगण्य आहे. इंग्रजी सिनेमांचे उत्पन्न आपण पहाता काय ? वेलकम या इंग्रजी चित्रपटाचे उत्पन्न 1 अब्ज 14 कोटी आहे. ओम् शांती ओम्चे उत्पन्न 1अब्ज 8 कोटी ,तारे जमीन पर - 79 कोटी. मराठी सिनेमांचे उत्पन्न किती आहे ? मराठी विषयी आपले प्रेम आहे, मराठी आपली मातृभाषा आहे. मग मराठी कलेचे आपण संरक्षण करणार नाही काय ? हे कलेचे संरक्षण करण्यासाठी आपण 3 कोटी, 4 कोटी, 5 कोटी का देत नाही ? आमचा मराठी निर्माता एक मराठी सिनेमा सोन्याचे दागिने मोडून, घर-दार विकून तयार करतो, आणि दुस-याचे अनुदान मिळावे म्हणून दुसरा सिनेमा करतो. पण समाजाचे प्रश्न मांडून शाहू, फुले आंबेडकरांचे विचार मी जगेन अशा भावनेने येणारा कोणताही निर्माता या क्षेत्रात पाय ठेवू शकत नाही.म्हणून मराठी सिनेमासाठी असलेले अनुदान 5 कोटी रु.

..3..


MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:10
असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे....

करावे अशी मी विनंती करते.

जो माणूस वीज पडून मरतो त्याच्या वारसांना 50 हजार रु. मदत केली जाते. वाघाने खाल्ले तर त्याच्या वारसांना 10 लाख रु. मदत करण्यात येते. मग आता माणसाने कशा प्रकारे मरायचे हे ही ठरवायचे काय ? तेव्हा वीज पडून माणूस मृत्यूमुखी पडला तर त्याबाबतीत किमान 2 लाख रु. मदत द्यावी, बैल मेला तर 30 हजार रु. मदत द्यावी.

बीड जिल्ह्यामध्ये सिताफळ संशोधन केंद्र आहे ते चालू करावे आणि मराठवाड्यामध्ये फळप्रक्रिया केंद्र उभारुन मराठवाड्याचा विकास घडवून आणावा अशी मी शासनाला विनंती करते. हा अर्थसंकल्प लोकाभिमुख आहे म्हणून त्याचे अभिनंदन करते आणि ज्या मागण्या मी केलेल्या आहेत त्यांची पूर्ती होईल अशी अपेक्षा व्यक्त करते. मी जास्त वेळ घेतला त्याबद्दल खेद व्यक्त करते, सभागृहाची माफी मागते, आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री.अरविंद सावंत ) : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडून 14 सदस्यांची नावे माझ्याकडे प्राप्त झाली आहेत. त्याचप्रमाणे विरोधी पक्षाच्या 9 सदस्यांची नावे माझ्याकडे प्राप्त झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी आपापले भाषण ठरवून दिलेल्या वेळेत करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : काल आणि आज अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा ठेवलेली आहे. या सभागृहातील काही ज्येष्ठ सदस्य आणि आम्ही माननीय सभापती यांचे बरोबर चर्चा केली, त्या चर्चेत असा सुर निघाला की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दोन दिवस ठेवली आहे ती तीन दिवस ठेवावी. त्यास माननीय सभापतींनी सहमती दर्शविली आहे. या सभागृहात नवीन सदस्य आलेले आहेत त्यांना देखील या चर्चेत भाग घेण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून ही चर्चा उद्या देखील ठेवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : अर्थसंकल्पावरील चर्चा उद्या देखील ठेवण्यात आली आहे याची मला माहिती आहे. कारण अर्थसंकल्पावरील चर्चेत मी उद्या भाग घेणार आहे. सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 वाजता स्थगित होणार आहे. प्रत्येक सदस्याने चाळीस, चाळीस मिनिटे बोलण्याचे ठरविले तर वेळ पुरणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेऊन आपले विचार व्यक्त करावेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यानी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा ) : सभापती महोदय, काळ, काम आणि वेग हा विषय या सदनात गंभीर होत चालला आहे. राज्य शासनाने वर्षाचा जो डोलारा मांडला आहे त्यावर सन्माननीय सदस्यांना आपापली मते व्यक्त करावयाची आहेत. माननीय वित्तमंत्र्यांनी सभागृहात मांडलेला अर्थसंकल्प आणि त्या अनुषंगाने येणा-या पुरवणी मागण्या याची तडजोड न करता त्याची तोडफोड कशी करता येईल हा खरा महत्वाचा विषय आहे. सदस्यांनी केलेली भाषणे ऐकून घ्यावयाची आणि बहि-या कानाने सभागृहातून निघून जावयाचे अशी शासनाला सवय लागलेली आहे. सभागृहातील काम उरकले, दिवस संपला, आपले काम भागले, सरकार चालेले आहे, अधिवेशन संपले, असे सध्या काम चालले आहे. विधिमंडळाचे अधिवेशन घटनात्मक तरतुदीने भरविले जाते. त्यामुळे त्यास वैधानिक अधिकार प्राप्त झाले आहेत. सरकारवर विरोधी पक्षाचा अकुंश रहावा म्हणून विरोधी पक्षाच्या सदस्यांना वैधानिक अधिकार दिलेले आहेत. परंतु विरोधी पक्षाचा अंकुश कोणी झिडकारावयाचे ठरविले असेल तर ते योग्य नाही. विरोधी पक्षाचा अंकुश झिडकारण्याची परिस्थिती आता आलेली आहे. ज्यावेळी परिस्थिती निर्माण होईल त्यावेळी घटनात्मक तरतुदीनुसार दिलेले वैधानिक अधिकाराचा आम्ही वापर करु. माननीय वित्तमंत्र्यांनी सभागृहात अर्थसंकल्प सादर केलेला आहे. तो अर्थसंकल्प सभागृहातील सर्व सदस्यांना मिळालेला आहे. त्यातील आकडेवारी सर्व सन्माननीय सदस्यांनी पाहिलेली आहे. अर्थसंकल्पातील आकडेवारी वाचून मी सभागृहाचा वेळ वाया घालविणार नाही. आपल्याकडे जमेच्या बाजुला 79,910.86 कोटी रुपये आहेत आणि खर्चाच्या बाजुला 78,946.16 कोटी रुपये दाखविलेले आहेत आणि 964.70 कोटी रुपये सरप्लस दाखविले आहे. ज्या वेळेला राज्याचा अर्थसंकल्प सरप्लसमध्ये मांडला जातो तो अर्थसंकल्प निरोगी नसतो. असा अर्थसंकल्प रोगी असतो. अर्थसंकल्पात पुढील वर्षाच्या तरतुदी दाखविल्या आहेत. या तरतुदी कशासाठी केल्या ? या तरतूदी का केल्या ? या गोष्टींचा वेगळाच अभ्यास आहे त्या गोष्टीच्या खोलात मी जाणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांचे अभिनंदन करावे काय असा मला प्रश्न पडला आहे. त्यांनी आपल्या भाषणात मराठवाडा विभागातील विकासाच्या बाबतीत अनेक मुद्दे उपस्थित केले. मराठवाडयातील काही गोष्टींचा उल्लेख करावयाचा राहिला आहे असे काल मी सांगण्यासाठी त्यांच्याकडे गेलो होतो. परंतु त्यांचे माझ्याकडे लक्षच नव्हते. या सभागृहात राज्याच्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अर्थसंकल्पावर चर्चा करीत आहोत. केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पावर आपण चर्चा करीत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी शेतक-यांवरील व्याज मुक्तीच्या, अभिनंदन मेळाव्याच्या पत्रावळया आपण माननीय सभापतींना सादर केल्या.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, केंद्राचा अर्थसंकल्प होता. शेतक-यांवरील व्याज मुक्तीचा निर्णय केंद्र सरकारचा आहे. परंतु त्या निर्णयाचा फायदा महाराष्ट्रातील शेतक-यांना मिळाला म्हणून मी त्या निर्णयाचा माझ्या भाषणात उल्लेख केला आहे एवढे मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा या निर्णयाच्या संदर्भात जो गैरसमज झालेला आहे तो मी दूर करतो. महाराष्ट्रातील शेतक-यांनी आक्रंदन केले. महाराष्ट्रातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या. विदर्भातील सहा जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधीचा आक्रोश संपूर्ण जगात झाला. या आत्महत्येच्या संदर्भात अभ्यास मंडळे नेमली गेली. महाराष्ट्रात वेगवेगळया जिल्हयात आत्महत्येसंदर्भात सर्वेक्षण झाले. त्यात विदर्भातील सहा जिल्हयांचे देखील सर्वेक्षण झाले आणि पॅकेजसुध्दा या विदर्भातील सहा जिल्हयासाठी आले.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, मराठवाडयातील हदगांव तालुक्यात एक शेतकरी आपल्या शेतात उभा राहून समोरच्या शेतकऱ्याला म्हणाला, लई भाग्यवान आहेस तू. तुला पॅकेज मिळाले मला नाही मिळाले. शेतकऱ्यांमध्ये एवढा दुःश्वास निर्माण झालेला आहे. इतर राज्यातील शेतकऱ्यांनी कर्जमाफीची मागणी केली होती काय ? संपूर्ण हिंदुस्थानला पॅकेज मिळाले आहे. जे काही 60 हजार कोटी रुपयांचे पॅकेज मिळाले ते संपूर्ण महाराष्ट्रालाच मिळाले अशा प्रकारचे बोर्ड जागोजागी लागले आहेत. कोण कोणाचे अभिनंदन करीत आहे ? आपण सगळे शेतकऱ्यांच्या दुःखाकरिता रडू या. उद्याच्या नवीन येणाऱ्या पिढीकरिता उभे राहू या. मी आणि तुम्ही असे करुन या विषयाकरिता उभे रहायचे नाही. अर्थमंत्र्यांनी सादर केलेले बजेट हे निरोगी बजेट नाही. खर्च करा. पण काम करतो म्हणून कर्जबाजारी आहोत असे सांगण्याची हिंम्मत असली पाहिजे. पंचवार्षिक योजनेमध्ये 80 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एक रुपया कर्ज काढले नाही. तुम्हांला कोणी कर्ज दिलेच नाही. आकडेवारीच्या जंजाळात मी जात नाही. कालचा माझ्या भाषणाचा रोख वेगळा होता. राज्यपालांच्या अभिभाषणाला उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तेव्हा मी सभागृहात हजर नव्हतो. केंद्रीय कृषीमंत्री श्री. पवार साहेबांवर टीका केली की आबा म्हणतात तुम्ही आमच्या नेत्याचे नांव घेता म्हणून आम्ही तुमच्या नेत्याचे नांव घेतो. श्री. उध्दव ठाकरे हे शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राच्या जनतेपुढे जे प्रश्न अपिलात येतात त्या पध्दतीने ते आंदोलने उभी करीत असतात. श्री. शरद पवारांना तुम्ही जाणता राजा म्हणता आणि समजता. ते देशाचे कृषीमंत्री आहेत. कृषीमंत्र्यांच्या ढेपाळलेल्या पध्दतीमुळे महाराष्ट्राचे नुकसान होणार असेल तर कृषीमंत्री म्हणून आघात करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तुमचे नेते म्हणून कसे काय घेता ?

सभापती महोदय, श्री. नितीन गडकरी साहेब ऊसाच्या प्रश्नावर बोलले. वकिली करावयाची असेल तर शेतकऱ्यांची वकिली करा. मंत्री असले तरी चुकला असला तर क्षमा असता कामा नये. संपूर्ण साखर उद्योगाचे या राज्यामध्ये कंबरडे मोडले आहे हे सत्य आहे. ते फक्त म्हणतात पण कारखान्यांना भावच देत नाहीत. तुमच्यापुढे पंचनामा देतो. 1 मार्च 2001 रोजी केंद्र शासनाने एकूण साखर उत्पादनापैकी खुल्या बाजारातून लेव्ही साखरेचे प्रमाण 9:1 असे ठरविले होते. त्यावेळी श्री. पवार साहेब हे कृषीमंत्री नव्हते. खुली करण्यात आलेली नियंत्रित साखर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना वितरीत करण्यासाठी 2006-07 मध्ये कृषी

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ 15:20

श्री. दिवाकर रावते .....

खात्याने 10.82 लाख क्विंटल साखर मंजूर केली. त्यापैकी फक्त 5.42 लाख क्विंटल साखर उचलली गेली. म्हणजे 50 टक्के साखर उचलली गेली नाही. गोरगरिबांच्या घशात साखर गेली नाही. त्यांच्या घरापर्यंत साखर पोहोचली नाही. कृषीमंत्र्यांचा निर्धार आहे तो व्यक्त होत नाही. गरिबांना वाटण्याकरिता 10.82 लाख क्विंटल साखर कमी पडली म्हणून नव्याने आदेश काढून कृषी खात्याने साखर मिळविली. या राज्याची लोकसंख्या 10कोटीच्या घरात असताना 3 लाख 82 हजार दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची नोंद होते हे कसले लक्षण आहे ? तेवढया लोकांना साखर मिळत नाही. त्यांना साखर मिळाली पाहिजे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अशा प्रकारे सन 2007-08 मध्ये नोव्हेंबर, 2007 पर्यंत 11.61 लाख क्विंटर साखरेचे वाढीव नियतन मंजूर करण्यात आले. साखरेची उचल किती झाली? फक्त 0.58 टक्के. म्हणजे 1 टक्का सुध्दा नाही. हा वितरण व्यवस्थेचा खेळखंडोबा चाललेला आहे. त्यामुळे अनेक कारखान्यांमध्ये साखर पडून आहे. याठिकाणी अनेक साखर कारखानदार आहेत, त्यांना याची कल्पना आहे. गोडावूनमध्ये जागा नाही म्हणून उघड्यावर साखर ठेवली होती. अवकाळी पाऊस झाला. ताडपत्री टाकण्याची सुध्दा संधी न मिळाल्यामुळे कितीतरी क्विंटर साखर पावसाच्या पाण्यात भिजून नष्ट झाली. आज आम्हाला मंत्रीमहोदयांकडून उत्तराच्या भाषणात याचा खुलासा अपेक्षित आहे. साखर निर्यातीच्या बाबतीत जो घोटाळा सिध्द झाला, ज्या प्रकरणाची सीबीआयकडे चौकशी देणे भाग पडले, ज्या प्रकरणी केंद्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी हस्तक्षेप केला आणि ज्या 18 साखर कारखान्यांना दोषी ठरविण्यात आले, त्या 18 साखर कारखान्यांनी निर्यातीची साखर खुल्या बाजारपेठेत विकल्याचे सरकारने कबूल केले, माननीय राज्यपालांनी हस्तक्षेप केला, तेव्हा माननीय राज्यपालांना लेखी पत्र देऊन कोणते कारखाने दोषी आहेत हे कळविले त्या संदर्भात सन्माननीय सहकारमंत्र्यांनी माहिती घेऊन सहकार कायद्यान्वये काय कारवाई केली हे सभागृहाला सांगावे. सहकार कायद्याच्या कलम 83, कलम 12 व कलम 88 अन्वये कारखान्यांची चौकशी सुरु आहे असे सभागृहात उत्तर दिले होते, त्या चौकशीचे काय झाले? कोट्यवधी रुपये हडप करण्यात आले. केंद्र सरकारने दखल घेतली. सीबीआय चौकशी झाली, संबंधित संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल झाले. त्या सर्व संचालकांचे काय झाले? महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या अब्रूची लक्तरे लोकसभेत टांगली गेली. महाराष्ट्राच्या खासदारांनी 1 ऑगस्ट, 2003 रोजी लोकसभेत प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला उत्तर देत असताना केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी 21 सहकारी साखर कारखान्यांची निर्यातीची साखर खुल्या बाजारपेठेत विक्री झाल्याचे प्रकार आढळून आले आहेत असे सांगितले. कितने बढ़े चोर हैं. निर्यातीची साखर स्थानिक बाजारपेठेत विकण्यात आली. त्याबाबत चौकशी झाली. या महाराष्ट्रातून निवडून जाणाऱ्या खासदारांनी साखर चोरीची लक्तरे लोकसभेत टांगली. केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.यादव यांनी 21 कारखाने दोषी असल्याचे स्पष्ट केले. भगवती, दामाजी, शंकरराव मोहिते पाटील, सोलापूर; गडहिंग्लज, कोल्हापूर; कृष्णा, सह्याद्री, दौलत,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:25

श्री.दिवाकर रावते.....

सातारा; सोमेश्वर, निफाड,नाशिक; वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगली; एकनाथ, तेरणा, उस्मानाबाद; पूर्णा, परभणी; हुतात्मा, लातूर; नामदार अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांचा राजाराम बापू पाटील सहकारी साखर कारखाना, डोंगरगाव सहकारी साखर कारखाना अशी कारखान्यांची यादी लोकसभेत वाचली गेली. किती मोठी शाबासकी मिळाली? साखर कारखान्यांचा एकमेव जाणता राजा कोण आहे? अलिबाबा आणि चाळीस चोरांची मी थोडक्यात माहिती सांगतो. चाळीस चोर म्हणजे हे साखर कारखाने आहेत. जाणता राजा कोण आहे हे आपण ओळखावे. साखर कारखान्यांना 1.4.2005 रोजी पॅकेज दिले गेले. आदरणीय कृषिमंत्री यांनी पॅकेज जाहीर केले. 15 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले. कसले पॅकेज दिले? To reshedule the loan. असलेल्या व्याजाचे आणि कर्जाचे 17 वर्षांसाठी पुनर्नियोजन करण्यात आले. पहिली दोन वर्षे काही द्यायचे नाही आणि पुढील 15 वर्षात हप्त्याहप्त्याने पैसे द्यायचे. मला आठवते, त्यावेळी समोरच्या बाकावरुन उल्लेख केला गेला. केंद्रात श्री.वाजपेयी पंतप्रधान असताना तुम्ही काय केले? 31.3.2006 रोजी केंद्र सरकारने पॅकेज जाहीर केले आणि त्या पॅकेजला नाबार्डने मान्यता दिली.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

परंतु त्यामध्ये एक अट घातली आहे की, हे 15 हजार कोटीचे जे पॅकेज आहे त्याला राज्य शासनाने हमी द्यावयाची आहे. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांच्या मी असेही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मी जे सांगत आहे ते आपण खोडले तर बरे होईल. आज मी 26 मार्च रोजी या ठिकाणी जे बोलत आहे ते आपण खोडावे. दि. 1.4.2005 ला जाणता राजाचा सत्कार सर्व साखर सम्राटांनी केला, त्यानंतर पॅकेज आले. अशा प्रकारे कारखाने जगले परंतु आज 2008 पर्यंत देखील शासनाने त्याला लागणारी हमी दिलेली नाही. नाबार्डने टाकलेली अट शासनाने पाळली नाही आणि तशी पाळली असेल तर "होय" सांगावे. याचा अर्थ माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांना अडचणीत आणण्याचे हे सर्व डावपेच आहेत काय ? माननीय कृषी मंत्र्यांना तोंडघशी पाडण्याचे प्रयत्न आहेत काय ? पुढे तर आणखी गंमत आहे. ज्या कारखान्यांना 15 हजार कोटीचे पॅकेज आहे. त्यात अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकांचा सुध्दा उल्लेख असून त्यांचे 350 कोटी यात आहेत. अर्बन बँका ह्या रिझर्व बँकेच्या अधिपत्याखाली येतात. या सर्व बँका सुध्दा राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्याच आहेत. त्यातील एक व्यक्ती मात्र हुशार निघाली ती व्यक्ती म्हणजे आपले अर्थमंत्री श्री. जयंत पाटील. त्यांनी स्व. राजाराम बापू पाटील अर्बन को-ऑप. बँकेची सर्व वसुली करुन बँकेला नील केले. त्यानंतर माननीय श्री. सुधाकर परिचारक, महादेवराव पाटील, सिताराम घनदाट अशी अनेक मोठमोठी नावे आहेत, त्यांच्या बँका मात्र यामध्ये सापडल्या आहेत. कारण या पॅकेजला रिझर्व बँकेने मान्यता दिली नाही त्यामुळे या अर्बन बँकांचे पैसे मिळणार नाहीत. पॅकेज आले पण पैसे मात्र मिळाले नाहीत, अशी परिस्थिती झाली. त्याचे कोणाला काहीच सोयरसुतक नाही, कारखान्यांमुळे बँका बुडण्याच्या मार्गावर निघाल्या आहेत पण अर्थसंकल्पात मात्र त्याचा खेद ना खंत. त्याचा उल्लेख सुध्दा अर्थसंकल्पात केलेला नाही. 15 हजार कोटी म्हणजे गंमत आहे काय ? ते कसे आले, कसे उडाले? शेतकरी जगला पाहिजे, कारखाना टिकला पाहिजे. कर्ज उपलब्ध झाले तर बँका एनपीए मध्ये गेल्या. हे पॅकेज मिळाल्यानंतर देखील दोन वर्षे कारखान्यांनी हप्ते द्यावयाचे नाहीत अशीही अट त्या पॅकेजमध्ये होती. मी नाव घेत नाही पण हे लोक इतके हुशार आहेत की, या महाराष्ट्राच्या एका जबाबदार व

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

उच्च नेतृत्वाने असे उद्‌गार काढले की, शेतकऱ्यांना आता कर्जमाफी दिली तर त्यांना ती सवय लागेल. पुन्हा शेतकऱ्याचे नशीब फुटले आणि बी-बियाणे खराब निघाले, शेती उद्‌ध्वस्त झाली तर पुन्हा कर्जमाफी मागणारच. पण या कारखानदारांचा मात्र आपल्या केंद्रीय नेतृत्वावर विश्वास आहे, जाणत्या राजावर विश्वास आहे. आणि कर्ज बुडवायचा त्यांना जन्मसिध्द अधिकार दिलेला आहे, अशा प्रकारे दोन वर्षानंतरचा हप्ता भरण्यासाठी आमच्याकडे पैसे नाहीत म्हणजे पुन्हा पॅकेज. पहिले पॅकेज इफेक्टीव्ह झालेले नाही, त्याला हमी दिली नाही म्हणून ते इफेक्टीव्ह झाले नाही. त्यानंतर रिझर्व बँकेने मान्यता दिली नाही म्हणून ते झालेले नाही. तिसरे म्हणजे पुनर्नियोजनाचे हप्ते चालू करावयाचे त्याला भरायला पैसे नाहीत. पुन्हा चोर तो चोर, वरुन शिरीजोर आणि आम्हाला नवीन पॅकेज मिळाले पाहिजे. आमच्या अलिबाबाने आपल्या चाळीस चोरांकरिता गुहा उघडली, कसले कौतुक करता ? त्यांचा तरी जरा विचार करा. त्यांनी नवीन गुहा उघडून नवीन पॅकेज जाहीर केले ते पॅकेज नवीन नाही, तर जुनेच आहे आणि त्यांचे तुम्ही कौतुक करता ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

पुन्हा हप्ता देण्याची पाळी आल्यावर त्याला परत रिवाईज केले जाते थोडक्यात म्हणजे बुडणा-याला जसा काडीचा आधार असतो तसे शेतक-याला लुबाडणा-यांना जाणत्या राजाचा आधार असतो कारण तेच यांना सत्ता देणार असतात एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे.

सभापती महोदय, अर्थ खात्याचे अधिकार फार हुशार आहेत. ते सिचंनासाठी निधी देत नाहीत, मराठवाडा आणि विदर्भाच्या अनुशेषासाठी निधी कसा देता येणार नाही यामध्येच गुतलेले असतात. परंतु या अधिका-यानी लॉटरी कशी योग्य आहे हे कायद्यात व्यवस्थित बसवून दिलेले आहे. ग्रामीण भागातील दारुचे दुकाने जसे बंद करण्याची आवश्यकता आहे तशीच आवश्यकता शहरी भागातील ऑन लाईन लॉटरीच्या संदर्भातील आहे परंतु वित्त विभागाच्या अधिका-यांनी लॉटरी कशी योग्य आहे, लॉटरी कशी फायद्याची आहे हे कायद्यात बसवून पटवून दिलेले आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या नवीन कर्जाला 3 टक्के व्याज केंद्राने द्यावयाचे यासंदर्भात राज्याने हमी दिली परंतु केंद्रशासनाकडून काही पैसे आले नाहीत. प्रत्यक्षात आमच्या शेतक-याला याचा काही फायदा होणार नाही असे दिसते. अशी परिस्थिती असतांना देखील ते आपली पाठ आपल्याच हाताने थोपटून घेत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब म्हणत असतात की, लबाडाच्या घरचे आमंत्रण जेवल्याशिवाय काहीच म्हणावयाचे नाही तशी परिस्थिती या शासनाची आहे.

सभापती महोदय, हा सगळा प्रकार होत असतांना शेतकरी आत्महत्या करीतच आहे. शेतक-याच्या आत्महत्या अजून देखील थांबलेल्या नाहीत. बीड मधील एका शेतक-याने कशा पध्दतीने आत्महत्या केली ते मी थोडक्यात सांगतो. हा शेतकरी सर्व बाजूने त्रासलेला होता त्यामुळे या शेतक-याने आपल्या शेतातील ऊस पेटवून दिला व ऊस पेटवून दिल्यानंतर या शेतक-याने पेटत्या ऊसात ऊडी मारुन आत्महत्या केली. या घटनेने अंगावर काटा आलेला आहे. असे असतांनाही या शासनाला त्याचे काही सुध्दा वाटत नाही. आम्ही कधीही शेतक-याचे राजकारण केले नाही, शेतक-यांच्या आत्महत्येचे आम्ही कधीही राजकारण केलेले नाही. आम्ही फक्त त्या शेतक-याच्या ठिकाणी असतो तर काय वाटले असते याचाच विचार करीत असतो. असो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, कॉँग्रेसच्या प्रदेश अध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांनी शेतक-यांच्या व्यथा काय आहेत हे जाणून घेण्यासाठी त्रीसदस्य समिती गठीत केलेली असून या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर काय निर्णय घ्याववयाचा ते ठरवू असे सांगितलेले आहे.

सभापती महोदय, साखरेच्या संदर्भात केंद्रशासनाने एक अहवाल काढलेला आहे. केंद्राचे साखरेच्या संदर्भात काय धोरण आहे, साखरेचा उद्योग का उध्वस्त झाला आहे याची माहिती या अहवालात दिलेली आहे. आमच्या जाणत्या राजाचे शेतक-यांच्या संदर्भात सकस धोरण असतांना देखील शेतकरी मरत आहे. केंद्रशासनाच्या साखरेच्या अहवालात म्हटले आहे की, साखरेचा देशांतर्गत बाजारभाव प्रती क्विंटल 1800 रुपयावरुन देशांतर्गत 1100 झाला आणि देशांतील साखरेचा भाव प्रती क्विंटल 1700 वरुन 950 वर आल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 15.40

श्री.दिवाकर रावते..

केन्द्र सरकारने लेव्ही साखरेची व खुल्या बाजारातील जी किंमत ठरवली होती त्यात मोठी तफावत निर्माण झाली होती. खुल्या बाजारातील साखरेच्या किंमतीपेक्षा 15 टक्क्यांनी लेव्ही साखरेची किंमत जास्त ठेवली होती. गरीब माणूस जेव्हा साखर विकत घेण्यासाठी जाईल तेव्हा तो लेव्हीची साखर विकत घेईल की खुल्या बाजारातील घेईल.? तेव्हा साखरेच्या बाबतीत या शासनाचे धोरण काय आहे ? जाणत्या राजासहित केन्द्र सरकारचे आणि राज्य सरकारचे साखरेच्या संदर्भातील नेमके धोरण काय आहे ? केन्द्र सरकारच्या जाणत्या राजाचे कोडकौतुक करीत असतांना मला या प्रश्नाचे उत्तर कोणी तरी दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. लेव्हीच्या साखरेचे भाव जास्त आहेत आणि खुल्या बाजारातील साखरेचे भाव कमी आहेत तेव्हा लोक सुध्दा खुल्या बाजारातील साखर घेतील ते लेव्हीची साखर घेणार नाहीत. गरीबांना महाग साखर विकत घेण्याचे धोरण केन्द्राच्या जाणत्या राजाने निर्माण केले असून त्याच्या परिणामामुळे साखर उद्योग संकटात यावयास लागला आहे.सभापती महोदय, काल या ठिकाणी ऊसाच्या भावासंबंधी वादळ निर्माण झाले होते त्याबाबतीत मी आपल्याला एक मुद्दा सांगू इच्छितो. कॉंग्रेस पक्षाने नेमेलेल्या समितीच्या अहवात असे म्हटलेले आहे की, " किमान वैधानिक हमी भाव ठरविण्यात आला असून शर्तीनुसार शेतकऱ्यांना किमान 1200 रुपये प्रती क्विंटल एवढा भाव मिळणे अपेक्षित होते." याबाबतीत आम्ही काही बोललो तर ती वेगळी गोष्ट आहे. या अहवालात पुढे असे म्हटलेले आहे की, "तथापि प्रत्यक्षात मात्र शेतक-यांना त्यांच्या ऊसासाठी प्रती क्विंटल 900 इतकाच दर मिळाला होता." हा दर सुरुवातीला 850 रुपये प्रती क्विंटल एवढा ठरविण्यात आला होता परंतु हा दर वाढवून मिळावा आणि 1200 रुपये प्रती क्विंटल एवढा भाव मिळावा म्हणून शेतकरी सघटनेने आंदोलन केले होते. त्यावेळी अनेक ठिकाणी मारामा-या झाल्या होत्या , ट्रक्स जाळण्यात आले होते.एक दीड महिना आंदोलन केल्यानंतर श्री.गोपीनाथ मुंडे यांनी मध्यस्थी केली होती व त्यानंतर 50 रुपयांनी हा दर वाढवून देण्यात आला होता.

श्री.सय्यद पाशा पटेल : 2200 रुपये भाव पाहिजे होता.

श्री.दिवाकर रावते : तुम्ही काहीही भाव मिळण्याची मागणी कराल.. या शेतक-यांना नाईलाजाने 500 ते 600 रुपये प्रती क्विंटल या दराने कारखान्यांना ऊस द्यावा लागला होता. असा उल्लेख या अहवालामध्ये करण्यात आलेला आहे. काही साखर कारखान्यांनी चांगला भाव



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

दिला होता हे देखील आम्हाला माहीत आहे. खास करुन पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांना चांगला भाव मिळाला होता परंतु हा भाव कोणाला मिळाला आहे ? काही कारखान्याचे सेटींग फार सुंदर आहे.कोल्हापूर जिल्हयातील काही कारखान्यांनी ऊसाला 1800 रुपये भाव दिला होता. परंतु हा भाव शेतकऱ्याना मिळाला नाही . त्या कारखान्याच्या संचालकांना हा भाव मिळाला होता. कर्नाटक राज्यातून त्यांनी ऊस आणला आणि आपल्या नावावर कारखान्यांना विकला आणि त्यानंतर त्याचा चेक कारखान्याने दिला होता. कर्नाटक राज्यामध्ये ऊसाला 500 ते 600 रुये े प्रती क्विंटल एवढाच दर दिला जातो. आपण ऑडिटचे हिशोब काढून पहा आणि मी आपल्याला जे काही सांगत आहे ते जर असत्य निघाले तर मला आपण त्याबाबतीत सांगावे. ऊसाला चांगला भाव मिळून त्याचे पैसे संचालकाच्या घरात जाण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आला आहे. परराज्यातील ऊसाला मान्यता मिळवून पर राज्यातील ऊस आणून तो येथील कारखान्यांना विकून जास्त भाव मिळालेले आहेत. सभापती महोदय, गाळपाला न गेलेल्या ऊसाला 25000 रुपये भाव देण्यात यावा असा जेव्हा निर्णय घेण्यात आला होता तेव्हा 40 हजार आणि 50 हजार रुपये भाव मिळाला पाहिजे अशा प्रकारे विरोधी पक्षाने ओरड केली होती त्यासबंधीची नोंद या अहवालामध्ये घेण्यात आली होती. या अहवालात असे म्हटलेले आहे की," संकटग्रस्त शेतक-यांना 2500 रुपये प्रती क्विंटल या प्रमाणे मदत जाहीर केली होती. विरोधी पक्षाने देखील सभागृहात त्याचे स्वागत केले होते परंतु तेच विरोधी पक्ष आता सत्ताधारी पक्षाला सत्तेपासून बाजूला करण्यासाठी याबाबतीत राजकीय स्वरुपाचा उपयोग करुन घेऊन प्रती क्विंटल 40 हजार ते 50 हजार रुपये मदत द्यावी अशा प्रकारची मागणी करीत आहे." सभापती महोदय, आम्ही अशा प्रकारची मागणी केली होती परंतु या अहवालात असे म्हटलेले आहे की," प्रती एकर उत्पादन खर्च 20 हजार रुपये आहे आणि हा ऊस जाळण्याकरता 10 हजार रुपये खर्च होणार आहेत त्यामुळे 30 हजार रुपये प्रती एकर एवढा खर्च या शेतकऱ्यांचा झालेला आहे.शेतकऱ्यांची मागणी अशी आहे की, आम्हाला 75 हजार रुपये भाव देण्यात यावा म्हणून आम्ही अशी शिफारस करतो की गाळप न झालेल्या ऊसासाठी प्रती हेक्टरी 60 हजार रुपये मदत राज्य शासनाकडून `दण्यात यावी." अशा प्रकारची मागणी

3..

कॉग्रेस पक्ष करीत आहे. सन्माननीय अर्थ राज्य मंत्री सुध्दा कॉग्रेस पक्षातील आहेत तेव्हा आपण आता निष्ठेला जागावे . कॉग्रेसने या अहवालात असे म्हटलेले आहे की, " संकटात सापडलेल्या ऊस उत्पादक शेतकरी तसेच कारखान्याच्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाशी चर्चा करुन समिती या निष्कर्षाप्रत आलेली आहे की, गाळपासाठी न गेलेल्या ऊसासाठी शेतक-याला 60 हजार रुपये मिळाले पाहिजे." या अहवालात आणखी काय सांगितलेले आहे हे मी आपल्याला सांगत नाही परंतु जे काही सांगितलेले आहे ते एकमेकाला मारक आहे की नाही हे आपण ठरवा.

श्री.गुरुनाथ कूलकर्णी : सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पाबाबत बोलावे.

श्री.दिवाकर रावते : साखर उद्योग अर्थसंकल्पात येत नाही काय ?. अर्थसंकल्पामध्ये साखर उद्योगाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.साखर उद्योगासाठी 262 कोटी रुपये देतो असा

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता )**

**नंतर श्री.सुंबरे**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

तुमच्या पुस्तकामध्ये उल्लेख आहे. ऊसासाठी एवढा भाव देतो म्हणून त्यात सांगितले आहे. तुम्हाला याचे वाईट वाटले का ?

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब 'जाणता राजा, जाणता राजा' म्हणून सतत उल्लेख करीत आहेत. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही कितीही नाही म्हटले तरी महाराष्ट्रामध्ये त्यांना 'जाणता राजा' म्हणूनच मानले जाते. तुम्ही त्यांचा उल्लेख कोणत्याही अर्थाने केला तरी जनता त्यांना 'जाणता राजा' मानते आहे हे वेळोवेळी दाखवून दिले आहे आणि त्यांच्या बाजूनेच जनता नेहमी उभी राहिली आहे. ... सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनाही मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, तुम्ही देखील त्यांच्याच आश्रयाला आला होता हेही आपण लक्षात घ्यावे.

श्री. पाशा पटेल : त्यांचे शेतीचे धोरण चांगले आहे म्हणून तर लोक या राज्यात आत्महत्या करून राहिले आहेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सर्वांनी शांत बसावे, आपणालाही या चर्चेत भाग घेऊन भाषण करण्याची संधी मिळणारच आहे, तेव्हा आपण प्रतिवाद करू शकता. आपणा प्रत्येकाला ती संधी मिळणार आहे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांच्या भाषणात ते वारंवार 'जाणता राजा' म्हणून उल्लेख करीत आहेत. ही राज्याच्या अर्थसंकल्पावरील चर्चा आहे. असे असताना राज्यातील साखर उद्योगाच्या संदर्भात 'जाणता राजा' म्हणून विरोधी पक्षातील सगळेच सदस्यांकडून उल्लेख केला जातो आहे. तेव्हा त्यांना त्यातून काय दाखवायचे आहे ? आज राज्यातील साखर उद्योगाला उर्जितावस्थेत आणण्यासाठी त्यांनीच प्रयत्न केले आहेत, तर त्यात त्यांनी काय पाप केले आहे ? साडेतेविसशे कोटी रूपये त्यांनी मिळवून दिले आहेत ...

**तालिका सभापती** : मी पुन्हा सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण शांत बसावे, खाली बसावे. ज्यावेळेस आपल्याला या चर्चेत भाषण करण्याची संधी मिळेल तेव्हा समोरच्या मंडळींनी मांडलेले मुद्दे आपण खोडून काढू शकता आहात. त्यासाठी आपणा सर्वांना पूर्णपणे संधी मिळणार आहे.

..... एनएन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, येथे प्रत्येकाच्याच भाषणात तसा उल्लेख होत असेल तर मग आम्ही तसा उल्लेख केला तर त्यात वावगे काय आहे ? ...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. आमच्या जाणता राजाला महाराष्ट्राच्या, देशाच्या शेती विषयीची ज्ञान आहे, माहिती आहे त्यामुळेच ते शेती बद्दल बोलतात, राज्यातील साखर उद्योगाला मदत करतात. मात्र आज येथे जे नेतृत्त्व या सभागृहात त्यांच्यावर टीका करते आहे ते खरे तर आमच्या बाजूच्यांनी फारसे मनाला लावून घेण्याचे कारण नाही. कारण त्यांच्याच नेत्यांनी जाहीरपणे सांगितले आहे, श्रीमान उद्धवजी ठाकरे यांनी जाहीरपणे सांगितले आहे की, आम्हाला शेतीतील काहीही कळत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी राज्याच्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा चालू आहे. ही चर्चा करीत असताना सदस्यांनी कोठला विषय घ्यावा, कोठल्या विषयावर चर्चा करावी याबाबत अन्य सदस्यांनी मार्गदर्शन करता येणार नाही. त्यांच्या समोर अर्थसंकल्प आहे. आपणा सर्वांसमोरच अर्थसंकल्प आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.रावते हे त्यातील एक भाग म्हणून साखर उद्योगावर बोलत आहेत. त्याचबरोबर राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबतही बोलत आहेत. त्या संदर्भात 'जाणता राजा' असा उल्लेख त्यांनी कोणाचा केला तर त्याबद्दल आमच्या समोरच्या बाजूचे मित्र त्यांच्या भाषणातून त्यावर उत्तर देऊ शकतात. केवळ 'जाणता राजा' असा शब्दप्रयोग सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी येथे केलेला आहे. ...

( यानंतर श्री.सरफरे ...ओआ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

आणि म्हणून माझी माननीय सदस्यांना हरकतीच्या मुद्याव्दारे विनंती आहे की, आपण माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण ऐकून घ्यावे. आपण या सभागृहातील बुध्दिमान सदस्य आहात. आपण आपल्या चतुरस्त्र भाषणामधून त्यांनी केलेल्या वक्तव्याचा समाचार घेण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे त्यांच्या भाषणामध्ये आपण कोणताही अडथळा आणू नये.

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : सर्व माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये मांडलेले मुद्दे आपणास पटले नाही तर आपण आपल्या भाषणामधून ते खोडून काढू शकता, आपणास तो अधिकार आहे.

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एका बाजूला आपण शेतकऱ्यांबाबत फार मोठा कळवळा असल्याचे उद्‌गार काढता आणि दुसऱ्या बाजूला ज्या शेतकऱ्यांनी पैसा पैसा जमा करुन कारखाना उभा केला त्यांना आपण चोर, हरामखोर म्हणता. गेल्या 40 वर्षामध्ये सत्तेमध्ये असतांना आपण एक कारखाना उभा करु शकला नाही......

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळेल त्यावेळी आपण आपल्या भाषणामध्ये आपले मत व्यक्त करावे.

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, आमच्या नेत्यांना संपूर्ण महाराष्ट्राने "जाणता राजा" म्हणून मान्य केले आहे. तुमच्या तुटून पडलेल्या रिमोट कंट्रोलला नाही. ते रिमोट कंट्रोल लोकांनी तोडून फेकून दिले आहे....

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे लर्नेड ॲडव्होकेट परममित्र श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेब आपण मला "साखरेवर कशाला बोलता, अर्थसंकल्पावर बोला" असे म्हणालात. ते रेकॉर्डवर आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला आहे...

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांचे भाषण पूर्ण होऊ द्या....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे.साखरेच्या प्रश्नावर बोलण्याबद्दल माझा आक्षेप नाही व तो माझा मुद्दा नाही. आणि माननीय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी सांगितल्याप्रमाणे त्याबाबत माझा हरकतीचा मुद्दा नाही. परंतु साखरेच्या प्रश्नावर बोलत असतांना दोन-दोन मिनिटांनी हे सर्व पाप जाणता राजाने केले आहे असे सांगून आपल्या निदर्शनास आणून दिले जात आहे याला माझी हरकत आहे.

श्री. दिवाकर रावते : अहो वकील साहेब, ज्या वकिलांचे कोर्टामध्ये खोट्याचे खरे करण्यामध्ये आयुष्य जाते, कारण त्याची त्यांनी फी घेतलेली असते. इतर बाबतीत त्यांचे घेणे-देणे नसते. मी या अर्थसंकल्पाच्या बाहेर बोललो आहे काय?

(गोंधळ)

(सत्ताधारी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलू लागता)

**तालिका सभापती** : माझी सर्व माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपया आपण सभागृहामध्ये शांतता पाळावी.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा वकिलांचा अपमान आहे....

**तालिका सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा रामशास्त्री प्रभुणे यांचा अपमान आहे...

**तालिका सभापती** : दोन्ही बाजूकडील सर्व माननीय सदस्यांना मला विनंती करावयाची आहे की, आपल्याला सभागृहाचे कामकाज शांततेने चालवावयाचे असेल तर एकमेकांवर आरोप करण्यापेक्षा एकमेकांची मते आपण जाणून घ्यावीत. ज्यावेळी आपणास भाषण करण्याची संधी मिळेल त्यावेळी आपले मत व्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आपणास आहे. न पटलेला मुद्दा खोडून काढण्याची आपणास पूर्ण संधी आहे. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा चुकीचा आहे असे आपणास वाटले तर आपण तो खोडून काढू शकता.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, वकिलीचा व्यवसाय करणारा कुणीही वकील एखाद्या प्रकरणामध्ये ॲडव्होकेट एथिक्सप्रमाणे फी स्वीकारतो आणि त्याप्रमाणे पक्षकाराची बाजू कोर्टामध्ये मांडतो हे नोडल प्रोफेशन आहे. एखाद्या कार्यकर्त्याने आपल्या नेत्याची पाठराखण करणे हा व्यवसाय नाही ते समाजकारण आहे. आणि म्हणून नेत्याच्या विचाराची पाठराखण करणे याची तुलना वकिली व्यवसायाशी करणे या गोष्टीची सभागृहाने दखल घेतली पाहिजे. असे प्रकार पुन्हा होता कामा नये म्हणून मी याबाबत निषेध व्यक्त करते.

(यानंतर सौ.रणदिवे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तमाम वकिलांच्या बाबतीत नाही तर फक्त सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या संदर्भातच उल्लेख होता. तुमचा काही गैरसमज झाला असेल तर ते सोडून द्यावे.

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणे नमूद करतो, ते ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत आणि मी आतापर्यंत जे भाषण केलेले आहे, त्याचे पूर्ण रेकॉर्ड पहावे. जर मी अर्थसंकल्पाच्या बाहेरचे काही बोललो असेन तर मी आता येथून निघून जातो.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, आपल्याला हीच विनंती केली आहे की, आपण भाषणाला सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी विषयावरच बोलत आहे. या सदनामध्ये सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य भाषण करण्यासाठी उभे राहिले, तेव्हा प्रत्येकांनी माननीय कृषी मंत्र्यांचे अभिनंदन केले आहे. आम्ही त्याला हरकत घेतली नाही.

श्री.राम पडांगळे (खाली बसून) : तुम्ही फटाके वाजविले.

श्री.दिवाकर रावते : होय वाजविले. तुम्हाला काय वाजविले ते सांगतो.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, ......

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना माझी अशी विनंती आहे की,. . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणामध्ये काय ते बोलावे. तुमच्या भाषणामध्ये जे ठोकावयाचे आहे ते ठोका. जे बोंबलावयाचे ते बोंबला. वाजवावयाचे आहे ते वाजवा. पण मध्ये कशासाठी बोलत आहात ?

श्री.राम पडांगळे (खाली बसून) : असभ्य बोलत आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मध्येच बोलू नये.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, या सदनामध्ये . . . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे आणि कृपा करुन सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नये. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळेल, तेव्हा त्यांनी आपले मुद्दे मांडावेत.

. . . .2 पी-2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक गोष्ट कळत नाही. मी अर्थसंकल्पातील जे मुद्दे आहेत, त्याच्या बाहेर जाऊन बोलत असेन तर मला खाली बसवावे. मला असे चालणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जर अशा पध्दतीने कामकाज चालणार असेल तर मग त्यांच्याही भाषणाच्या वेळी अडथळे आणता येतील. विरोधी पक्षाला देखील आपले विचार मांडावयास दिले पाहिजेत. पण अशा प्रकारची भूमिका घेऊन कोणी बोलणार असेल . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे काय चालले आहे ? सन्माननीय सदस्य म्हणाले की, फटाके वाजविले. पण मी काय बोललो होतो.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : हे असभ्य वर्तन असून . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सन्माननीय सदस्य असभ्यपणे बोलत आहेत. धमकी देऊन . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असभ्यपणे काय बोललो ?

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असभ्यपणे काय बोललो ? मी असे म्हटलेले आहे की, आम्ही काय वाजविले ते सांगेन. बरोबर आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनातील ......

**तालिका सभापती** : माझी पुन्हा सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण महाराष्ट्र राज्याच्या 2008-2009 या वर्षाच्या अर्थसंकल्पाबाबत चर्चा करीत आहोत. आपण सर्वांनी एकमेकांची मते जाणून घ्यावयास पाहिजेत. मग त्याबाबतीत शासनाला जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो घेईल. जर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना असे वाटत असेल की, विरोधी ....

. . . .2 पी-3



**तालिका सभापती** . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली मते चुकीची आहेत, तर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये ती मते खोडून काढावीत. पण आापण जर आपसात बोलावयास लागलात तर त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. यामुळे सभागृहाचा वेळ वाया जात आहे. याठिकाणी महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपसात न बोलू नये. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी नव्याने निवडून आलेले माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, त्यांनी एवढे एक्साईट होऊ नका. आपण असे म्हणालात की, तुम्ही फटाके वाजविले. त्यावर मी एवढेच म्हटले की, आम्ही काय वाजविले, ते मी तुम्हाला सांगेन आणि ते का वाजविले ? तेही सांगेन. यामध्ये असभ्य असे काहीच नाही.

श्री.राम पडांगळे (खाली बसून) : बोंबला असे म्हटलेले आहे . . . .

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. तुम्हाला ते झोंबले, त्याला मी काय करु ? जर झोंबत असेल तर मग बोलू नका. मग काय बोंबललो,काय वाजविले, काय केले ते सगळे सांगेन असे मी म्हटलेले आहे. यामध्ये असभ्यपणा काही नाही.

सभापती महोदय, सदनामध्ये विरोधी पक्षाने बहिष्कार घातलेला होता, त्यावेळी येथे अर्थसंकल्पाचे वाचन करण्यात आले. ते मला नंतर मिळाले. माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील, बुधवार, दिनांक 19 मार्च 2008 यांनी केलेले भाषण, भाग-पहिला असे या पुस्तकावर लिहीलेले आहे. आदरणीय गुरुनाथजी कुलकर्णी, याच्यामध्ये पान क्र.12 वर मुद्दा क्र.34 मध्ये असे म्हटलेले आहे की,"हंगाम 2006-2007 मध्ये गाळपाविना शिल्लक ऊसासाठी ऊस उत्पादकांना सवलत." हा जो विषय दिलेला आहे, त्याबाबतीत मी बोलत आहे.मी अर्थसंकल्पाच्या बाहेरचे काहीच मांडत नाही. त्यानंतर मुद्दा क्र.35 मध्ये "बगॅसवर आधारित वीज निर्मिती" असा विषय आहे. तसेच मुद्दा क्र.36 मध्ये "साखर कारखान्यांकरिता अतिरिक्त नियतव्यय" हा विषय आहे. म्हणजे साखरेच्या संदर्भात केंद्र शासनाने दिले, ते आमच्यापर्यंत पोहोचले नाही. पडांगळेसाहेब, एक सुंदर वाक्य असे आहे की, गरीब शेतकऱ्यांना भाव मिळावा यासाठी हे पॅकेज दिले आणि सगळया साखर सम्राटांनी

. . . .2 पी-4

26-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) PP-4

APR/D/ KTG/ KGS/ KTG/ 15:55

श्री.दिवाकर रावते . . . .

याची वाट लावली असा विषय आहे. मी अर्थसंकल्पावरच बोलत आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचे ऑब्जेक्शन आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (खाली बसून) : काही नाही.

श्री.दिवाकर रावते : मी आभारी आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री. जगदीश गुप्ता ) : मी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना सांगू इच्छितो की, सभागृहाचे कामकाज सभापतींच्या माध्यमातून चालत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या परवानगीची आवश्यकता नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथजी कुलकर्णी हे आमचे तिकडचे एकमेव स्फूर्तिस्थान आहेत. ते आम्हाला ऊर्जा देत असतात. यावर बोला असे ते म्हणाले की आम्ही बोलत असतो. मी तो विषय थांबवतो. नाही तर जाणता राजा आणि दिल्ली याबाबत मी फार तिखट बोलू शकतो हे आपण लक्षात ठेवावे. मी आदराने बोललो. श्री. शरद पवार हे देशाचे कृषी मंत्री आहेत. त्यांच्या धोरणांची पायमल्ली होत असेल तर या सदनामध्ये ते मांडणे हे माझे कर्तव्य आहे. मी एक शब्दही उणादुणा बोललेलो नाही. सन्माननीय सदस्यांना एवढे वाईट का वाटावे हे मला कळत नाही ? उलट आपण जागरुक होऊन या सरकारमध्ये जर असे कोणी श्री. शरद पवार यांचे छुपे दुष्मन असतील, त्यांना सॅबोटेज करणारे असतील तर त्याची काळजी आपण घ्यावी आणि आपल्या भाषणातून या सरकारला उघडे पाडावे. आपल्या नेत्याला सांभाळण्याची आपली जबाबदारी आहे. आमचे आदरणीय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड जे म्हणाले त्याचे उत्तर मला दुर्दैवाने द्यावे लागेल. कृपाकरुन वाईट वाटून घेऊ नका. मी विरोधी पक्षात आहेत. श्री. शरद पवार हे देशाचे कृषी मंत्री आहेत. हा देशाचा विषय आहे. हा त्या पदाचा विषय आहे. हा त्या व्यक्तीचा विषय नाही. सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, माझ्या नेत्याबद्दल बोलले म्हणून मी उल्लेख केला. मग या ठिकाणी आज श्री. उद्धवजी ठाकरे यांचा काही संबंध नाही. देशाचे कृषी मंत्री म्हणून त्यांचे धोरण या राज्यावर परिणाम करीत आहे हा यातील सरळ भाग आहे. मी त्या खुर्चीत बसल्यानंतर मला ते आघात घेतलेच पाहिजेत. श्री. उध्दवजी ठाकरे हे शेतकरी नाहीत. जाणता राजा यांनीच जाहीर केले की बांद्र्याला दोन शेतकरी आहेत. ते सर्वांनी वाचले. परंतु दिल्लीला सुध्दा सोनिया गांधी आणि राहूल गांधी हे दोन शेतकरी आहेत. त्यांच्या दरबारात ते काम करीत आहेत. श्री. उद्धवजी ठाकरे कोणाच्याही दरबारात काम करीत नाहीत हे आपण लक्षात ठेवावे. माननीय मंत्रिमहोदय डॉ. सुनील देशमुख बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपल्याला पुढचे ऐकावयाचे आहे काय ? आपल्यातील भांडणे आपणच मिटवावीत. आमच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/ KTG/ D

श्री. दिवाकर रावते ....

अंगावर येऊ नका. शासनामध्ये कर्तृत्वाची जी भांडणे असतील असतील ती आपणच मिटवावीत. या सदनामध्ये आपल्यासह, आपल्याकडून उभे राहणाऱ्या प्रत्येक सन्माननीय सदस्याने कर्जमाफीचा आनंद व्यक्त केला. सन्माननीय सदस्यांनी नाव घेतले म्हणून मी हे बोलत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. अमिताभ बच्चन शेतकरी झाले. आपली आमच्याकडेही मेहरनजर आहे. आम्ही श्री. नारायण राणे यांच्यासारखे बोललो नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथजी कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, आम्ही एवढे वाईट बोललेलो नाही. मी धोरणावर बोलतो. माझी ती प्रवृत्ती सुध्दा नाही हे आपण लक्षात घ्यावे. मला मनापासून वाईट वाटले. आपल्या सारख्या चांगली ग्रास्पींग पॉवर असलेल्या सन्माननीय सदस्यांनी असे बोलावयास नको होते. खरे म्हणजे या सरकारचे माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे असे म्हणाले की, 8 जणांच्या जीवावर कर्जमाफी आणता येते काय ? त्यावर कोणीच काही बोलले नाही. त्यांच्यावर कोणीही उखडून पडले नाही. कोणाचा अपमान सहन करावयाचा आणि कोणाचा अपमान सहन करावयाचा नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. श्री. गुरुनाथजी कुलकर्णी या ठिकाणी आमच्याबरोबर आमदार आहेत आणि सिंधुदुर्गमध्ये एक तरी लढवय्या आहे याबद्दल आनंद झाला. सभापती महोदय, मला काही वेळा सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांची भूमिका पार पाडावी लागते.

सभापती महोदय, ऑस्ट्रलियाच्या अभ्यास दौऱ्यावर असताना मी मेलबॉर्नच्या विधान भवनात गेलो होतो. त्या विधान भवनातून बाहेर पडत असताना तेथील पायरीवर एक शेतकरी निदर्शने करीत बसला होता. त्याच्या बाजूला त्यांच्या पध्दतीचे बोर्ड होते. आम्ही त्यांचे फोटो घेतले. त्यांनी मला एक पुस्तक दाखवले. 20 डॉलरचे ते पुस्तक होते. बी.टी.कॉटनमुळे जगाचे कसे वाटोळे झाले आहे याबाबत तो सांगत होता. तो पटकन म्हणाला You are from India?, which part?, मी म्हणालो मी महाराष्ट्रातून आलो आहे. त्यावर तो म्हणाला, come here, because of this decision of Maharashtra, is ruining the BT cotton. मी ते आर्टिकल काढले आहे. आज मी ते आणावयास विसरलो.

यानंतर श्री. खंदारे...

श्री.दिवाकर रावते....

विदर्भातील 6 जिल्हयांमध्ये कापसाच्या पिकाच्या वाटोळयाबाबत आंतरराष्ट्रीय मासिकामध्ये छापले जाते. त्या निदर्शकांनी माझ्या निदर्शनास आणावे म्हणजे एवढी शेतक-यांची दुर्दैवी अवस्था झ ालेली आहे. सभापती महोदय, संपूर्ण भारतामध्ये दरवर्षी 4000 कोटींचे बी-बियाणे विकले जाते. त्यापैकी एकटया महाराष्ट्रात 1000 कोटींचे बियाणे विकले जाते. म्हणजे एकूण बी-बियाण्यांच्या उत्पादनाच्या 25 टक्के बी-बियाणे महाराष्ट्र राज्य विकत घेतो. यामध्ये बीटी कॉटनची 70 लाख पॅकेज विकली जातात आणि देशात 1 लाख 60 हजार विकली जातात. आपल्या शेतक-यांची कापूस उत्पादन करण्याची अपेक्षा आणि त्यातून उद्याचे माझे भवितव्य घडेल याची जबरदस्त आस आहे. हे रेकॉडेड आहे. 1000 कोटींचे बी-बियाणे घेतले तर त्यामध्ये 750 कोटी खाजगी उत्पादकाचे बी-बियाणे आहे, महाबीज व एनएसएससीचे 250 कोटींचे आहे. 1000 कोटींपैकी फक्त कापसाचे 400 कोटी रुपयांचे बियाणे विकत घेतले जाते. 180 कोटींचे बियाणे सोयाबीनचे आहे, 100 कोटींचे बियाणे मक्याचे आहे. आता मका हा विषय पुढे येत आहे. मी असे विचारले की, मक्याचे बियाणे इतक्या मोठया प्रमाणावर का विकत घेतले जाते, आता तर कोणी मका खात नाही. त्यावेळी अशी माहिती मिळाली की, पशुखाद्य म्हणून मक्याला किंमत आलेली आहे. इथेनॉलच्या निर्मितीसाठी मक्याला किंमत आलेली आहे, स्टार्चसाठी मक्याला किंमत आलेली आहे, कॉर्न ऑईल म्हणून मक्याला किंमत आलेली आहे. जागतिक धोरणाचा भाग म्हणून अमेरिकेने कापूस उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त सबसिडी दिलेली आहे. त्यामुळे आपला कापूस उत्पादक अडचणीमध्ये आला आहे. आता अमेरिकेने कापसाचे उत्पादन कमी करुन मक्याचे उत्पादन वाढण्यासाठी सबसिडी देण्यास सुरुवात केली आहे. भविष्यामध्ये जगात मका सोयाबीनच्याही पुढे जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मी राज्यपालांकडे गेलो होतो. मला आता ते मनाला लागून राहिलेले आहे. तत्कालीन राज्यपाल श्री.एस.एम.कृष्णा यांनी मला विचारले होते की, आपल्या राज्यात आत्महत्या का होत आहेत. आम्ही श्री.रामदास कदम, श्री.दत्ताजी नलावडे यांच्या नेतृत्वाखाली शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात राज्यपालांना निवेदन देण्यासाठी गेलो होतो. गुजरात राज्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या का होत नाहीत असा त्यांनी प्रश्न विचारला होता. राज्यपालांनी मला प्रश्न विचारल्यामुळे मी दिल्लीतील लोकांना, तज्ज्ञांना, सर्वांना विचारत होतो.

2...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

कारण मी शेतकरी नाही. त्यामुळे मला शेतीबद्दल मला ज्ञान असू शकणार नाही. जे तज्ज्ञ असतात ते सर्वच शेतकरी असतात असे नाही. पण शेतीसंबंधी तज्ज्ञच अहवाल देत असतात. जे वैज्ञानिक, शास्त्रज्ञ असतात ते शेतकरी असतात असे नाही. परंतु शेतीचे ते वेगवेगळया प्रकारचे बीज उत्पादन करतात, उत्पादन वाढण्यासाठी प्रयोग करीत असतात. शेतीच्या भल्यासाठी व संवर्धनासाठी, आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी शेतकरी असले पाहिजे असे नाही. संवेदना होत्या म्हणून कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनिया गांधी यांनी कर्जमाफीच्या धोरणामध्ये महत्वाची कामगिरी बजावली आहे. हे शेतकरी म्हणून नाही तर संवेदना असल्यामुळे त्यांनी हे काम केले आहे. हे सर्वांनी लक्षात घ्यावे. म्हणून संवेदना महत्वाच्या आहेत. राज्यपालांनी मला विचारले त्यानंतर मी पाठपुरावा करीत होतो. 2005-06 मध्ये प्रती हेक्टर किती किलोग्रॅम कापूस निर्माण झाला त्याची माझ्यापुढे आलेली माहिती विचित्र आहे. महाराष्ट्र 187 कि.ग्रॅ. इतर राज्यात पोत तीच आहे, पण पंजाबमध्ये 731 कि.ग्रॅ., गुजरातमध्ये 610 कि.ग्रॅ., आंध्र प्रदेशमध्ये 347 कि.ग्रॅ., हरियाणामध्ये 437 कि.ग्रॅ., ओरिसामध्ये 435 कि.ग्रॅ., पश्चिम बंगालमध्ये 510 कि.ग्रॅ. म्हणजे कापसाच्या बाबतीत प्रती हेक्टरी उत्पादनात राज्य सर्वात मागे आहे. मग या राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी का आत्महत्या करणार नाही ? इतर राज्यात प्रचंड हेक्टरी उत्पादन येत असताना महाराष्ट्र राज्याचे उत्पादन कमी आहे. याबाबतची कारणे शोधली तर असे दिसून येते की, येथे ओलिताची सुविधा नाही. तेथे सिंचनाची व्यवस्था आहे. पण आपल्याकडे कोरडवाहू शेतीमध्ये पीक घेतले जाते. सिंचनासाठी आक्रोश मी नेहमी करतो, आता मी तो करणार नाही. कारण आता त्यासाठी वेगळे अधिवेशन भरविण्याची वेळ आलेली आहे. कोरडवाहू जमिनीत कापूस घेतला जातो. या जमिनीला कालव्यातून पाणी दिले जाते. ज्यावेळी जमीन सुकलेली असते, कापसाला गरज असते त्यावेळी दिले जात नाही. आपल्या पाळीप्रमाणे पाणी दिले जाते.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

पाणी देताना मात्र प्रती हेक्टरी किंमत लावली जाते. पाळी प्रमाणे पैसे घेतले तर तुमचे पैसेही वसूल होतील. हे शासन कापूस उत्पादक शेतक-याला काही सुविधा देणार आहे की नाही ? राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आज मरतोय. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, जी कर्जमुक्ती केली त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करण्यामध्ये तुम्ही मश्गुल राहू नका. कर्जमाफी दिल्यानंतर माझी एकट्याची प्रतिक्रिया वर्तमानपत्रातून छापून आली. ती प्रतिक्रिया विरोधाकरिता आणि पक्षाभिनिवेशाने केलेली नव्हती. माझ्या विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे, त्याला काही तरी मिळेल असे मला वाटत होते. ज्याच्यासाठी मी रडतोय तो रडतच राहिला आणि ज्यांनी काही मागितले नाही त्यांना यामध्ये लाभ झाला. सभापती महोदय, 41 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्याचे मी आजच्या वर्तमानपत्रामध्ये वाचले. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना मी विचारु इच्छितो की, दिले त्यामध्ये सुख मानायचे की जे उद्ध्वस्त होत आहेत त्याचे दु:ख मानायचे ? आम्ही हे जे दु:ख आपल्या पुढे मांडत आहोत ते आमचे ढोंग नाही. शेतकरी या सर्व संकटातून कसा मुक्त होईल याचा आपण सर्वांनी विचार करण्याची वेळ आलेली आहे आणि हे मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच सांगितले आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाने एकमेकांच्या उरावर बसून, राजकारण करुन शेतक-याचा प्रश्न सुटणार नाही. शेतकरी सुखी होण्यासाठी तुम्ही आम्ही एक निश्चित अशा प्रकारची भूमिका स्वीकारली तरच शेतक-याच्या जीवनामध्ये काही फरक पडू शकेल. किंबहुना उद्ध्वस्त होणा-या शेतक-याच्या भावी पिढीला कसे हासविता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे आणि त्याची सुरुवात मी माझ्या आंदोलनाने करणार आहे.

सभापती महोदय, कृषी विभागाकडून शेतक-यांना काय दिले जाते, कोणते संशोधन होते आणि काय निर्माण होते हे पाहिले तर ती एक चिंतेची बाब आहे. संशोधनासाठी कृषी विभागाकडे ज्ञान आणि साधने नाहीत. शासनाने कृषी विद्यापीठांचे खाजगी कंपन्यांबरोबर कोलॅबोरेशन केले तर उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेली वेगवेगळया प्रकारची बियाणे निर्माण होऊ शकतील. महाराष्ट्रातील शेतक-याला वेगळी वाणे मिळतील. सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धविकास या खात्याबद्दल आम्हाला बोलण्याची इच्छा नाही. त्या खात्याबद्दल बोललो तर मी विरोधात बोलतो असे माननीय मंत्री महोदयांना वाटेल . बोलून काही उपयोग नाही. कारण भ्रष्टाचार करणा-यांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

हलविण्याची या सरकारची ताकद नाही. विधानसभेमध्ये माननीय अध्यक्षांनी सरकारवर ताशेरे मारले. त्यामुळे सरकार त्यांच्यावर रुसले. त्यावेळी त्यांनी असा खुलासा केला की मी सरकारवर टीका केली नाही तर दुग्धविकास खात्याच्या कारभारावर आणि अधिका-यांवर टीका केली. सभापती महोदय, एक क्षुल्लक चूक झाल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांना घरी पाठवले, श्री. ए.आर.अंतुले यांना घरी पाठवले. आमच्या कारकीर्दीतही दोषी ठरलेले मुख्यमंत्री घरी गेले. सभापती महोदय, म्हशीच्या जागी रेडे वाटणा-या माणसाबद्दल मी काय बोलणार ? म्हणून त्या विषयी मी बोलण्याचे टाळतो.

सभापती महोदय, मराठवाडयातील देगलूर येथील सोडतीन कोटीचा दूध भुकटी प्रकल्प बंद आहे. हा प्रकल्प चालू करण्यासाठी शासन का परवानगी देत नाही ? अर्थसंकल्पातील आकडयवरुन सरकारची मानसिकता दिसत नाही तर निर्मितीतून मानसिकता दिसते. सिंचनाच्या बाबतीत जी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती आपणा सर्वांना डोळयाखालून घालावी लागेल. सिंचनावर फार मोठ्या प्रमाणावर खर्च करुन सुध्दा राज्यातील सिंचन क्षमता फक्त 17 टक्के आहे आणि देशाची सिंचन क्षमता ही 43 टक्के आहे. राज्यातील फक्त 17 टक्के जमीन ओलिता खाली आलेली आहे. उर्वरित जमीन ओलिताखाली केव्हा येणार आणि त्यासाठी शासनाने कोणती धोरणात्मक भूमिका घेतलेली आहे ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

गेल्या आठ-दहा वर्षात 17 टक्के नव्हे तर 50 टक्के, 22 टक्के, 25 टक्के क्षेत्र सिंचनाखाली आणावयास पाहिजे होते. परंतु शासनाकडून सिंचन क्षेत्रात कोणत्याही प्रकारची वाढ केलेली दिसून येत नाही. 1960-61 या वर्षी महाराष्ट्रातील 188.02 लाख हेक्टर सिंचन क्षेत्र होते. सदर सिंचन क्षेत्र 256.06 हेक्टर इतके झाले, म्हणजे 20 टक्क्यांनी सिंचन क्षेत्र वाढले होते. परंतु आता मात्र सिंचन क्षेत्रात पाहिजे तेवढी वाढ झालेली दिसून येत नाही ही खेदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, गेल्या 45 वर्षात अन्नधान्य उत्पादन 4 टक्क्यापेक्षा जास्त वाढ झालेली नाही हा देखील एक चिंतेचा आणि संशोधनाचा विषय आहे. एकीकडे काही प्रमाणात सिंचन वाढले, त्याप्रमाणात धान्य उत्पादन वाढत नाही. पेरा मोठया प्रमाणात वाढला आहे, तरी देखील धान्य उत्पादनात वाढ होत नाही. धान्य उत्पादन का वाढत नाही या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. देशाच्या पातळीवरील धान्य उत्पादन 1716 किलोग्रॅम एवढे आहे. महाराष्ट्राचे धान्य उत्पादन फक्त 924 किलोग्रॅम एवढे आहे. या अर्थसंकल्पातून शासनाने कोणत्या प्रकारचे कृषि धोरण दिले आहे काय यासंबंधीची माहिती माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात द्यावी. अर्थसंकल्पात या विभागासाठी इतक्या कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्या विभागासाठी इतक्या कोटी रुपयांची तरतूद केली आहे. आपण प्रत्येक विभागास किती कोटी रुपयांची तरतूद केली आहे यासंबंधीची आकडेवारी अर्थसंकल्पात नमूद केली आहे. या राज्यात सिंचन प्रकल्प उभे राहून, सिंचनाखाली बरीच जमीन ओलिताखाली आली असताना धान्याच्या उत्पादनात वाढ होत नसेल तर ही बाब अतिशय चिंतेची आहे. शेती उत्पादनात वाढ होत नसल्यामुळे राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त होत आहेत. पर्यायाने ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत. या राज्यातील शेतक-यांचे उत्पन्न वाढावे यासाठी पुरेशा सुविधा निर्माण करणारे धोरण असावे अशा प्रकारची भूमिका तज्ज्ञांकडून मांडण्यात आली आहे. शेतक-यांचे उत्पन्न वाढेल यासंबंधीचे शासनाचे धोरण या अर्थसंकल्पात कुठेही दिसून येत नाही ही आमची व्यथा आहे. कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळास किती निधी दिला ? तापी खोरे सिंचन विकास महामंडळ किती निधी दिला ? या प्रश्नापेक्षा पाणी अडविल्यानंतर धान्याचे उत्पादन वाढविण्यासंदर्भात शेतक-यांना कोणत्या सुविधा निर्माण करुन दिल्या आहेत हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. या बाबतीत शासनाने खुलासा करावा अशी माझी शासनास विनंती आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, कृषि सलंग्न कार्ये यातील वृध्दीदर 2006-07 मध्ये 3.08 टक्के होता तो वृध्दीदर आता 2.06 इतका झाला आहे. हा वृध्दीदर सुध्दा कमी झालेला आहे. ही काही राज्याच्या प्रगतीची लक्षणे आहेत काय ? राज्य प्रगतीवर गेलेले दिसून येते आहे काय ? हा वृध्दीदर वाढविण्यासाठी अर्थसंकल्पात काय प्रोव्हीजन केली आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. अर्थसंकल्पातील आकडेवारी बघून माननीय मंत्री महोदय सांगतात की, महाराष्ट्रात सगळे योग्य चालले आहे. कृषि सलंग्न कार्ये यातील वृध्दीदर कमी का झाला याचा खुलासा माननीय वित्तमंमत्र्यांनी करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, उद्योग क्षेत्रातील देखील दर खाली आला आहे. त्याची कारणे अनेक आहेत. राज्यात वीज नाही तर तुम्ही तरी काय करु शकता ? मला आज बोलण्यासाठी वेळ मिळाला तर वीज विषयाच्या बाबतीत मी बोलणार आहे. या देशातील प्रत्येक राज्याचे दरडोई उत्पन्न किती आहे ? प्रत्येक राज्यात मजुरांची संख्या किती आहे ? यासंबंधीची आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे. आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, यांचे महसुली जमा आणि खर्च तसेच दरडोई उत्पन्न किती आहे यासंबंधीची माझ्याकडे माहिती आहे. बिहार राज्यातील वेतन आणि मजुरीवरील खर्च मला उपलब्ध होऊ शकलेला नाही. त्याचे कारण बिहार राज्यात बिहार राज्यात लोकांच्या हाताला काम द्यावे अशी कोणतीही सिस्टीम अथवा योजना तेथील सरकारकडे नाही. त्यामुळे तेथील लोक या राज्यात नोकरीसाठी येतात. म्हणून आम्हाला त्या लोकांना थोपवावे लागते आहे. उद्योग क्षेत्राचा देखील दर कमी का झाला याचा देखील खुलासा माननीय वित्तमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, विजेच्या बाबतीत अतिशय खंत आम्हाला वाटते. आपण दुरदर्शनवर जाहिरात बघतो. मुंबई, नाशिक आणि पुणे हा सुवर्ण ट्रँगल आहे. या ट्रँगलमध्ये एका कंपनीचे बंगले आणि घरे बांधली जात आहे. आमच्याकडे हा सुवर्ण ट्रँगल आहे काय ? आमचे आदरणीय उप मुख्यमंत्री उर्फ आबा, माननीय श्री. जयंत पाटील, हे निधीच उपलब्ध करुन देत नाहीत. आबा या सभागृहाचे नेते आहे म्हणून मी त्यांचे नाव या सभागृहात घेतले. राज्यातील एखाद्या विषयाच्या बाबतीत धोरण ठरविण्याचा त्यांना अधिकार आहे. गेल्या दशकापासून म्हणजे आम्ही सत्ता

3...





श्री.दिवाकर रावते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सोडल्यापासून वीज समस्या या राज्यात मोठया प्रमाणात निर्माण झाली आहे. वीज समस्या निर्माण होण्यास अत्यल्प गुंतवणूक हे एक कारण आहे. वीज ही तातडीची गरज आहे. राज्यातील सर्व उद्योग विजेवर सुरु आहेत. वीज निर्मितीसाठी शासन मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देत नाही. वीज निर्मितीसाठी अतिशय अत्यल्प निधी का उपलब्ध करुन दिला जातो आहे याचे कारण आम्हाला समजले पाहिजे....

**<u>सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषा दराडे</u>**

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये एकूण योजनेखालील खर्चामध्ये वीज क्षेत्रातील खर्चाचे प्रमाण 34 टक्के होते. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये हे प्रमाण 11 टक्क्यापर्यंत खाली आले आहे. 34 टक्क्यांवरुन 11 टक्क्यापर्यंत प्रमाण खाली येऊन सुध्दा अर्थसंकल्पाचे काय कौतुक करता ? विजेशी सगळया क्षेत्राचे भवितव्य निगडीत आहे. राज्यामध्ये पायाभूत सुविधा कितीही निर्माण केल्या तरी विजेवर सगळे भवितव्य अवलंबून आहे. आयटी पार्क उभे केले तरी सगळे बंद आहेत. कित्येक वेळेला 5/6 तास सर्वर बंद असतो. कधी कधी 10/10 तास बंद असतो. Nothing doing. केवळ वीज नाही म्हणून हे क्षेत्र आपण काबीज करु शकत नाही. विजेची मागणी आणि निर्मिती यामध्ये तफावत आहे ती दूर कशी होणार आणि कधी करणार हा महत्वाचा प्रश्न आहे. राज्य शासनाने वीज निर्माण करण्याच्या बाबतीत जेवढे म्हणून एमओयू केलेले आहेत त्यापैकी एकही कार्यान्वित झालेला नाही. या सर्व प्रकल्पातून 2012 साली वीज निर्माण होणार आहे. प्रत्येक राज्यामध्ये वीजेची कमतरता प्रत्येक राज्यकर्त्यांपुढे असते. विजेची मागणी नेहमी वाढतच असते. युती शासनाच्या काळात लोडशेडींग हा कधी चर्चेचा विषय नव्हताच. एखादा तास कधी तरी वीज नसे. असे त्यावेळी घडत होते आता ते का घडत नाही याचा विचार करणे आवश्यक आहे. वीज मंडळाचे विभाजन करुन शासनाने तीन कंपन्या निर्माण केल्या. भिवंडीमध्ये आमदार श्री. योगेश पाटील यांनी साखर वाटली. 600-650कोटी रुपयांचे पॉवरलूमचे विजेचे बिल थकले. भिवंडीमध्ये पॉवरलूम्स कोणाचे आहेत हे मी सांगावयास नको. त्यांना नेहमी माफी मिळते. म्हणजे बुडविणाऱ्यांसाठी सरकार सर्व काही करते. यावेळी 5 एकर शेतकऱ्याला कर्जमाफी मिळाली म्हणून त्यांनी आनंदाने साखर वाटली. त्या त्या वेळचे क्षण आणि भाव वेगवेगळे असतात. मुलगी झाली त्याचे दु:ख होते तर कोणाला आनंद होतो. तसाच प्रकार कर्जमाफीचा आहे. महाराष्ट्रातील शेतमजुरांचा प्रश्न मी नेहमीच सभागृहात उपस्थित करीत असतो. राज्यामध्ये 28.7 टक्के शेतमजूर आहेत. गुजराती साहेब हा विषय खरोखरच चिंता करण्यासारखा आहे. शेतकऱ्याच्या उत्पादनावर शेतमजूर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या आणि शेतमजुरांच्या आत्महत्या होत आहेत. पूर्वी निंदणी करण्यासाठी महिला जात असत. आता तरुण मुले जातात. शेतीची कामे महिला करीत असत. आता तरुण पोरे करतात. समाजातील घटकांचा हा शेतीमधील गंभीर फरक आहे. भविष्यात फार गंभीर परिस्थिती निर्माण होईल. 28 टक्के शेतमजूर या महाराष्ट्रात आहेत. या अर्थसंकल्पामध्ये सरकारने या

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

शेतमजुरांसाठी काय केले आहे ते सांगावे. शेतमजूर श्रमच करतो. बीपीएल खाली 519 रुपये उत्पन्न असल्यामुळे त्याच्यामध्ये तो बसत नाही. दारिद्रय रेषेखाली पण शेतमजूर येत नाही. शेतमजुरांच्या शेकडो आत्महत्या झालेल्या आहेत. तरी सरकार त्यांना काहीही देऊ शकत नाही. या राज्यामध्ये जवळजवळ 55-56 टक्के शेतमजूर आणि शेतकरी आहेत त्यातील 90 टक्के उध्वस्त जीवन जगत आहेत. शासन नेमके कोणते कृषी धोरण देणार आहे हा राज्यापुढील सर्वात महत्वाचा विषय आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

तुम्हाला लाभ किती झाला, काय झाला हा महत्वाचा विषय नाही. सर्वांनीच उल्लेख केला असल्यामुळे मी जास्त बोलणार नाही. परंतु दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या 10 लाखापैकी 3.82 लाख असेल तर कोणाची पाठ थोपटून घेत आहात? देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे उलटून गेली. असे असताना महाराष्ट्रातील 40 टक्के जनता दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहे. राज्य सरकारने एवढ्या योजना राबविल्या. सभापती महोदया, आपण देखील 5-7 योजनांचा उल्लेख केला. या योजना जातात कुठे? आदिवासी महामंडळाच्या दोन समित्यांवर मी काम केले आहे. माझा आग्रह आहे, सन्माननीय सदस्य श्री.पंडागळे यांना त्या समितीवर पाठवावे. आतापर्यंत सरकारने आदिवासींच्या विकासासाठी इतका निधी दिला, त्याऐवजी प्रत्येक आदिवासी कुटुंबाला एक-एक कोटी रुपये जरी दिले असते तरी तो निधी संपला नसता. परंतु तो आदिवासी मात्र तसाच उपेक्षित आहे. आदिवासींमध्ये कुपोषणाचे प्रमाण 54 टक्के आहे. कधीतरी अंतर्मूख होणार आहात की नाही? एकमेकांना दूषण देण्याचा राज्यकर्ते म्हणून आपण जरुर प्रयत्न करतो. त्यामध्ये कोणाला समाधान मिळणार आहे? भाषेची समृध्दी तुमच्याकडे असेल, आमच्याकडे देखील आहे. अलौकिक भाषण समृध्दीच्या साजशृंगाराची फुले उधळण्यापेक्षा त्या गरिबांसाठी काही करणार आहोत की नाही? कुपोषणाचा विषय आज आदिवासींपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो महाराष्ट्रातील शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत पसरलेला आहे. कुपोषणाच्या प्रश्नाने अत्यंत गंभीर स्वरुप धारण केलेले आहे. कोणत्या पध्दतीने आपण रिॲक्ट होणार आहात? कोणत्या पध्दतीने काम करणार आहात? दारिद्र्य रेषेचा विषय गंभीरतेने पुढे येत आहे.

सभापती महोदया, आजच मी आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मंत्रीमहोदयांनी सांगितले की, 11,52,759 कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले, त्यापैकी 2.42 लाख कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील आढळून आली. ही शहरातील आकडेवारी आहे. कोणत्या अर्थसंकल्पामध्ये याचे उत्तर सापडणार आहे?

सभापती महोदया, राष्ट्रीय रोजगार हमी योजना हा एक वेगळा विषय आहे. महाराष्ट्राची रोजगार हमी योजना होती. आता त्या योजनेचे काय झाले याबद्दल मी बोलू इच्छित नाही. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये तरतूद केलेली आहे. एक तर काम द्यायचे किंवा काम देता येत





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

नसेल तर भत्ता द्यायचा. अर्थमंत्र्यांनी याबाबत खुलासा करावा. नोव्हेंबर, 2007 पर्यंत 32,30,657 कुटुंबांची या योजनेखाली नोंद करण्यात आली. त्यापैकी 28,86, 893 कुटुंबांना रोजगार पत्रक दिले व 6,22,743 कुटुंबांना रोजगार पुरविण्यात आला. 28 लाखापैकी 6 लाख कुटुंबांना रोजगार पुरविण्यात आला असेल तर उर्वरित कुटुंबांना भत्ता दिला का? भत्ता दिला असेल तर तो किती देण्यात आला? 262.76 कोटी रुपये खर्च केले असे म्हटले आहे. त्यामुळे त्यांना भत्ता मिळाला नसावा असा माझा अंदाज आहे. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये काम देता येत नसेल तर पुरुषाला प्रतिदिन 30 रुपये व महिलांना प्रतिदिन 25 रुपये भत्ता देण्याची तरतूद आहे. असा भत्ता दिला गेला तर माणूस किमान उपाशी राहणार नाही अशी त्यामागे भूमिका आहे. काम दिले तर माणूस उपाशी राहणार नाही. मजुरांना 3 रुपये प्रती किलो या दराने धान्य दिले जाते. शासन कसे चालले आहे?छोट्या गोष्टीतून आपल्याला शासन समजते. अर्थसंकल्पामध्ये आकडेवारी फार दिलेली आहे. त्यात राज्याचे उत्पन्न हे कराव्यतिरिक्त महसुली उत्पन्न हा विषय माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे. कर गोळा होतच असतो. वस्तू विकत घेतली, रिसिप्ट फाडली की कर गोळा झाला. दारुची बाटली विकत घेतली की त्यावरील कर तिजोरीत जमा होतो. त्या व्यतिरिक्त राज्याचे जे उत्पन्न आहे, व्याजाची जमा रक्कम, नफा लाभांश, केंद्राचे अनुदान या मार्गाने महसुली उत्पन्न जमा होत असते. आता केंद्राचे उत्पन्न हळूहळू बंद होत आले आहे. राज्य अखत्यारित कराव्यतिरिक्त मिळणारे इतर महसुली उत्पन्न महत्वाचे आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

शिल्लक, दंड व शिक्षा असे मिळून प्राप्त होणारा महसूल हे पाहिले असता त्यावरुन राज्य कसे चालले आहे हे समजते. मी जे जे निर्माण केले त्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी कसे आहेत यावर सुध्दा अवलंबून असते. त्या नियमांची कठोर अंमलबजावणी होत असेल तर हे उत्पन्न वाढते, निर्बंध निर्माण होतात आणि शिस्त निर्माण होते. म्हणून गेल्या तीन वर्षाचे हेच उत्पन्न उतरत्या स्वरुपात आहे व त्यावरुन हे राज्य कसे चालत आहे हे दिसून येईल. मी बाहेरील देशात दौऱ्यावर गेलो त्यावेळेस आमच्या ड्रायव्हरची चूक झाली होती. त्यावेळेस आमची गाडी कॅमेऱ्याने बरोबर टिपली होती आणि "You have crossed the limit, you have to pay 20 Doller fine." असे आम्हाला सांगण्यात आले. वास्तविक रात्री बारा वाजले होते तरी तेथे पोलीस वगैरे कोणीच नव्हते. तरी देशील अशी कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत असेल, अशा प्रकारची शास्ती असेल, अशा प्रकारे कायद्याची कठोर अंमलबजावणी होत असेल तर डायरेक्टली दंडाची वसुली होऊ शकते, पैसे डायरेक्ट मायनस होतात. या छोटयाशा गोष्टीवरुन राज्य कसे चालले हे कळते. राज्यात एकूण 27196 ग्रामपंचायती आणि 33 जिल्हापरिषदा आहेत. त्यांचे एकूण उत्पन्न 35303 कोटी आणि खर्च 27248 कोटी एवढा आहे. उर्वरित 7 हजार रुपये शिल्लक राहतात. अशा प्रकारे 7 हजार कोटी ग्रामपंचायतींच्या माध्यमातून शिल्लक राहणार असतील तर ही चिंतेची बाब आहे हे मी नम्रपणे नमूद करु इच्छितो. सध्या टी.व्ही. वर आरोग्याची व स्वच्छतेची जाहिरात येते आणि बाळंतपण हॉस्पिटलमध्ये करावे, शासनाने सवलती दिलेल्या आहेत असे सांगितले जाते. परंतु हॉस्पिटलमध्ये स्वच्छता नसते, इतका पैसा शिल्लक असताना हॉस्पिटलमध्ये सोय होत नाही, हे पाहून खेद वाटतो, कारण मी बऱ्याच ठिकाणी भेटी देत असतो. पण बाळंतपणाच्या वॉर्डामध्ये गेलो असता त्या ठिकाणचे पत्रे वगैरे बाहेर आलेले दिसतात. अशा परिस्थितीत पेशंटला पत्रा वगैरे लागला तर काय होणार ? आपल्याकडे अर्थसंकल्पात शिल्लक दाखविली जाते पण याबाबतीत नियंत्रण व नियोजन कसे करणार यातच सरकारचे कौशल्य असते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सभापती महोदया, एस.टी. महामंडळाच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर एस.टी. कामगारांचे मी कौतुक करणार आहे. कारण तोट्यात चाललेले महामंडळ या एस.टी. च्या कामगारांनी निर्धार केला आणि दोन वर्षांपासून नफ्यात आणले आहे. या महामंडळाला आतापर्यंत 1 हजार कोटीचा तोटा होता आणि आपल्याला बाहेर जावे लागणार ही जाणीव कामगारांमध्ये
निर्माण झाल्यानंतर त्यांनी निग्रह केला आणि गेल्या दोन वर्षात 25 ते 30 कोटी सरप्लसमध्ये हे महामंडळ आणले, त्यांच्या कौतुकाबाबत शासन काय करणार आहे ? कारण या अर्थसंकल्पात आणखी आराम गाडीतून जाण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना सवलती देण्यासंबंधी म्हटले आहे, त्यासंबंधी मी बोलत आहे. आज ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने, इच्छाशक्तीने, एस.टी. आम्ही सांभाळू शकतो असे दाखवून दिले त्यांच्या संदर्भात माझी शासनाला अशी विनंती आहे की, एस.टी. कडून आपण 490 कोटी रुपये करापोटी घेतो त्यात त्यांना 50 टक्के सवलत द्यावी अशी त्यांची मागणी आहे. शेवटी एवढेच सांगू इच्छितो की, कर्जमाफी हा विषय अत्यंत गंभीर आहे. कारण कर्जमाफीचा आनंद मिळावा, काही भागातील शेतकऱ्यांना कमी मिळाला म्हणून आम्ही ही लाट चालू ठेवली हे सांगून हे मेळावे भरविले. संपूर्ण 7/12 चे उतारे कोरे झाले नाही तर आमची लाट चालूच राहील आणि सुदैवाने तसे शासनाने केले. कारण याची जाणीव सर्व राज्यकर्त्यांना झालेली आहे. शेवटी हा उद्ध्वस्त शेतकरी असला तरी तो महाराष्ट्र राज्यासारख्या समृध्द राज्याचा शेतकरी आहे, एखाद्या कंगाल राज्याचा शेतकरी नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

कोणत्याही राज्याचे नाव घेतल्यातर पटकन भावना दुखावतात त्यामुळे कोणत्याही राज्याचे नाव घेत नाही. या समर्थ राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त होत असेल आणि जागतिक किर्तीचा कंलक निर्माण होत असेल तर ते योग्य नाही. ऑस्ट्रेलियातील मेलबर्नमधील शेतकरी आपल्याला सांगत असेल की, महाराष्ट्रातील सहा जिल्हयातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्याचे हे पुस्तक मी तुम्हाला वाचावयास देत असेल तर ती आपल्या दृष्टीने आनंदाची बाब नाही. म्हणून शेतक-यांसाठी जे काही करावयाचे असेल ते ताबडतोब करा. आता 41शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्याच आहेत त्यामुळे अजून किती शेतकरी आत्महत्या करणार आहेत याची वाट पाहू नका. आत्महत्या केलेल्या शेतमजूरांना मदत देण्याचे शासनाने नाकारलेले आहे त्यामुळे त्यांना 1 लाख न देता 5-50 हजार रुपये देऊन त्यांच्या कुटुंबाना आधार द्या अशी मी आपल्याला नम्रपणे विनंती करतो. शेतक-यांची उध्वस्तता काय आहे यासाठी मी एक वेगळे आंदोलन उभे करणार असून शेतक-यांची व्यथा या सभागृहात घेऊन येईन. मी जी शेतक-यांची व्यथा मांडेन ती प्रामाणिक असेल. त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण राहणार नाही त्यामध्ये राजकीय असूया नसेल, लढाई असेल ती शेतक-यांची आस्तित्वाची. मला नेहमी वाटत असते की, आपण या शेतक-याच्या पिढीसाठी काही करु शकत नाही परंतु या पुढच्य पिढीला त्याचा फायदा झाला पाहिजे, पुढील पिढीमध्ये शेतक-यांची उदासिनता संपली पाहिजे. शेतक-यांचे प्रमाण 37 टक्क्यावरुन 28 टक्क्यावर आले असून 28 टक्क्यावरुन शेतकरी उद्या 20 टक्क्यावर जाणार असेल तर उगाच आपण असे म्हणून कौतुक करुन घ्यावयास नको की, आमच्या साहेबांनी सांगितल्यामुळे शेतक-याने शेती सोडून उद्योग धंद्याकडे वळले त्यामुळे शेतक-यांची संख्या कमी झाली असे कौतुक करण्यापेक्षा शेतकरी शेतकरी राहिला तरच हा अन्नदाता जगाला जगवू शकेल. अन्नदात्याला टीकवणे हे गरजेचे आहे त्यामुळे शेतक-यांसाठी जे काही करावयाचे असेल ते लवकर करा, जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो लवकर घ्या आणि या शेतक-याला समृध्द केले नाही तरी चालेल परंतु सुखी तरी करा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मदां म्हात्रे(विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया , या राज्याचे अर्थमंत्री नामदार जयंत पाटील व माननीय राज्यमंत्री नामदार सुनील देशमुख यांनी मोठया कुशलतेने अर्थसकंल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात गरीब कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित वंचित, दुर्बल, अनुसूचित जाती-जमाती, महिला, बालके, अपंग अशा दुर्बल समाज घटकांसाठी या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली आहे. समाज घटकाचे सामाजिक, आर्थिक दारिद्रय निर्मूलन, बेरोजगारी, साक्षरता, भूमिसुधार, शोषणापासून मुक्ती असे विविध कार्यक्रम या अर्थसंकल्पात सामान्य लोकांना नजरेसमोर ठेऊन मांडलेल्या न्यायाच्या नवतीच्या आणि सामाजिक पुनर्रचनेत्या अर्थसंकल्पाला समर्थन देण्यासाठी मी उभी आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेला दिलासा देऊन समाजकारणाला आणि अर्थकारणाला नवी दिशा देणार यंदाचा अर्थसकंल्प आहे. सर्वच घटकांनी खुल्या मनाने स्वागत करावे असा हा अर्थसकंल्प आहे. विरोधाला विरोध ही भूमिका सोडून देऊन या अर्थसंकल्पाचे मन:पूर्वक विरोधकांनी सुध्दा स्वागत करावे अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, मी आज कृषी विषयावर विचार मांडणार नव्हते परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्सय श्री. दिवाकर रावते यांनी या सदनाला "जाणत्या राजा"बद्दल सांगितले आहे त्यामुळे जाणत्या राजाचे विश्लेषण मला या ठिकाणी करणे गरजेचे आहे. देशात अनेक कृषी मंत्री तसेच अनेक अर्थमंत्री होऊन गेले परंतु आज पर्यंत देशामध्ये जेवढे अर्थसंकल्प सादर केले त्यामध्ये चालू वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये देशातील शेतक-यांवर असणारे 60 कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचे ऐतिहासिक निर्णय या देशाचे माननीय पंतप्रधान, कृषी मंत्री शरद पवार आणि अर्थमंत्री श्री पी. चिंदम्बरम यांनी जो निर्णय घेतला त्यामुळे महाराष्ट्रातील शेतक-यांनाच नाही तर देशातील शेतक-यांना सुध्दा फार मोठा दिलासा मिळालेला आहे.

सभापती महोदया, रेल्वेचा अर्थसंकल्प ज्यावेळेस माननीय रेल्वे मंत्री श्री. लालूप्रसादजी यादव यांनी सादर केला त्यावेळी महाराष्ट्रातील तमाम नागरीकांनी अर्थसंकल्पाचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील जनता ही चांगल्याला चांगले म्हणणारी आहे. ज्यावेळी रेल्वेमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पात प्लॅटफॉर्मवर काम करणारे जे हमाल आहेत त्यांना रेल्वेमध्ये कायमस्वरुपी समाविष्ट करुन घेण्यात येईल असे सांगितले त्यावेळेस महाराष्ट्रातील तमाम हमालांनी महाराष्ट्रातील सर्व जनेतेने रेल्वेमंत्र्यांचे अभिनंदन केलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ..

आमचे नेते आदरणीय श्री.पवार साहेब यांनी गेल्या सहा महिन्या पासून देश पातळीवरील विविध शेती तज्ज्ञांची मते जाणून घेऊन, सर्व संबंधित अधिकाऱ्यांची देश पातळीवर बैठक घेऊन संपूर्णपणे अभ्यास करुन राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांना कशी मदत देता येईल याचा विचार करुन त्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला होता व अर्थसंकल्पात तरतूद केली होती. माननीय केन्द्रीय अर्थमंत्री श्री. पी.चिदंबरम आणि माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी या निर्णयाचे स्वागत केले. शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा जो निर्णय घेण्यात आला आहे त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनाच नव्हे तर संपूर्ण देशातील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर दिलासा मिळालेला आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की , आपल्या राज्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आंदोलने केली होती आणि कर्ज माफीच्या निर्णयाचा फायदा मात्र संपूर्ण देशातील शेतक-यांना झाला आहे. मला त्यांना असे सांगावयाचे आहे की, केन्द्रीय कृषी मंत्री संपूर्ण देशातील शेतकऱ्यांचा विचार करुन निर्णय घेतात व माननीय अर्थमंत्री अर्थसंकलपात तरतूद करतात. केन्द्रीय रेलवे मंत्री श्री लालूप्रसाद यादव यांचे आपण महाराष्ट्रात कौतूक करतो . केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली तेव्हा त्याचे कौतूक न करता उलट त्यांच्या विरोधात बोलावयास सुरुवात केलेली आहे. आपल्याकडे अशी म्हण आहे की, "जेथे पिकते तेथे विकत नाही " त्याप्रमाणे महाराष्ट्रातील केन्द्रीय नेत्याने जर चांगले काम केले असेल तर त्याबाबतीत त्यांना चांगले बोलणे सोडून विरोधात बोलले जात आहे.

सभापती महोदय, मला मागच्या एका घटनेची या ठिकाणी आठवण करुन द्यावयाची आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विषयी बरेच मुद्दे मांडलेले असल्यामुळे काळाच्या मागे जाऊन मला थोडे बोलावेसे वाटते . मुंबईमधील लोकसंख्या वाढत गेली तेव्हा नवीन मुंबई उभी केली पाहिजे असा शासनाने निर्णय घेतला होता आणि त्याकरिता सिडकोने 1970 साली शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन केल्या होत्या. त्यावेळी काही जमिनी एमआयडीसीने देखील संपादन केल्या होत्या. त्यावेळी या शेतकऱ्यांच्या मागण्याकडे कोणीही लक्ष दिले नव्हते त्यामुळे नवीन मुंबई आणि रायगड मधील प्रकल्पग्रस्त शेतकरी वारंवार आंदोलन करीत होते, मोर्चे काढत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

होते व आपल्या मागण्या माडण्यांचा प्रयत्न करीत होते. या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असतांना शासनाच्या , सिडकोच्या आणि एमआयडीसीच्या माध्यमातून त्यांना अनेक आश्वासने देण्यात आली होती परंतु प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण केल्या जात नव्हत्या. परंतु ज्यावेळी श्री.शरद पवार या राज्याचे मुख्यमंत्री झाले होते त्यावेळी श्री.दि.बा.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळ त्यांना भेटावयास गेले होते त्यावेळी एक ऐतिहासिक निर्णय श्री.शरद पवार यांनी घेतला होता. त्याच वेळी जासईचे आंदोलन मोठया प्रमाणावर केले गेले .पाच सहा जण हुतात्मा झाले होते. माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी असा विचार केला की, या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत त्यांच्या हाताला काम दिले नाही व त्यांना या उद्योगात नोक-या दिल्या नाहीत तर ते आत्महत्या केल्याशिवाय राहाणार नाहीत. म्हणून त्यावेळी असा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला होता की, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या त्यांना त्याच्या जमिनीच्या प्रमाणात साडेबारा टक्के विकसित जमीन देण्यात येईल. अशा प्रकारचे धोरण त्यावेळी जाहीर करण्यात आले होते. त्याचबरेबर एमआयडीसीने ज्या जागा संपादित केल्या होत्या त्या जागेमध्ये तेथील भूमिपूत्रांना नोक-या मिळाव्यात आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून त्यांना दगडखाणी देण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्या परिसरातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या नाहीत .आज नवी मुंबई डेव्हलप झालेली आहे ती डेव्हलप करण्यासाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या होत्या त्या भूमिपूत्रांना काम मिळाले असल्यामुळे तो थोडा फार सुखी झाला आहे. अशा प्रकारे तेथील शेतकऱ्यांना सुखी करण्याचा निर्णय त्यावेळचे मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी घेतला, आमच्या जाणत्या राजाने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे हे मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी याठिकाणी विरोधी भूमिका मांडलेली आहे तेव्हा त्या संदर्भात आमच्या पक्षाची भूमिका मी सभागृहामध्ये मांडलेली आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिकासभापती श्री.जगदीश गुप्ता )**

नंतर श्री.सुंबरे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 16:45

श्रीमती मंदा म्हात्रे ....

सभापती महोदय, साडेबारा टक्क्याचा निर्णय झाल्यानंतर शेतकऱ्यांना भरपूर पैसे मिळाले. रायगडमध्येदेखील जमिनी आज विकल्या जात आहेत. परंतु त्यावेळेस आमच्या प्रत्येक बैठकीमध्ये माननीय श्री.पवार साहेब म्हणायचे की, शेतकऱ्यांना मिळणारा हा पैसा असाच वाया जाता कामा नये, हा पैसा असाच उडविला जाता कामा नये त्यावेळी जागोजागी लेडीज बार मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले दिसतात आणि म्हणूनच ते त्या दृष्टीने काळजीने हे बोलत असत. शेतकऱ्यांच्या पैशाचे नीट नियोजन झाले पाहिजे, ते असेच उडविले गेले तर शेतकरी उद्‌ध्वस्त होऊन जाईल याबाबत ते नेहमीच सांगत असत. मला असे सांगावयाचे आहे की, आज आपण सर्वजण शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल, शेतकऱ्यांना दिल्या गेलेल्या कर्जमाफीबद्दल बोलत असताना मला हे मुद्दाम आवर्जून सांगावेसे वाटते. शेतकऱ्यांची इतकी काळजी घेणारा हा एकमेव नेता आहे आणि म्हणूनच कर्जमाफी देण्याच्या निर्णयाचे श्रेय कोणी अन्यांनी घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, हे मला या ठिकाणी आमच्या समोरच्या मंडळींना सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, आता मी अर्थसंकल्पावर बोलताना एक दोन मुद्दे विशेषत्त्वाने मांडणार आहे. आपल्या राज्य सरकारने साने गुरूजी आणि कै. सी.डी.देशमुख यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी या अर्थसंकल्पातून उपलब्ध करून दिला आहे त्याबद्दल मी या शासनाचे आणि माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करते. आपली हिंदू संस्कृती लक्षात घेता अष्टविनायकांच्या ठिकाणांना पर्यटन क्षेत्राचा दर्जा देऊन त्यासाठी 10 कोटीची तरतूद या अर्थसंकल्पात केल्याबद्दल देखील मी माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करते. त्याचबरोबर नवी मुंबईतील खारघर मध्ये ग्रामविकास भवनाचे बांधकाम सुरू आहे. तेथे खऱ्या अर्थाने महिलांच्या बचतगटासाठी 34 गावे आणि 64 खोल्या निर्माण केल्या जात आहेत. मी मनापासून त्याबद्दल शासनाला धन्यवाद देते. महिलांचे सक्षमीकरणाबद्दल आणि बचतगटाबद्दल सर्वजण आपण बोलतो परंतु शासनाने जे पाऊल या संदर्भात टाकले आहे, ग्रामविकास भवन उभे केले जाणार आहे त्यामुळे महिलांना तेथे चांगले प्रशिक्षण मिळणार आहे, त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला चांगली बाजारपेठ मिळणार आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करू इच्छिते. तसेच अशा प्रकारचे ग्रामविकास भवन मराठवाडा असेल, विदर्भ असेल प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी असले तर त्यामुळे महिलांच्या बचत गटांना त्याद्वारे आपल्याला चांगल्या प्रकारे प्रशिक्षण देता येऊ शकेल. त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ

..... झेडझेड 2 ...



श्रीमती म्हात्रे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र सरकारने निर्माण करावे अशीही विनंती मी या निमित्ताने सरकारकडे करते.

सभापती महोदय, यानंतर मी गृहखात्याच्या संदर्भात बोलू इच्छिते. पुरवणी मागण्यांमध्ये या विभागासाठी 3 कोटीची तरतूद केली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते त्याचबरोबर नवी मुंबई येथे पोलीस कर्मचाऱ्यांची घरे पाहिली तर ती फार मोडकळीस आलेली आहेत. या संदर्भात सिडको, नवी मुंबई महापालिका यांच्याबरोबर आम्ही समिती'च्या माध्यमातून बैठका घेतल्या होत्या. त्यामुळे या निमित्ताने मला शासनाला सुचवावेसे वाटते की, शासनाने या वर्षी जुन्या इमारतींसाठी 2.5 एफएसआय दिलेला आहे तसा तो या मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतींसाठी दिला तर सिडको तेथे घरे बांधून देण्यास तयार आहे आणि त्यामुळे शासनाचाही खर्च वाचणार आहे, शिवाय तेथील रहिवाशांना देखील मोठी घरे मिळू शकतील. तरी माझ्या या सूचनेचा आपण गांभीर्याने विचार करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पातून आपण ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात सवलत दिलेली आहे. मला येथे इतकीच विनंती करावयाची आहे की, जी गरीब, कष्टकरी माणसे आहेत, एसटी स्टँड, रेल्से स्टेशन्सवरील हमालीचे काम करणारी गरीब माणसे आहेत तसेच मुंबईतील डबेवाले आहेत त्यांचाही आपण विचार करणे आवश्यक आहे. विशेषत: मुंबईतील डबेवाले आहेत त्यांना रेल्वे पासामध्ये सवलत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने रेल्वे मंत्रालयाला शिफारास करावी अशी माझी सूचना आहे. तसेच अशा गरीब, कष्टकरी वर्गाला मोफत वैद्यकीय तपासणीची सुविधा वर्षातून दोन वेळा दिली गेली पाहिजे. ...

( यानंतर श्री. सरफरे ... एएए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

कारण ते आपल्या तब्येतीकडे कधी लक्ष देत नाहीत. ते जर कामावर हजर राहिले नाही तर त्यांना वेतन मिळणार नाही. तेव्हा या गरीब महिलांच्या आरोग्याची वर्षातून दोन वेळा तपासणी केली पाहिजे. त्यांचा विमा उतरविला पाहिजे. त्यांना म्हाडा आणि सिडकोमार्फत घर मिळण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. याकरिता अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, मी गेल्या वर्षी अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी भाषण करतांना बोलले होते की, महाराष्ट्रामध्ये महिला सरपंच या अत्यंत गरीब वर्गातील असून त्यांना काही कामानिमित्त तालुक्याच्या ठिकाणी जावयाचे असेल तर स्वत:चे वाहन नसल्यामुळे पुरुषांच्या वाहनामधून ते निघतील तेव्हा जावे लागते. तेव्हा तालुक्याच्या ठिकाणी जाण्याकरिता त्यांना एस.टी.चा मोफत पास देण्यात यावा. अशी गेल्या वर्षीपासून मागणी करीत आहे. त्याकरिता आपण या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी. आपल्या राज्यामध्ये साडे नऊ हजार महिला सरपंच आहेत. त्यांच्याकरिता आपण 4 ते 5 कोटींची तरतूद केली तर तालुक्याच्या ठिकाणी जाऊन त्या चांगले काम करतील. या सरपंच महिलांना आज मानधन मिळत नाही. म्हणून मी ही विनंती करीत आहे.

सभापती महोदय, नवी मुंबईच्या बेलापूर येथे ऐतिहासिक किल्ला आहे. हा किल्ला म्हणजे नवी मुंबईची शान आणि वैभव आहे. मागील महिन्यात अंदाज समितीची बैठक नवी मुंबई येथे घेण्यात आली होती. त्या बैठकीच्या वेळी माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे देखील उपस्थित होते. या शिवकालीन, पेशवेकालीन ऐतिहासिक किल्ल्याचे जतन करण्याची आज गरज आहे. कारण आज नवी मुंबईमध्ये दुसरे कोणतेही पर्यटन क्षेत्र नाही. नवी मुंबई ही केवळ कॉंक्रिटच्या जंगलाने वसविण्यात आली आहे. त्याठिकाणी कोणतीही ऐतिहासिक वास्तू नाही. त्यामुळे या वास्तूचे जतन, संरक्षण आणि सौंदर्यीकरण करण्यासाठी शासनाने त्या वास्तुचे पर्यटन स्थळामध्ये रुपांतर केले पाहिजे आणि तिचा विकास केला पाहिजे. जर ही बाब शासनाला शक्य नसेल तर याबाबत आपण सिडकोला आदेश दिले पाहिजेत. सिडकोचे संबंधित अधिकारी हा किल्ला ताब्यात घेऊन त्याची डागडुजी करण्यास तयार आहेत. तेव्हा या किल्ल्याकरिता शासनाने अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी अशी विनंती करते. सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये भाग घेऊन अनेक माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त केले आहेत. आपण देखील मला माझे विचार व्यक्त करण्याकरिता संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून आणि या अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपविते. जय हिंद, जय महाराष्ट्र. -----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री नामदार श्री. जयंत पाटील यांनी दिनांक 19 मार्च 2008 रोजी या सभागृहाला सादर केलेल्या अंदाजपत्रकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र राज्याचे हे शिलकी अंदाजपत्रक आहे. या अर्थसंकल्पामध्ये 142 कोटी रुपयांची महसूली तूट दाखविण्यात आली असून एकूण प्रस्तावित कर 367 कोटींचे आहेत. आणि एकूण 225 कोटींचा निव्वळ नफा अर्थसंकल्पामध्ये सांगितला आहे. ज्या अर्थी, महाराष्ट्राला 225 कोटी रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळणार आहे त्या अर्थी हे कराच्या रुपाने सरकारला उत्पन्न मिळणार आहे असा याचा सरळ अर्थ आहे. या भाषणाच्या मुद्दा क्रमांक 2 मध्ये म्हटले आहे की, "स्थिर किंमतीनुसार महाराष्ट्राचे स्थूल राज्य उत्पन्न आधीच्या वर्षीच्या 9.7 टक्के वाढीच्या तुलनेत 2007-08 मध्ये 9 टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे". याचा अर्थ यामधील "स्थिर किंमतीनुसार" हे शब्द जड आणि जटिल वाटतात. या अर्थसंकल्पामध्ये सर्वसामान्य माणसाला जगण्यासाठी लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या संदर्भात कोणताही उल्लेख केलेला दिसत नाही. या निमित्ताने मला एका गोष्टीची आठवण होते की, दिल्लीला भाजपचे सरकार असतांना कांद्याचे भाव 25 रुपये किलो इतके होऊन ते गगनाला भिडले होते, त्यावेळी दिल्लीचे सरकार गेले. त्या अगोदर मोरारजी भाईंचे सरकार होते त्यावेळी सोन्याचे भाव गगनाला भिडल्यावर ते सरकार गेले होते. त्या सरकारला याबाबत कोणतीही चिंता नव्हती.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

सभापती महोदय, आज अन्नधान्याचे भाव आकाशाला भिडलेले आहेत. स्टेशनरीचे भाव वाढलेले आहेत, सौंदर्य प्रसाधनाचे भाव वाढलेले आहे. किराणा मालाचे, तेलाचे भाव वाढलेले आहेत. तसेच सोन्याचे भाव देखील आकाशाला भिडलेले आहेत. लोखंड आणि सिमेंटच्या किंमतीबाबत उल्लेख करताच येत नाही इतके भाव गगनाला भिडलेले आहेत. या आघाडी सरकारने गेल्या आठ वर्षामध्ये या सर्व किंमती स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केलेला नाही. सुरुवातीला असलेल्या किंमती आणि आज असलेल्या किंमती यातील तफावत पाहिली तर या शासनाने महागाईला आळा घालण्यासाठी कोणतीही उपाययोजना केल्याचे दिसत नाही. उलट उत्पन्न वाढवून महागाई वाढविण्याचा प्रयत्न हे आघाडी शासन करीत आहे असे माझे म्हणणे आहे. दरडोई उत्पन्न सुध्दा वाढलेले आहे. मागच्या वर्षी 33,131 दरडोई उत्पन्न होते आणि यावषी 46,269 इतके दरडोई उत्पन्न आहे. म्हणजे जशी महागाई वाढत आहे तसे दरडोई उत्पन्न देखील वाढत आहे. हे दरडोई उत्पन्न कशामुळे वाढले आहे ? याचा माननीय अर्थमंत्र्यांनी खुलासा केला पाहिजे. यामध्ये औद्योगिक क्षेत्राच्या निर्देशांकामध्ये वाढ झाल्याचे दाखविलेले आहे. अशा परिस्थिती सर्वकाही स्थिर आहे असे जर तुम्ही म्हणत असाल तर मग महागाईला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ते सांगितले पाहिजे. महागाई वाढल्यानंतर कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मिळतो. परंतु शेतकऱ्यांना, मजूरांना मिळत नाही. अर्थशास्त्रामध्ये नियम आहे की, यामुळे चलनवाढ निर्माण होते आणि त्याचा परिणाम सामान्य आणि गोरगरीब माणसावर जास्त प्रमाणात होतो आणि या राज्याच्या बजेटमधून तशीच स्थिती असल्याचे दिसून येत आहे.

सभापती महोदय, मला कृषी क्षेत्राच्या बाबतीत, जल सिंचनाच्या बाबतीत सांगावयाचे आहे. जलसिंचनासाठी 5995 कोटी रुपये निधी देण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे आणि प्रत्यक्षात 5916 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी सिंचनाच्या संदर्भात एक प्रस्ताव मांडलेला होता की, पूर्व विदर्भामध्ये छत्तीसगड आणि मध्य प्रदेशच्या सीमेला लागून 1) कालीसरार 2) पुजारीटोला आणि 3) शिरपूर असे तीन प्रोजेक्ट आहेत. पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांची अशी व्यथा आहे की, सर्वांना एकदा पाणी मिळाल्यानंतर सात-आठ वर्षे पाण्याची वाट पहावी लागते. कारण तेथे रोटेशनने पाणी मिळत आहे. म्हणून माननीय अर्थमंत्र्यांनी पूर्व विदर्भातील सिंचनाच्या व्यवस्थेसंबंधी अधिक निधी द्यावा अशी मला आग्रहाची विनंती करावयाची आहे. तसेच तेथील काही

. . . .3 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

प्रोजेक्ट केंद्र शासनामुळे अडकले असतील तर ते क्लिअर केले पाहिजेत. मागे एका प्रोजेक्टच्या बाबतीत सांगितले की, यासंबंधी निर्णय झालेला आहे. तर त्याला भरपूर निधी दिला पाहिजे. पूर्व विदर्भापासून पश्चिमेपर्यंत पाण्याची गंगा वहात आणली पाहिजे अशी अपेक्षा मी या अर्थसंकल्पावरील भाषणाच्या निमित्ताने करीत आहे. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांच्या विद्युतीकरणाकरता 372 कोटी रुपये दिलेले आहेत. ही अत्यंत कमी रक्कम आहे. अनेक शेतकऱ्यांना पंप दिलेले आहेत, सबसिडीवर पंप दिले आहेत परंतु विजेचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन घेता आले नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीत अत्यंत व्यथित अंत:करणाने सांगावेसे वाटते की, दूध उत्पादक शेतकऱ्यांचे सुध्दा हाल या आघाडी शासनाच्या काळामध्ये झालेले आहेत. 50 टक्के सबसिडी कोणाला दिली, कशी दिली ? जी वस्तू 100 रुपयाची आहे, ती 200 रुपयामध्ये दिली म्हणजे 10 हजार रुपयांची गाय असेल तर ती 20 हजारामध्ये दिली. यामध्ये ती गाय ज्या मार्केटमधून आणली आहे. त्याचा वाहन खर्च लावण्यात आला, दलालाची दलाली लावली आणि 10 हजार रुपयांची गाय 20-22 हजार रुपयांना दिली आहे. याचे उदाहरण देवरी तालुक्यामध्ये घडलेले आहे. तेथील आदिवासी शेतकऱ्यांला जी गाय दिलेली आहे, तिची किंमत 10 हजारापेक्षा जास्त असू शकत नाही. पण प्रत्यक्षात ही किंमत 22 हजार रुपये लावण्यात आली आहे अशी परिस्थिती आहे. मग पॅकेज जाहीर करुन काय उपयोग आहे ? शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने पॅकेजचा उपयोग होत नाही असे यातून दिसते.

सभापती महोदय, केंद्र शासनाने अर्थसंकल्पामधून शेतकऱ्यांसाठी कर्ज माफीची घोषणा केली आहे असा यामध्ये उल्लेख केलेला आहे. अजून राज्य शासनाने केलेले नाही. राज्य शासनाने स्वत: काही केले नाही, पण केंद्र शासनाने जे केले त्याचा उल्लेख याठिकाणी केलेला आहे. तसेच व्याजाच्या बाबतीत तर निश्चित असे कोणतेही धोरण नाही. कधी 6 टक्के, 4 टक्के तर कधी 2 टक्के असा दर केला. याबाबतीत एक कोणते तरी निर्धारित सूत्र असले पाहिजे असे माझे वैयक्तिक मत आहे. कारण महाराष्ट्रामधील ज्या को-ऑपरेटीव्ह बँका आहेत, त्यातील बऱ्याच बँकामधील व्याजाचे दर अजूनही कमी झालेले नाहीत. म्हणून माझी राज्य शासनाला विनंती आहे की, शेतकऱ्यांना या बजेटच्या माध्यमातून निश्चितपणे न्याय मिळाला पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

6 टक्के व्याजदर ठेवावयाचा असेल तर तसे ठरविले पाहिजे. 25 हजार रुपये मर्यादेपर्यंतच्या अल्प मुदतीच्या कर्जावर 4 टक्के व्याजाचा दर आणि 25 हजार ते 3 लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी 2 टक्के व्याजदर हे कसे काय हे मला समजत नाही. याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी सांगावे. जास्त कर्ज घेतले तर व्याजाचा दर कमी असतो हे कसे काय ? उलट शेतकऱ्यांना एकसारख्या व्याजदराने कर्ज दिले पाहिजे. मोठे शेतकरी, लहान शेतकरी या सर्वांना समान मानले पाहिजे. केवळ 5 एकरापर्यंतच्या शेतकऱ्यांनाच नाही तर सर्व शेतकऱ्यांना शासनाने या निमित्ताने कर्जमाफी द्यावी. सर्व शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली पाहिजे. परंतु काही शेतकऱ्यांना चणे दिले, काही शेतकऱ्यांना फुटाणे दिले तर काही शेतकऱ्यांना भुरका सुध्दा दिला नाही अशी शेतकऱ्यांची स्थिती झ ाली आहे. महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांना पॅकेज दिलेले आहे. या 6 जिल्ह्यातील 41 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शेतकऱ्यांना पॅकेज दिल्यावर त्यांना आनंद व्हावयास पाहिजे होता. त्यांचा आनंद गगनात मावेनासा व्हावयास पाहिजे होता परंतु तसे काही झालेले नाही. उलट शेतकऱ्यांमध्ये निराशा निर्माण होऊन शेतकरी आत्महत्या करु लागले आहेत.

सभापती महोदय, राज्यातील बेरोजगार लोकांची व्यथा वेगळी आहे. ज्या बेरोजगारांची प्रत्यक्ष नोंदणी झालेली आहे त्यांची संख्या या अर्थसंकल्पामध्ये 32 लाख सांगितलेली आहे. या 32 लाख बेरोजगारांना शासन रोजगार केव्हा देणार आहे ? त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी केवळ 7 हजार रुपये देऊन चालणार नाही. आपण 7 हजार रुपये प्रशिक्षणासाठी देणार असाल तर त्यांना नोकरी देण्याची हमी सुध्दा राज्य शासनाने घेतली पाहिजे. आपण त्यांना नोकरीचे प्रशिक्षण देणार आहात. जे बेरोजगार असतील त्यांना आय.टी.आय. किंवा टेक्निकल प्रशिक्षण द्यावे परंतु प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना रोजगार मिळाला ाहिजे किंवा नोकरी मिळाली पाहिजे. बेरोजगारांच्या नोकरीची व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांसाठी कर्जमाफीची सूचना यामध्ये केली आहे. विमुक्त भटक्या जाती व जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग या घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज एक खिडकी पध्दतीने मिळण्यासाठी राज्य शासन व्यवस्था करील असे यामध्ये म्हटले आहे. ही व्यवस्था कशा पध्दतीने करणार आहे ? त्यांना हे कर्ज कसे देणार ? इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी

...2...

अग्रेषित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. केशवराव मानकर .....

महामंडळ आहे. त्या महामंडळामार्फत बँकांकडे प्रकरणे जातात परंतु प्रत्यक्षात लाभार्थ्यांना कर्ज मिळत नाही ही शोकांतिका आहे. मला माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, आपण हे कर्ज कशा पध्दतीने देणार आहात याबाबत सांगावे. त्यांची गॅरंटी शासन घेणार आहे काय ? विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व्याजावर अनुदान देण्याचे ठरविले आहे ही स्वागतार्ह बाब आहे. भारताला खऱ्या अर्थाने सुशिक्षित आणि चांगले बनवावयाचे असेल, भारताला समर्थ करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. या शिक्षाणासाठी आपण अधिकच्या सोयी दिल्या तरच त्याचा उपयोग होईल.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भात बोलण्याची गरज नाही. सर्व खेड्यांमध्ये 14 ते 16 तासांपेक्षा कमी लोडशेडींग नाही. अर्थसंकल्पातील भाषणामध्ये मुद्दा क्रमांक 62 मध्ये सिंगल फेजिंग बाबतच्या निर्णयासंबंधी सांगितलेले आहे. त्यामध्ये दुसऱ्या टप्प्यामध्ये फक्त 12600 गावे समाविष्ट केलेली आहेत. खऱ्या अर्थाने खेंड्यापाड्यामध्ये वीज पोहोचवावयाची असेल, तेथील अंधार दूर करावयाचा असेल तर या ठिकाणी केलेली जी 219 कोटी रुपयांची तरतूद ही अल्प आहे. या तरतुदीमध्ये दुप्पट, तिप्पट वाढ करुन सर्व खेड्यांमध्ये कमीतकमी रात्री तरी उजेड कसा देता येईल यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे. आज अंधारामुळे, लोडशेडींगमुळे शेतकरी बेहाल झालेले आहेत. म्हणून यासंबंधी शासनाने निर्णय करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 66 मध्ये न्यायालये निर्माण करण्यासंबंधी सांगितले आहे. राज्य शासनाने केवळ न्यायालयांची निर्मिती करुन चालणार नाही तर न्यायालयांमध्ये सोयीसुविधा, न्यायालयांना इमारती, त्या ठिकाणी येणाऱ्या लोकांची व्यवस्था निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. मला खेदाने सांगावेसे वाटते की, न्यायालयाच्या इमारती अजूनही झालेल्या नाहीत. आमगाव, सालेकसा, देवरी या ठिकाणी संपूर्ण विधानसभा मतदारसंघामध्ये कोणतीही न्यायालयाची इमारत नाही. त्या ठिकाणी लोकांसाठी सोयीसुविधा नाहीत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. ज्या ठिकाणी मुद्रांक मिळते त्यासाठी कार्यालय नाही. तहसिल कचेरीमध्ये ते कार्यालय स्थापित केलेले आहे. मागील अर्थसंकल्पाच्या वेळी मी याबाबत सूचना केली होती.

यानंतर श्री. खंदारे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

ज्यापासून राज्याला महसूल मिळते. त्या उपनिबंधकांच्या कार्यालयाची व्यवस्था करण्याची सूचना केली होती. या साध्या सूचनेचे पालन झालेले नाही. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, या वर्षाचा शिलकी अर्थसंकल्प सादर झालेला आहे. राज्याच्या तिजोरीत भरपूर रक्कम आहे. म्हणून उपनिबंधकाच्या कार्यालयाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. तेथे रजिस्ट्रेशन करण्यासाठी अनेक लोक येतात, त्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करुन त्यांना न्याय देणे आवश्यक आहे. यासंबंधी शासनाने आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी मागणी करतो.

राज्यातील रोजगार हमी योजना अगदी मृतावस्थेत आहे. राज्यातील बेरोजगारांना रोजगार मिळत नाही, त्यांना बेकार भत्ताही मिळत नाही. केंद्र सरकारच्या रोजगार हमी योजनेबाबत महाराष्ट्र सरकार अपयशी ठरले आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. म्हणून सरकारने पूर्वीची रो.ह.यो.योजना चालू केली पाहिजे. केंद्र सरकारच्या योजनेचे काम करण्यास कोणी तयार होत नाही. त्याचे कारण काय आहे ते समजत नाही. रोजगार हमी, अर्धे तुम्ही आणि अर्धे आम्ही अशी रोजगार हमी योजना राज्यात सुरु होती. पण महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची अवस्था वाईट आहे. त्याबाबत फेरविचार करुन राज्यातील लोकांना काम देण्यात यावे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पातील मुद्दा क्रमांक 81 संबंधी बोलणार आहे. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी तरतूद केलेली आहे, पण ती अल्प आहे. यासाठी 67.85 कोटी रुपये निधी ठेवला आहे, त्यापेक्षा अधिक तरतूद केली असती तर आनंद झाला असता. महाराष्ट्रातील पूर्व भागामध्ये असलेल्या वाण नदीवर तीर्थक्षेत्र आहे. ही नदी उत्तरवाहिनी आहे. जिल्हा परिषदेने हे ठिकाणी तीर्थक्षेत्र होण्यासाठी मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे या तीर्थक्षेत्राला राज्य सरकारनेही मान्यता द्यावी. त्याठिकाणी हजारो भाविक येतात. हे ठिकाण पवित्रस्थान आहे. त्यामुळे तेथे भक्तांच्या निवासाची, रस्त्याची, शौचालयांची व्यवस्था होणे गरजेचे आहे. त्यासाठी साक्री टोला द्यावा. इंदिरा आवास घरकूल योजना कोणत्या जिल्हयामध्ये चालविली जाते ते समजत नाही. ही योजना भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात राबविण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे यशवंत ग्रामसमृध्दी योजना आहे. त्या योजनेतील

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

घरकुलांची संख्या दिसत आहे. पण माझ्या भागामध्ये अनुसूचित जाती व जमातीचे लोक खूप आहेत. सालेकसा, देवरी आमगाव येथे आदिवासी बांधव आहेत. या भागात इंदिरा आवास घरकुले बांधल्याचे पाहण्यात आले नाही. यासाठी शासनाने निश्चित धोरण आखले पाहिजे. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात धान उत्पादक शेतकरी आहेत. तेथे मालगुजारी तलाव आहेत. या तलावांसाठी शासनाने 20 कोटींची तरतूद केलेली आहे. पंतप्रधान पॅकेजमध्ये विदर्भातील सहा जिल्हयांचा समावेश आहे. परंतु त्यातून हे चारही जिल्हे सुटले आहेत. त्यामुळे माल गुजारी तलावांसाठी 20 कोटींची तरतूद करुन उपयोग होणार नाही. ख-या अर्थाने सिंचनाची व्यवस्था करावयाची असेल तर त्यात वाढ करणे आवश्यक आहे. पावसाच्या मोसमामध्ये जरी एक दोन वेळा पाऊस पडला नाही तरी त्या तलावातील पाण्याचा उपयोग होतो. त्यामुळे या तलावांच्या खोलीकरणासाठी भरीव तरतूद करावी. ख-या अर्थाने शेतक-यांना दिलासा देणारी ही योजना आहे. त्यातून रोजगार निर्माण होणार आहे. म्हणून माल गुजारी तलावासाठी 50 कोटींची तरतूद झाली असती तरी तीही कमी पडली असती. त्यामुळे 20 कोटी रुपयांच्या तरतुदीचा उपयोग होईल असे वाटत नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

(श्री. केशवराव मानकर....)

सभापती महोदय, राज्य शासनाने दिनांक 16 ऑक्टोबर 2007 पासून केंद्र शासनाची आम आदमी विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. या योजनेंतर्गत भूमिहीन कुटुंबातील 18 ते 59 वर्षे वयोगटातील मिळवता कुटुंबप्रमुख किंवा त्या कुटुंबातील एक मिळवती व्यक्ती लाभार्थी असतील. या विमा योजनेचा हप्ता राज्य सरकार भरणार आहे की लाभार्थी भरणार आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. कुटुंबातील कर्ता माणूस गेल्यानंतर ते कुटुंब उघड्यावर पडते. म्हणून त्या बाबतीत या योजने अंतर्गत त्या कुटुंबास निश्चित मदत मिळेल असा विश्वास मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, विविध विकास महामंडळाकरिता निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाकरिता 30 कोटी, लोकशाहीर अणाभाऊ साठे विकास महामंडळाकरिता 60 कोटी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकरिता 16 कोटी, महात्मा फुले मागासवर्गी विकास महामंडळासाठी 100 कोटी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. मी या निमित्ताने शासनाच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या महामंडळांकडून लाभार्थींच्या कर्जासाठीच्या ज्या केसेस बँकाकडे जातात त्या केसेस बँका परत पाठवितात. मी इतर मागासवर्ग कल्याण समितीचा सदस्य आहे. या महामंडळाकडून सामान्य माणसाला न्याय मिळत नसल्यामुळे या विकास महामंडळांना एवढा निधी देऊनही त्याचा काही उपयोग होत नाही असे मला वाटते.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येत आहे. 6 वी ते 8वी चे विद्यार्थी सदर योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. ही योजना चांगली आहे. परंतु योजना प्रत्यक्षात राबविण्यामध्ये खूप अडचणी आहेत. सकाळी आणि दुपारी अशा दोन अधिवेशनामध्ये शाळा चालतात. मध्ये अर्धा तासाची सुट्टी असते. या अर्धा तासाच्या सुट्टीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना जेवायला घालणे शक्य होत नाही. म्हणून या योजनेचे नीट नियोजन केले पाहिजे. या योजनेंतर्गत चांगल्या प्रतीच्या अन्नधान्याचा पुरवठा झाला पाहिजे. या योजनेंतर्गत दिल्या जाणा-या अन्नधान्याच्या बाबतीत अनेक तक्रारी आहेत. निकृष्ट दर्जाच्या अन्नधान्याचा पुरवठा होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे जेवण मिळत नाही. तेव्हा एक विशेष समिती नेमून ही योजना राबविण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर....)

सभापती महोदय, ग्रामीण भागातील 8व्या इयत्तेत शिक्षण घेणा-या दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थीनीना मोफत सायकली पुरविण्याची योजना राबविण्याचे शासनाने ठरविलेले आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

राज्यातील जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलांचे बांधकाम करण्यासाठी 13.11 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद अत्यंत अल्प आहे. आमच्या गोंदिया जिल्ह्यातील एकाही तालुक्यामध्ये क्रीडा संकुल नाही. खरे म्हणजे गुणवान क्रीडापटुंना वाव मिळण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडासंकुल होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला एक-एक कोटीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, हा राज्याचे वाटोळे करणारा असा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसासाठी नसून तो श्रीमंतासाठी आहे. विमानासाठी लागणा-या इंधनावरील कर 25 टक्क्यावरुन 4 टक्के इतका कमी करण्यात आलेला आहे. परंतु गाड्यासाठी लागणा-या पेट्रोल,डिझेलवरील कर कमी करण्यात आलेला नाही. हा कर कमी करावा अशी मी या निमित्ताने शासनाला सूचना करतो.

रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या हजेरी सहाय्यकांना कायम करण्यात आलेले आहे. त्यातील अनेक कर्मचारी सेवानिवृत्त देखील झालेले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील हजेरी सहाय्यकांचे वेतन दिलेले नाही. ही वेतनाची रक्कम 16 लाख रु. इतकी आहे. हीच परिस्थिती महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यामध्येही असून त्या बाबतीत मी अनेक वर्षापासून पाठपुरावा करीत आहे. असे असताना या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्येही या हजेरी सहाय्यकांच्या वेतन व भत्त्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. संपूर्ण महाराष्ट्रातील हजेरी सहाय्यकांचा हा प्रश्न आहे. तेव्हा त्यांच्या वेतन व भत्त्यासाठी तरतूद करावी अशी मी माननीय वित्त मंत्र्यांना आग्रहाची विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून मी माझ्या भाषणाला पूर्णविराम देतो.

-----

...नंतर श्री. गिते....

अस्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## <u>अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधी</u>

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत अजून अनेक सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे. अर्थसंल्पावरील चर्चा संपल्यानंतर सभागृहापुढे अर्धा-तास चर्चा आहेत. विधान परिषद सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत येण्याची अपेक्षा आहे. माझी अशी विनंती आहे की, सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु ठेवावी आणि आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात याव्यात अशी माझी आपणास तसेच सन्माननीय श्री.मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत आणि श्री.श्रीकांत जोशी यांना विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी केलेली विनंती आम्हाला मान्य आहे.

**तालिका सभापती** ( श्री. जगदीश गुप्ता ) : ठीक आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा नंतर घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, आदरणीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील आणि आदरणीय वित्त राज्यमंत्री आदरणीय डॉ.सुनील देशमुख यांनी सलग दहाव्यादा आणि शिलकीचा तिस-यांदा अर्थसंकल्प सभागृहात मांडला त्याबद्दल त्यांचे आणि सरकारचे अभिनंदन करतो. केंद्र सरकारने आणि आदरणीय केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरद पवार यांनी देशातील आणि महाराष्ट्रातील शेतक-यांना 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली, त्याबद्दल केंद्र सरकारचे देखील मी मनापासून अभिनंदन करतो. महाराष्ट्र सरकारने विदर्भातील शेतक-यांसाठी म्हणून पुनर्गठीत झालेल्या 824 कोटी रुपयांपैकी 414 कोटी रुपयांचा हिस्सा महाराष्ट्र सरकारने उचलला त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. शेतक-यांच्या शेतात शिल्लक असलेला ऊसाला हेक्टरी 25 हजार रुपये मदत करण्याची भूमिका सरकारने घेतलेली आहे. तसेच दुधाच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासंबंधीची भूमिका घेतली आहे त्याबद्दलही सरकारचे अभिनंदन करतो. मला सरकारला विनंती करावयाची आहे की, सोलापूर जिल्हयास उच्च शिक्षणासाठी विद्यापीठाची स्थापना झाली. 250 पदांची निर्मिती करण्यात आली. परंतु या ठिकाणच्या विद्यापीठाचा विस्तार करावयाचा असेल,त्यामुध्ये काही नवीन सुविधा निर्माण करुन द्यावयाच्या असतील तर त्यासाठी 500 एकर जमीन मिळावी म्हणून विद्यापीठ अनेक वर्षापासून सरकारकडे मागणी करीत आहे. या विद्यापीठाच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार सरकारने करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांसाठी आणि सुशिक्षित बरोजगारांसाठी ट्रेनिंग सेंटर्स सुरु करण्याचा सरकारने विचार केला आहे. मला या अनुषंगाने एक सुचना करावयाची आहे की, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी दिवसें दिवस बदलत चालली आहे. कारखान्यांमध्ये नोक-यांची उपलब्धता कमी होत चालली आहे. या विद्यार्थ्यांना आणि सुशिक्षित बेरोजगारांना ट्रेनिंग कोणत्या विषयांचे दिले पाहिजेत यासंबंधी मला विनंती करावयाची आहे की, टुरिझम सर्व्हीस सेक्टर आणि मायनिंग अशा दोन तीन विषयासंबंधीचे ट्रेनिंग दिले पाहिजे. माझ्या अभ्यासाप्रमाणे यापुढे या क्षेत्रामध्येच नोकरी उपलब्ध होऊ शकते. या विषयांचे ट्रेनिंग विद्यार्थ्यांना तसेच सुशिक्षित बरोजगारांना देण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा.

3...



श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, शिक्षण मंत्री अतिशय कार्यक्षमतेने आणि कुशलतेने काम करीत आहेत. या राज्यात सुरु असलेल्या सैनिक शाळांच्या बाबतीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष घातले पाहिजे. हिमालय ज्या ज्या वेळेस संकटात आलेला आहे, त्या त्या वेळेस सहयाद्रीने छातीचा कोट केलेला आहे. सैनिकांच्या जवळपास दहा ते पंधरा हजार पदे रिक्त आहेत. भारत देशासाठी जास्तीत जास्त सैनिक महाराष्ट्रातून झाले पाहिजेत. यासाठी महाराष्ट्रातील तरुणांना सैनिकांचे प्रशिक्षण चांगले पध्दतीने मिळावे म्हणून महाराष्ट्रातील सैनिक शाळांसाठी देण्यात येणा-या अनुदानात मोठया प्रमाणात वाढ करण्यात यावी अशी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो.

यानंतर श्री. कानडे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील....

पण मुंबई आणि मुंबईच्या परिसरामध्ये आज असलेल्या लोकसंख्येचा खऱ्या अर्थाने विचार झाला पाहिजे. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये शासन घर बांधणी कार्यक्रम हाती घेणार आहे. मुंबईची परिस्थिती मात्र वेगळी आहे. मुंबईमध्ये नव्याने येणाऱ्या लोकांना घरे देण्याचा प्रश्नच नाही. त्याबाबत एक वेगळी चर्चाच होऊ शकेल. वेगळा विचार होऊ शकेल. परंतु मुंबई शहरामध्ये असलेला एफएसआय आणि मुंबईची लोकसंख्या याचा विचार करावा लागेल. मुंबईतील गिरण्या, बंद पडलेले कारखाने, असलेली शेती कारण मुंबईमध्ये काही ठिकाणी लोक शेती करतात तसेच असलेल्या झोपडपट्ट्या यामध्ये बदल होणार आहे. मुंबईत असलेल्या जमिनीवर घरे बांधावयाचा विचार केला तर असलेल्या एफएसआयमध्ये मुंबईतील सर्व लोकांना आपण सामावून घेऊ शकत नाही. बाहेरच्या लोकांचा विचार नंतर करावा लागेल. असलेल्या लोकांकरिता जास्त एफएसआय देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून असलेल्या एफएसआयमध्ये बदल व्हावा अशी अपेक्षा आहे. त्याबाबत मी विस्तृतपणाने नंतर बोलणार आहे. असलेल्या एफएसआयमध्ये बदल करण्याच्या दृष्टीने सरकारने पावले उचलावीत अशी विनंती करतो. शासनाने ड वर्ग नगरपालिकांचा ऑक्ट्रॉय कर रद्द केला त्यामुळे व्यापारी वर्गात आनंदाचे वातावरण आहे त्याबद्दल सुध्दा मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्याच्या ग्रामीण भागामध्ये 27 हजार ग्रामपंचायतीमधून ग्रामसेवकांची पदे रिक्त आहेत. एकूण 9000 ग्रामसेवकांची पदे रिक्त आहेत. यातील 50 टक्के तरी पदे येत्या एक-दोन वर्षात भरण्यासाठी सरकारने विचार करावा व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी अशी मी विनंती करतो. शासनाने जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांना यशवंत पंचायत राज पुरस्कार जाहीर केले. परंतु पुरस्काराची रक्कम अत्यल्प आहे. पुरस्काराची रक्कम एवढी असावी की जेणेकरुन जिल्हा परिषदेला किंवा पंचायत समितीला त्यातून एखादे बांधकाम किंवा एखादी योजना राबविता येऊ शकेल. अन्यथा 5-10 हजार रुपयांची पुरस्काराची रक्कम ही जिहा परिषदेच्या फंडामध्ये जमा होईल. महाराष्ट्रामध्ये फार मोठया प्रमाणात ज्या विभागाने आघाडी घेतली आहे तो म्हणजे महिला बचत गट हा विभाग आहे. महिला बचत गटांना कर्ज देताना व्याज दरात सवलत देण्याचा विचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील....

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा उपस्थित करीत असताना मी सांगू इच्छितो की, 1930 साली इंग्रजांच्या काळात या देशातील जमिनीची मोजणी झाली होती. त्यानंतर 60 वर्षात आपल्या देशात जमिनीची मोजणी झालेली नाही. आज सगळे जे प्रश्न निर्माण झालेले आहेत ते जमिनींच्या वादातून निर्माण झालेले आहेत. महाराष्ट्रातील 42 हजार गावांमध्ये 27000 ग्रामपंचायती आहेत. शासनाने तंटामुक्त गाव ही योजना जाहीर केली. परंतु मूळ वाद आहे तो जमिनीच्या मालकीतून निर्माण झालेला आहे. 2/2 पिढयांची प्रकरणे न्यायालयात पडून आहेत. मोठया सावकारांची जमिनीच्या वादातून भांडणे होतात. घराचे विभाजन झाले तरी सगळे वाद जमिनीच्या मालकीतून निर्माण होतात. 42 हजार गावांपैकी प्रत्येक गावातील 5 प्रकरणांमधून 20लोक जरी न्यायालयात गेले तर त्याचा ताण पोलीस यंत्रणेवर आणि प्रशासनावर पडतो. तसेच न्याय संस्थेवर देखील त्याचा ताण पडतो. म्हणून जमिनीची मोजणी झाली पाहिजे. इंग्रजांनी लावलेले दगड नाहीसे झाले आहेत. 25 टक्के दगड बांधकामात आणि धरणात गेले आहेत. यासाठी निश्चितपणाने मोठया प्रमाणावर मनुष्यबळ लागणार आहे. तातडीने मोजणी करावयाची असे जरी म्हटले तरी हे काम 6/8 महिन्यांमध्ये होणार नाही याची जाणीव आहे. महाराष्ट्र मोजून काढावयाचा तर निश्चितच कालावधी लागणार आहे. लवकर मोजणी होईल अशी अपेक्षा नाही. परंतु निदान या कामाला सुरुवात तरी झाली पाहिजे असे माझे मत आहे. तंटामुक्त गाव करावयाचे असेल, सगळया प्रश्नांना न्याय द्यावयाचा असेल आणि गावामध्ये कायदा व सुव्यवस्था आणि शांततेचे वातावरण राखावयाचे असेल तर जमिनीची मोजणी करणे गरजेचे आहे. म्हणून जमीन मोजणीस निदान सुरुवात तरी करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, शासनाने अतिशय चांगले उपक्रम सुरु केलेले आहेत त्याबद्दल मी शासनाचे सर्व उपक्रमांच्या बाबतीत अभिनंदन करतो आणि माझे मनोगत संपवितो.

------

नंतर श्री. भोगले



SGB/ 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (मराठवाडा पदवीधर) : सभापती महोदय, सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि काही महत्वाच्या गोष्टी जाणीवपूर्वक सभागृहासमोर मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम अर्थसंकल्पाद्वारे समोर येणाऱ्या आव्हानांचा मुकाबला सरकार कशा पध्दतीने करणार आहे या विषयाबाबत अर्थमंत्र्यांनी जे विवेचन केले पाहिजे होते, जे मुद्दे मांडावयास पाहिजे होते दुर्दैवाने ते कुठेच प्रतीत झालेले नाहीत, हे निश्चितपणे हा अर्थसंकल्प वाचल्यानंतर मला सांगावेसे वाटते. येणारे युग हे एकविसावे शतक तसेच ज्ञानाचे युग आहे. 'Era of knowledge'. पुढच्या काळात ज्ञानावर आधारित सर्वच गोष्टींचा मोठ्या प्रमाणावर विकास आणि विस्तार होणार आहे अशा पध्दतीची माझी नव्हे तर जगाची मानसिकता आहे. म्हणून तंत्रज्ञान, ज्ञानयुग, त्यांना बलशाली करणारी आपली शिक्षण व्यवस्था आणि त्या शिक्षण व्यवस्थेमध्ये विशेषत: प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतची व्यवस्था याविषयी अर्थसंकल्पात म्हणाव्या तशा पध्दतीची तरतुदी नाहीत. ज्या तरतुदी आहेत त्या अत्यंत किरकोळ आहेत. त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे जे मुलभूत प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत त्याकडे दुर्दैवाने शासनाने दुर्लक्ष केले आहे. या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षा होती, विशेषत: जिल्हा परिषदेच्या ज्या माध्यमिक शाळा आहेत, त्यांचे संगणकीकरण करणे, त्या मजबूत करणे, त्याचबरोबर ग्रामीण भागातील शिक्षणाची व्यवस्था अधिक कार्यक्षम करणे अपेक्षित आहे. 79 हजार कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्र राज्यामध्ये संकलित होतो. मराठवाड्यामध्ये 352 जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. सध्याचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख असोत, आमचे आदरणीय नेते श्री.गोपीनाथ मुंडे असोत किंवा इतर अनेक सन्माननीय सदस्य जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेऊन या सभागृहापर्यंत पोहोचले आहेत. हजारो डॉक्टर्स, इंजिनिअर्स या शाळांच्या माध्यमातून तयार झाले. कित्येक वर्षापासून निजामकालीन व्यवस्था असलेल्या जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा आहेत, दुर्दैवाने त्याकडे शासनाने लक्ष दिलेले नाही. दोन दिवसांपूर्वी मला एक निवृत्त शिक्षणाधिकारी भेटले. वयाने ते 75 वर्षाचे आहेत. ते माननीय मुख्यमंत्र्यांचे गुरु होते. नात्यामध्ये ते माझे काका आहेत. एका कार्यक्रमामध्ये गेल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांचा पदस्पर्श केला. मला लाजल्यासारखे झाले. माझे ते नातेवाईक असताना मी काहीच केले नाही. मुख्यमंत्री महोदय म्हणाले, गणपतराव कुळकर्णी होते म्हणून मी मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचलो. कदाचित त्यांनी

..2..



श्री.श्रीकांत जोशी...............

शिकविले नसते तर येथपर्यंत आलो नसतो. साधारणत: महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांपासून शिक्षण व्यवस्थेत या शिक्षकांना गुरुचे स्थान होते. मला सांगावयास शरम वाटते, आज महाराष्ट्राच्या माध्यमिक शाळांचे सगळयात जास्त प्रमाण फक्त मराठवाड्यात आहे व खाजगी शिक्षण संस्थांनी त्या शाळा टेकओव्हर केल्या आहेत. या शाळांमध्ये एमपीएससीकडून सिलेक्ट झालेला एकही मुख्याध्यापक नव्हता. मध्यंतरी 352 जागा रिक्त होत्या. आता प्रमोशन्स झाल्यानंतर देखील 252 जागा रिक्त आहेत. एमपीएससीच्या बोर्डावर अद्याप पूर्णपणे नियुक्ती झालेल्या नाहीत, त्यामुळे वेळेवर मुलाखती होत नाहीत. आज सुध्दा 352 माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 2 लाखापेक्षा जास्त आहे. जिल्हा परिषदांच्या शाळा शहरात नाहीत. जिल्हा परिषदांच्या सर्कलच्या ठिकाणी आहेत. 480 जिल्हा परिषद सर्कलपैकी 352 सर्कलमध्ये या शाळा आहेत. या शाळा ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेची केंद्रे आहेत. त्यातील बहुतांश शाळा निजामकालीन आहेत. मला शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ निवृत्त भेटले होते. ते म्हणाले, आघाडी सरकारपेक्षा रझाकार सरकार चांगले होते. आता शिक्षण क्षेत्रातही रझाकारी सुरु झाली आहे. ती कधी बंद करणार आहात? त्यांनी संघर्ष केला आणि रझाकारांपासून स्वातंत्र्य मिळवून दिले. त्या शाळांची स्थिती इतकी बेकार, बकाल आणि शिक्षणद्रोही झाली आहे, ती बघितल्यानंतर त्या शाळा एकविसाव्या शतकातील शाळा नसून दुर्दैवाने सरकार त्याकडे लक्ष देत नाही ही त्यांची खंत आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांनी आता बसूनच सांगितले की, हे वाक्य त्यांचे नाही. परंतु त्यांच्या दृष्टीकोनातून सांगावयाचे झाल्यास ते राजकीय अभिनिवेषाने बोलत नव्हते, ते त्यांच्या डोक्यातही नव्हते. ह्या शाळा विशेषत: ग्रामीण भागातील ज्या वर्गामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे त्यांच्यासाठीच आहेत. या शाळांमध्ये गुंतवणूक करायची झाल्यास जास्तीत जास्त 500 कोटीचीच गुंतवणूक आपल्याला करावी लागणार आहे आणि तो मराठवाड्याचा हक्कच आहे पण दुर्देवाने तसे होत नाही. वास्तविक मराठवाड्यातील शाळांमध्ये संगणक कक्ष, प्रयोगशाळा पाहिजे, किमान कंपाऊंड वॉल तरी असली पाहिजे. सर्व शिक्षा अभियानअंतर्गत जो पैसा येतो तो त्या शाळांसाठी वापरता आला पाहिजे. परंतु आपल्या शिक्षण खात्याला सचिव म्हणून कोणीच येण्यास तयार नसतो, कारण तेथे जे मिळायचे ते काहीच मिळत नाही त्यामुळे आपल्याला बिगर सचिवाचेच काम करावे लागते. अशा प्रकारे काही गोष्टी योजनाबध्द करुन शिक्षण क्षेत्र मजबूत करावयाचे असेल तर मी सांगू इच्छितो की, ह्या शाळा एक प्रकारे एक्सलन्स सेंटर्स होऊ शकतात, त्या शाळा ग्रामीण भागातील ज्ञानदीपाची केंद्रे होऊ शकतात. तसेच ह्या शाळांना केंद्रीय शाळांचा दर्जा दिला तर त्यांच्या अंतर्गत असलेल्या 12-15 शाळांवर एक्सलन्स नियंत्रण होऊ शकते. या 352 शाळांपैकी काही शाळा त्यामध्ये संगीत, क्रीडा अशा प्रकारच्या वेगवेगळया क्षेत्रासाठी निवडल्या तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा चांगले काम करु शकतात. परंतु अशा शाळांच्या आजूबाजुला कुठलीही माध्यमिक शाळा नाही. तसेच माध्यमिक शाळातील कोर्सेस युनिटेशन असतात. परंतु दुर्देवाने त्यामध्ये महिलांच्या गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. म्हणून माझी विनंती आहे की, जाणीवपूर्वक जे करायला पाहिजे ते झालेले नाही. मी ज्या फिल्डमधला आहे त्या भागासंबंधी मला प्रामुख्याने काही मुद्दे मांडावयाचे आहेत. ते म्हणजे उच्च व तंत्र शिक्षणाच्या बाबतीत मराठवाडा, विदर्भ, तसेच उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा मोठया प्रमाणात अनुशेष आहे. त्यात पॉलिटेक्नीक कॉलेजेस, व्होकेशनल कोर्सेस, टेक्नीकल, आयटीआय या सर्वांची गरज आहे. आमच्या काळात मराठवाडयात फक्त एक ऑटोनॉमस आणि एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय होते आणि आता ते सुध्दा ऑटोनॉमस होण्याच्या मार्गावर आहे. 50 वर्षांची परंपरा

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

असलेले हे कॉलेज आहे. खरे तर या अभियांत्रिकी महाविद्यालयाला आयआयटी बरोबर नेण्याचे स्वप्न शासनाने बघितले पाहिजे, पण तसे होत नाही, म्हणून खंत वाटते. माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी तंत्र शिक्षणाच्या बाबतीत इक्विटी बेसवर एखादी वेगळी पॉलिसी आणावी अशी अपेक्षा होती, तसे त्यांनी सांगितले होते पण दुर्दैवाने त्याचा उल्लेख या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झालेला नाही. वास्तविक आठवीपर्यंतचे वर्ग टेक्नीकल शाळांमध्ये कन्व्हर्ट करायला पाहिजे होते, आठवीनंतरचे व्होकेशनल आणि व्होकेशनलचे कन्व्हर्शन टेक्नीकलमध्ये करायला पाहिजे होते. तांत्रिक शिक्षण तसेच नव-नवीन येणारे आवश्यक शिक्षण आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, 21 व्या शतकात सर्वात जास्त गरज आहे ती या पॉलिसीचीच. त्याप्रमाणे टेक्निकल एज्युकेशन, मेडिकल एज्युकेशन आणि 21 व्या शतकातील ह्युमन रिसोर्सेस डेव्हलप करावयाचे असेल, वेल्फेअर स्टेट म्हणून जी गरज होती त्यासंबंधी शासनाने मोठ्या प्रमाणात इक्विटी देण्याची गरज होती. म्हणून मला सांगावयाचे आहे की, या अर्थसंकल्पामुळे आमची फार निराशा झाली आहे. शासनाने इक्विटीवर जागा द्यावयास पाहिजे होती. नवीन कॉलेजेसना नोटिफाय करायला पाहिजे होते अशा प्रकारे एज्युकेशनमध्ये नवीन पॉलिसी आणण्याची गरज आहे. केवळ त्याच त्याच पध्दतीचे शिक्षण देऊन बेरोजगारांची फौज निर्माण करायला नको, अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.श्रीकांत जोशी....

सभापती महोदय, माननीय अटलजींच्या सरकारने संपूर्ण देशासाठी सर्व शिक्षा अभियानासाठी 50 हजार कोटी रुपये प्राथमिक शिक्षणासाठी उभे केले होते. त्यामुळे या शासनाने सुध्दा प्रत्येक जिल्हयाला किमान 25-30 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले तर फार काही पैसे जाणार नाही, फारतर 1000 कोटी रु. जातील. इकडे तिकडे पैसे देण्यापेक्षा शिक्षणावर पैसे दिले तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. शाळेला संगणक दिला नाही तर 21 व्या शतकातील विद्यार्थी कसा काय ग्लोबलायझेनला चॅलेंज करु शकेल? खरे म्हणजे प्रत्येक शिक्षकांला संगणक उपलब्ध करुन दिले पाहिजे. शिक्षकांला संगणकाचे ज्ञान नसेल तर विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान कसे काय येईल? शिक्षकच निरक्षर असेल तर विद्यार्थी साक्षर कसा काय होऊ शकेल? शिक्षकांना बीन व्याजी, 200 रुपये हप्त्याने उपलध्द करुन दिले पाहिजेत. संगणकाच्या संदर्भात मी लिनोव्हा आणि आयबीएम कंपनीशी स्वत: बोललो आहे. आज आयबीएम कंपनीचा संगणक 23000 रुपयाला जो मिळतो परंतु महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना संगणक देणार असाल तर सहा महिन्यात 15000 रुपयांमध्ये संगणक देण्यास कंपनी तयार आहे. महाराष्ट्रातील नागरी बँका, नॅशनलाईज बँकाकडून शासनाच्या गॅरंटीवर पगारातून पैसे कट होणार असतील तर ते संगणक देण्यास तयार आहेत. शासनाने केवळ व्याज द्यावयाचे आहे. शिक्षकांनी शिकणे ही काळाची गरज नाही तर संगणकाचे ज्ञान ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे ही काळाची गरज आहे. संगणक निरक्षर विद्यार्थ्यांची संख्या वाढवून चालणार नाही त्यामुळे यासंदर्भात विवेचन होण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक शिक्षकाला संगणकाचे ज्ञान असले पाहिजे असे स्वप्न आपण का बघत नाही ? सरकारचे काम फक्त टॅक्स वसूल करावयाचे नसून जनतेला प्रोत्साहन देण्याचे सुध्दा आहे. वेलफेअर स्टेट या शब्दाला न्याय द्यावयाचा असेल तर लोकांना चांगले वाटेल ते तुम्हाला करावेच लागेल. असे केले नाही तर पुढील पीढी आपल्याला कधीही क्षमा करणार नाही. आज व्हीजन नसल्यामुळे शिक्षणामध्ये खूप मोठी निराशा आलेली आहे. यामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. उच्चशिक्षण मंत्री आणि शालेय शिक्षण मंत्र्यांना बोलावून प्रमोशनल गोष्टी काय करता येतील याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.श्रीकांत जोशी....

सभापती महोदय, उमरगा तालुक्यातील गुंजवटी येथे माननीय मुख्यमंत्री आले होते. या ठिकाणी 75 वर्षापूर्वीची एक शिक्षण संस्था आहे. या ठिकाणी डॉ. पंतगे यांनी दोन पिढया अगोदर रजाकरांशी युध्द करुन मराठवाडयातील पहिली शिक्षण संस्था गुंजवटी येथे काढली होती. त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांना गहिवरून आले होते व त्यावेळी त्यांनी सांगितले की, स्वातंत्र्य पूर्व काळातील 50 वर्षापर्वीच्या ज्या शिक्षण संस्था असतील त्यांच्यासाठी वेगळे पॅकेज अर्थसंकल्पात केले जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणा अर्थसंकल्पात येत नसतील तर मुख्यमंत्र्यांच्या घोषणांचे होणार काय हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे. 50 वर्षापूर्वी स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शामलालजी आर्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुरेशराव केतकर, पंढरीनाथ शिसोदे यांनी शिक्षण संस्था काढल्या होत्या . हे कोणीही शिक्षण महर्षी नव्हते तर ते शिक्षण ऋषी होते. त्यांनी कोणत्याही प्रकारचे डोनेशन घेतले नव्हते. पंढरीनाथ पाटलांनी बायकोचे दागिने गहाण ठेवून संस्था उभ्या केल्या होत्या. पैठणला जेव्हा शिक्षण संस्था बांधली होती त्यावेळेस बायकोच्या अंगावर शेवटचा दागिना राहिला होता तेव्हा त्यांची पत्नी म्हणाली की, आता माझ्याजवळ फक्त मंगळसूत्र शिल्लक राहिले आहे त्यामुळे हा दागिना मी देणार नाही, हा दागिना तरी माझ्याकडे राहू द्या. त्यावेळची परंपरा आणि आजची परंपरा कुठे आहे? आजच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये आम्ही पगार दिले, वेतनावर पैसे दिले परंतु प्रत्यक्षात हातामध्ये काहीही आले नाही.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहाला माझी विनंती आहे की, शिक्षणाविषयी जर सगळयांनाच एवढी तळमळ आहे, कळकळ आहे, कणव आहे, प्रेम आहे, सहानुभूती आहे तर शिक्षणावर खरे म्हणजे अडीच-तीन तास चर्चा झाली पाहिजे. आपण शिक्षणावर चर्चा आयोजित करा मी उत्तर देण्यास तयार आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सध्या अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे व आपण माडलेला विषय वेगळा आहे.

श्री.श्रीकांत जोशी : एका चांगल्या विषयावर चर्चा करण्यासाठी चिपळूणकर प्रबोधिनीने आपल्याला चर्चेसाठी बोलवले तर आम्ही आपल्याला पुन्हा आमंत्रण देऊ. आपण शिक्षण क्षेत्रात काय देतो आणि प्रत्यक्षात काय द्यावयास पाहिजे याचा विचार केला पाहिजे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांनी चर्चेत हस्तक्षेप करुन सांगितले की, शिक्षणाच्या विषयावर अडीच तास चर्चा केली गेली पाहिजे. या विषयाच्या संदर्भातील माझा एक प्रस्ताव गेल्या दोन अधिवेशनापासून प्रलंबित आहे.तेव्हा हा प्रस्ताव शासनाने स्वीकारावा आणि त्यावर चर्चा घडवून आणावी.

**तालिका सभापती** : हा विषय कामकाज सल्लागार समितीमध्ये विचारात घेण्यात येईल

श्री.श्रीकांत जोशी :सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांना आणि अर्थमंत्र्यांना मला एक विनंती करावयाची आहे. ज्ञान हे पैशाने विकत मिळत नाही बट नॉलेज कॅन क्रिएट वेल्थ . अशा प्रकारे ज्ञानातून संपत्तीची निर्मिती होऊ शकते परंतु संपत्तीतून ज्ञान मिळू शकत नाही. तेव्हा या ज्ञानाच्या भांडारातून महाराष्ट्र संपन्न करावा असे धोरण जर शिक्षण विभागाने स्वीकारले तर सर्व कर्जाची परतफेड होऊन अर्थसंकल्पामध्ये पाच दहा हजार कोटी रुपये शिल्लक राहतील एवढी मोठी ताकद शिक्षणामध्ये आहे ही बाब आपण ओळखावी अशी माझी आपणास नम्र विनंती आहे. सध्या शिक्षण खात्याचे जे बोधवाकय आहे ते बदलून टाकण्यात यावे आणि नॉलेज कॅन क्रिएट वेल्थ असे बोधवाक्य ठरविण्यात आले पाहिजे . येस, वी कॅन क्रिएट वेल्थ. हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, यानंतर मला दुसऱ्या मुद्यासंबंधी बोलावयाचे आहे. बेरोजगाराची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या अर्थसंकल्पात असे म्हटलेले आहे की , " राज्यात 32 लक्ष एवढे बेरोजगार आहेत शासनामार्फत निरनिराळया वित्तीय संस्थांमार्फत त्यांच्यासाठी अर्थ सहाय्य करणे प्रस्तावित आहे." मध्यंतरी आम्ही युरोपमध्ये गेलो होतो तेव्हा तेथे आम्हाला असे सांगण्यात आले होते की, त्या देशात 6 टक्क्या वरुन सात टक्क्यावर बेरोजगारीचे प्रमाण गेले होते तेव्हा त्या देशासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला होता. एक टक्का बेरोजगारी वाढलेली असल्यामुळे या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

देशाचे कसे व्हावयाचे असा विचार सर्वजण करु लागले. सर्व यंत्रणा त्या दूष्टीने प्रयत्न करावयास लागल्या होत्या. मला माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, सध्या संगणकाचे युग आहे सर्व गोष्टी संगणकावर उपलब्ध आहेत. अडीच हजार कीओस्कचे सेंटर्स उभे करण्यात येणार आहे असे मी ऐकलेले आहे. तेव्हा ग्रामीण भागातील सगळया यंत्रणाचे संगणकीकरण करण्यात आले पाहिजे. ब-याच ठिकाणी तसे करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात येते परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणी केव्हा होईल हे सांगता येत नाही. बेरोजगारीचा विषय अत्यंत महत्वाचा आणि गंभीर आहे. तो सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले पाहिजेत. आपल्या देशासमोर आणि राज्यासमोर जे प्रश्न निर्माण होत आहेत त्या प्रश्नाचे मूळ बेरोजगारीत आहे. एका बाजूला मोठया प्रमाणावर नोक-या उपलब्ध आहेत आणि दुस-या बाजूला बेरोजगारी आहे. मध्यंतरी आम्ही एमआयडीसी, सिडको आणि महानगरपालिका मिळून संभाजीनगर येथे एक आय.टी. कॉन्फरन्स घेतली होती .त्यावेळी असे सांगण्यात आले की, आय.टी.च्या क्षेत्रात पाच लाख नोक-या उपलब्ध आहेत परंतु आम्हाला जे प्रशिक्षित उमेदवार हवे आहेत ते आम्हाला मिळत नाहीत. त्यांनी असेही सांगितले की, कॉल सेन्टर्सवर चांगल्या नोक-या उपलब्ध आहेत परंतु या मुलांना उत्तम इंग्रजी बोलता येत नाही. त्यामुळे तेथे नोक-या देऊ शकत नाही. केपीओमध्ये मोठया प्रमाणावर नोक-या उपलब्ध आहेत आर्किटेक्ट क्षेत्रामध्ये ड्राईग ऑनलाईन करणा-या नोकऱ्या उपलब्ध आहेत. परंतु योग्य प्रशिक्षित उमेदवार न मिळाल्यामुळे त्या जागा रिक्त राहतात.आज मोठया प्रमाणावर बेरोजगारी आहे.शिक्षण व्यवस्थेमध्ये काही दोष आहेत. या राज्यामध्ये शिक्षण विभागाला सचिव मिळत नाहीत. तेव्हा बेरोजगारी विषयी राज्य शासनाने श्वेतपत्रिका काढली पाहिजे. राज्यामध्ये लोक बेरोजगार का राहिले आहेत हे पाहिले पाहिजे. ज्या प्रमाणे शिक्षण व्यवस्थेमध्ये काही दोष आहेत त्याप्रमाणे सरकारमध्ये देखील काही दोष आहेत. श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी पूर्वी विधानसभेमध्ये घोषणा केली होती की, पाच लाख बेरोजगारांना नोक-या देण्यात येतील. एम.पी.एस.सी.मध्ये सदस्य त्वरित नेमण्यात येतील व ते कार्यालय ताबडतोब सुरु करण्यत येईल. परंतु त्यासाठी देखील बराच प्रयत्न करावा लागला. त्यानंतर आता हे कार्यालय कसे तरी सुरु झालेले आहेत आणि त्या ठिकाणी मेंबर्सची नियुक्ती करण्यात आलेली आहे. राष्ट्रवादीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

किती मेबर्स घ्यावयाचे आणि कॉग्रेसचे किती घ्यावयाचे यामध्ये वाद होता. या दोघांच्या भांडणातून किती मेंबर्स उरले आहेत हे परमेश्वरालाच माहीत. एम.पी.एस.सी. मार्फत 45 हजार जागा भरण्यास ज्याप्रमाणे वेळ नाही त्याप्रमाणे वेगवेगळया खात्यात दोन लाख जागा रिक्त आहेत त्या जागा सरकारने भरलेल्या नाहीत. ज्याकाही थोडया फार जागा भरल्या त्या ठिकाणी घोटाळा

झाला आहे. नोकर भरतीच्या बाबतीत असे आढळून आले आहे की, बीड मध्ये सीईओ यांनी आपले नातेवाईक भरले,नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी आपले नातेवाईक जिल्हाधिकारी कार्यालयात भरले होते. पाकिस्तानमध्ये जाऊन लढणे सोपे आहे परंतु नोकर भरतीचे काम त्या पेक्षाही अवघड आहे. एक सुध्दा कारकून भरण्यामध्ये सरकारकडे कॅपेसिटी नाही. अशा प्रकारे नोकर भरतीचे काम कठीण झालेले आहे. या नोकर भरतीमध्ये एकूण 12 घोटाळे झालेले आहेत . कोठे लेखी परीक्षेत घोटाळे झाले आहेत तर कोठे तोंडी परीक्षत घोटाळे झालेले आहेत .प्रत्येक ठिकाणी काही ना काही तरी भानगडी झालेल्या आहेत . त्या भानगडी कशामुळे झाल्या आहेत हे मला माहीत नाही. एक साधी परीक्षासुध्दा शासन नीटपणे घेऊ शकत नाही. अशी परिस्थिती आहे. बेरोजगाराची समस्या सोडविण्यासाठी आपण कसा मार्ग काढणार आहोत ? तेव्हा दोन लाख जागा त्वरित भरण्याच्या बाबतीत शासनाने सुतोवाच करावयास पाहिजे होते. त्याचप्रमाणे 20 - 21 व्या वर्षी जेव्हा ही मुले सर्व्हिसमध्ये येतात तेव्हा त्यांच्या समोर आयडियोलॉजी असली पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री.गायकवाड नंतर --- 17:45

श्री. श्रीकांत जोशी ....

पुंजीवाद, पैसे देऊन जर नोकऱ्या लागणार असतील, भ्रष्ट पद्धतीतून जर ते सेवेत येत असतील तर सरकार चालेल कसे ? माझा या निमित्ताने अत्यंत गंभीर प्रश्न सरकारला आहे आणि तो बेरोजगारीच्या विषयासंबंधात आहे. त्या विषयीचे उत्तर येथे यायला पाहिजे होते, ते आपण का दिले नाही ? सभापती महोदय, ज्याप्रमाणे मी येथे बेरोजगारीचा विषय सांगितला आहे त्याचप्रमाणे अजून एक महत्त्वाचा विषय म्हणजे ऑक्ट्रॉयचा विषय. एक सवंग लोकप्रियतेचे सुंदरसे स्टेटमेंट माननीय अर्थमंत्र्यांनी येथे केले. 'ड' वर्गाच्या 15 नगरपालिकांना पुढील वर्षीपासून उपकर लागू होऊन त्यांचा ऑक्ट्रॉय रद्द केला जाईल. खूप चांगले केले आपण, म्हणून सगळ्या ठिकाणी मिरवणुका निघाल्या. आता सगळे म्हणतात की, 1 तारखेपासून या नगरपालिकांमध्ये ऑक्ट्रॉय राहणार की जाणार ? समजा, जाणार असेल तर नगरपालिकांचा खर्च कोण भागविणार ? सरकार तो देणार असेल 31 मार्चपूर्वी पुढील महिन्याच्या पगाराचे पैसे सरकारने या नगरपालिकांना दिले पाहिजेत. सभापती महोदय, 'क' वर्ग नगरपालिकांचे एकूण वार्षिक स्टेटमेंट किती ? उपकर जमा कोण करणार ? तो जमा होईपर्यंत ऑक्ट्रॉय बंद केला तर त्याला तातडीची ॲडव्हान्स ग्रँट आपण काही देणार आहात का ? उपकरदेखील त्यांचा त्यांनीच गोळा करायचा आणि त्यातूनच त्यांनी त्यांचे पोट भरून घ्यायचे, असे होणार असेल तर यातून त्यांची जी भयावह परिस्थिती होणार आहे त्याची कल्पना माननीय अर्थमंत्र्यांना आहे की नाही याची हे मला समजलेले नाही. त्यामुळे मला कधी कधी या गोष्टीची कींव वाटते. आपण कल्पना करा की, एखाद्या गावामध्ये उपकर गोळा करण्याचे अधिकार त्या स्थानिक स्वराज्य संस्थेला दिले तर एखाद्या गोष्टीवर किती कर आकारायचा हे ठरविण्याचा अधिकार देखील त्यांनाच जाईल. झडती कोठे घ्यायची ? घरात घ्यायची की येताना घ्यायची हे ठरविण्याचा अधिकार देखील तिकडेच जाईल. फक्त बिलिंगवर उपकर घ्यायचा का ? त्यासाठी ग्राहकांपर्यंत जायचे की ट्रेडर्सपर्यंत जायचे याचेही कोठे विवेचन करण्यात आलेले नाही. या सगळ्या गोष्टींचे डिटेल्स स्वच्छ आणि स्पष्टपणे या घोषणेतूनच व्हायला पाहिजे होते. 'ड' वर्ग नगरपालिकांमधील ऑक्ट्रॉय रद्द केला याचे मी येथे निश्चित स्वागत करतो, परंतु त्याच बरोबर माननीय अर्थमंत्र्यांकडे मागणी करतो की, आपण किमान पहिल्या सहा महिन्यांचे त्या महापालिकचे जेवढे ऑक्ट्रॉयपासूनचे कलेक्शन होते ते पुढील वर्षीचे देण्याची सोय करावी. सभापती महोदय, उपकर जमा करण्याची व्यवस्था ही पारदर्शक असली पाहिजे. उपकर

...... 3एल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

जमा करण्याचे नियम लोकांच्या सहमतीने विधीमंडळामध्ये चर्चा करूनच लावले गेले पाहिजेत. तसेच येणारा जो उपकर आहे तो अगदी घराघरापर्यंत घुसून जमा केलेला असता कामा नये, तसे होणार असेल तर ते सहन केले जाणार नाही. त्याचप्रमाणे उपकर कसा वसूल करायचा या विषयची शास्त्रोक्त पद्धती निश्चित केली पाहिजे. या ठिकाणी मात्र 'नवी मुंबईच्या पद्धतीने' असे सांगितलेले आहे. पण त्याचे विवेचनदेखील अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने झाले पाहिजे. सभापती महोदय, नवी मुंबई हे खूप मोठे पैशाचे शहर आहे. त्याची तुलना अमरावतीशी, नांदेडशी, संभाजी नगरशी करून चालणार नाही. तेथील समस्या वेगळ्या आहेत, अडचणी वेगळ्या आहेत. अमरावतीची तुलना नवी मुंबईशी केली तर काय होईल हे सभापती महोदय, आपण स्वत: अमरावतीचे असल्याने आपण समजू शकता. ही भयानक परिस्थिती आहे. तेव्हा कोठल्यातरी सवंग लोकप्रियतेसाठी एखादी घोषणा करायची आणि नंतर त्यापासून चार पावले पुढे यायचे हे अत्यंत चुकीचे आहे.

सभापती महोदय, मी एक शेवटचा मुद्दा येथे सांगू इच्छितो. माझा मुद्दा हा विशेषत: ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडीत आहे. रूरल इन्फ्रास्ट्रक्चरसाठी दुदैवाने यामध्ये काहीही पैसे दिलेले नाहीत. आज मुंबईसाठी 39 हजार कोटी रूपयांचा प्लॅन तयार होतो आहे. त्यात एमएमआरडीए, मुंबई महानगरपालिका, जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र सरकार, जागतिक बँक, युनो, डीएचओ, डब्ल्यूएचओ इत्यादी इत्यादी संस्था कोठल्या ना कोठल्या पद्धतीने मुंबईसाठी फंडींग करीत असतात. आमच्या ग्रामीण भागातील जी खरी मार्केट सेंटर्स आहेत, जी आठवडी बाजाराची ठिकाणे आहेत त्यावर आतापर्यंत सरकारने किती पैसे खर्च केले आहेत ? शेतकऱ्यांचा तयार झालेला माल हा पहिल्यांदा विकण्यासाठी म्हणून कोठे येत असेल तर तो आठवडी बाजारामध्ये येतो. आज या आठवडी बाजाराची परिस्थिती पाहिली तर अत्यंत बकाल पद्धतीने, जेथे जागा कोरडी मिळेल तेथे हा बाजार भरलेला असतो. 30 टक्के लॉसेस हे शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाचे होत असतात ही वस्तुस्थिती आहे. शेकडो वर्षांची मागणी आहे. सभापती महोदय, चांगला राजा कोण असतो ? या बाबतीत आजही लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव घेत असतात. अहिल्याबाई होळकरांनी अशा लोकांच्या व्यथा जाणल्या आणि ज्याप्रमाणे त्यांनी नदीवरील घाटांची व्यवस्था केली तशीच रूरल मार्केटची देखील अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्था केली याचे दाखले आजही आपणा सगळ्या

...... 3एल 3 ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बघायला मिळतात. सभापती महोदय, दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्था कणा असलेली ही रूरल मार्केट सेंटर्स आहेत ती आता मल्टीनॅशनल कंपन्यांना आकर्षित करताहेत, पण महाराष्ट्र सरकारने मात्र आतापर्यंत त्या ठिकाणी त्यांच्यासाठी पायाभूत सुविधा देखील दिलेल्या नाहीत वा सुरू केलेल्या नाहीत. सभापती महोदय, मी माननीय अर्थमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण जर रविवारी माझ्याबरोबर आलात तर मी आपल्याला दाखवून देईन की, संभाजी नगरपासून लातूर पर्यंत जात असताना किमान 25 ठिकाणी तरी रस्त्यावर हे आठवडी बाजार भरलेले आपल्याला दिसतात. तेथे आपण गाडी चालवू शकत नाही. मी त्यांना त्याबद्दल विचारले तर ते म्हणाले, आम्ही तरी काय करणार ? श्रीमंतांच्या गाड्या जाण्यासाठी सरकार रस्ते बांधते, पण आमच्या गोरगरीबांना कांदे-बटाटे विकण्यासाठी रस्त्यावर बसण्याशिवाय अन्य कोणता पर्याय आहे. मी सहज त्या तरूणाला विचारले की, तू काय शिकला आहेस ? त्यावर तो म्हणाला की, मी एम.ए. झालो आहे. सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट झालेले असे अनेक, हजारो तरूण आहेत की आजही ते पडेल ते काम करतात, अगदी इजीएसच्या कामावर देखील काम करण्यास जातात. स्वतःच्या पायावर उभे राहण्याची त्यांची इच्छा आहे पण दुर्दैवाने रूरल मार्केटिंग ग्रोथ सेंटर असा विषय कित्येकदा मांडूनही अर्थसंकल्पात तो प्रतित झालेला नाही याचे मला मनोमन दुःख वाटते.

( यानंतर श्री.सरफरे ....3एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

खरे म्हणजे ही समाजाची नाडी आहे. या ठिकाणाहून कॅपिटलायझेशन ऑफ फायनान्स होणार आहे. या ठिकाणी 10 टक्के लॉसेस कमी झाले तर पर कॅपिटा इन्कममध्ये 10 टक्के डायरेक्ट वाढ होणार आहे. या ठिकाणी मार्केटमध्ये चांगल्या प्रकारचे गोडाऊन बांधले गेले, चांगल्या पध्दतीचे मार्केट सेंटर तयार केले, चांगल्या पध्दतीचे कम्युनिकेशन निर्माण झाले, चांगल्या पध्दतीची कॉप्युटरची व्यवस्था निर्माण झाली तर आपला माल तात्काळ एक्सपोर्ट होणार आहे. आणि हे होणे ही काळाची गरज आहे. दुर्दैवाने एकविसाव्या शतकातील व्हिजन असलेले कोणतेही डॉक्युमेंट या अर्थसंकल्पाबरोबर आम्हाला मिळाले नाही. कधी कधी मला असे वाटते की, हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी तयार केला आहे की, या खात्याच्या सचिवांनी खालच्या स्तरावरील अधिकाऱ्याला लिहून काढावयास सांगून त्यावर गोल शिक्का मारण्यास सांगितला की काय? कधी कधी असे वाटते की, या अर्थसंकल्पामध्ये काहीच व्हिजन नाही. हे राज्य आपण कशासाठी चालवीत आहोत? अशाप्रकारचे प्रश्न माझ्या मनामध्ये निर्माण होतात. म्हणून मला असे वाटते की, या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे व्हिजन समोर यायला पाहिजे होते ते दुर्दैवाने आलेले नाही. आणि म्हणून आमच्या ग्रामीण भागाचे प्रश्न आहेत, मराठवाडयातील मागासलेल्या भागाचे प्रश्न आहेत. त्यामध्ये वीजेचा प्रश्न आहे, वीजेचे भार नियमन कमी होण्याची कोणतीही शक्यता यामध्ये दिसत नाही. आपल्याकडे पाणी, वीज आणि जमीन असतांना मराठवाडयात एकही पॉवर जनरेशन सेंटर कां होऊ शकले नाही? छत्तीसगडहून या राज्यामध्ये येऊन बी.ओ.टी. तत्वावर वीज निर्मिती प्रकल्प निर्माण करुन रुपया 90 पैश्यापासून 2 रुपये 80 पैश्याने वीज देण्यास कित्येक उद्योगपती तयार आहेत. परंतु हे केंद्र ताबडतोब उभे करण्याची या सरकारची मानसिकता दिसत नाही. मराठवाडा किंवा विदर्भाच्या ठिकाणी आज नवीन उद्योग सुरु होत नाहीत. शेतीवर आधारीत उद्योग निर्माण करण्याचे कोणतेही धोरण या अर्थसंकल्पामध्ये मांडलेले दिसत नाही. त्यासाठी आपण स्पेशल कॅपिटा इन्सेंटिव्ह कां ठेवले नाही? जर कुणी एखादा नवीन प्रकल्प उभा करणार असेल तर त्याकरिता सरकारने ईक्विटी म्हणून 100 कोटी रुपये बाजूला काढून कां ठेवले नाही? जर कुणी हिंगोली जिल्हयामध्ये प्रकल्प उभा करणार असेल, वाशिम जिल्हयामध्ये कुणी प्रकल्प उभा करणार असेल तर त्या प्रकल्पासाठी प्रथम सरकारकडून 50 कोटी रुपये ईक्विटीच्या रुपात मिळतील अशी व्यवस्था आपण कां करीत नाही? मल्टि नॅशनल कंपनीव्दारे कुणी सूतगिरणी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. श्रीकांत जोशी....

प्रकल्प उभा करणार असेल तर त्याला ईक्विटी देण्याकरिता आम्ही पुढे येऊ, असे धोरण या सरकारने ठरविले तर आज 50 कंपन्या हा प्रकल्प तयार करण्यासाठी तयार आहेत. अशापध्दतीचे व्हिजन डॉक्युमेंट या अर्थसंकल्पामध्ये असणे आवश्यक होते. रस्त्याचे नेटवर्क निर्माण करणे असेल, वीज निर्मिती केंद्र निर्माण करणे असेल, कृषी अर्थव्यवस्थेला पुढे नेण्याच्या दृष्टीने , आणि टेक्निकल नॉलेजपासून ते ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट पर्यंत कोणत्याही विषयाला या अर्थसंकल्पाच्या भाषणामधून एक नवीन प्रेरणा मिळेल असे काहीही केलेले आपल्याला दिसत नाही. मी कुठलाही विशिष्ट मतदारसंघ डोळयासमोर ठेवून या ठिकाणी बोलत नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातून बोलत आहे. जे मराठवाडयाला लागू आहे तेच वेगळया पध्दतीने कोकणाला आणि विदर्भाला सुध्दा लागू आहे हे मी आपल्याला सांगू इच्छितो. माझा मराठवाडयापुरता अभ्यास असल्यामुळे त्याबाबत या ठिकाणी विचार मांडण्याची मला संधी मिळाली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

**तालिका सभापती (श्री. जगदीश गुप्ता)** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 27 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 5 वाजून 52 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 27.3.2008 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

************

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही